पुणे, मंगळवार, १७ जून २०२५ · RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 199 · वर्ष ४ थे, अंक १९९ · किंमत ₹ ६ · पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News




सुट्टयांमुळे वन विभागाला लाखोंची 'मेजवानी'...!

P3



१२

पुणे वॉरियर्स संघाला पहिलेवहिले विजेतेपद

## At a Glance

### दहशतवादाचे उच्चाटन ही सर्वोच्च प्राथमिकता

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी सोमवारी सांगितले की, केंद्रशासित प्रदेशातून दहशतवादाचे संपूर्ण उच्चाटन करणे हे त्यांच्या प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य आहे आणि त्यांनी सुरक्षा दलांना दहशतवाद्यांशी आणि दहशतवादी परिसंस्थेशी सामना करण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. उधमपूर येथील शेर-ए-काश्मीर पोलिस अकादमी » पान ७ वर

### कोचिंग सेंटर ऑपरेटरकडून बलात्कार

**चांदौली (उत्तर प्रदेश) :** साहबगंज परिसरातील एका कोचिंग सेंटर ऑपरेटरवर १० वर्षांच्या मुलीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले. रविवारी संध्याकाळी मुलगी ट्यूशनसाठी गेली असताना ही घटना घडल्याचे त्यांनी सांगितले. घरी परतल्यानंतर, मुलीने तिच्या कुटुंबियांना घटनेची माहिती दिली.

# विमान अपघाताची पाळेमुळे यूपीए सरकारपर्यंत?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १२ जून रोजी अहमदाबाद येथे एअर इंडियाच्या झालेल्या विमान दुर्घनेचे आता राजकीय पडसाद उमटत आहेत. पंतप्रधान मोदी यांचे प्रधान सचिव पीके मिश्रा यांनी स्वतः जातीने अहमदाबादेतील मेघाची नगर येथे जाऊन परिस्थितीची पाहणी केली व या घटनेची चौकशी करणाऱ्या सर्व एंजन्सिची चौकशी कुठपर्यंत आली याची माहिती घेतली आहे. ही घटना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गुजरात राज्यात झाली आहे त्यामुळे या घटनेची लवकारात लवकर चौकशी व्हावी यासाठी केंद्रीय प्रशासन प्रयत्नशिल आहे. आता या घटनेची अधिक खोलात चौकशी व्हावी यासाठी संसदीय समीतीसुद्धा अहमदाबादला भेट देण्याची शक्यता आहे.



या विमानांची खरेदी युपीए सरकारच्या काळात झाली होती २००८ मध्ये ही विमाने भारताला मिळणार होती पण यांच्या निर्मितीला वेळ लागल्याने २०१४ मध्ये ती भारताच्या ताब्यात मिळाली. ही विमाने जेव्हा घेतली तेव्हा 'एअर इंडिया' सरकारच्या ताब्यात होती. २०२२ मध्ये या कंपनीला टाटा ग्रुपने घेतले आहे. बोइंग ७८७-८ या विमांनाच्या खरेदीचा व्यवहार हा काँगेस आघाडीच्या युपीए काळात झाल्याने आता या दुर्घटनेमुळे राजकारण तापण्याची चिन्हे आहेत. ज्यावेळी हा खरेदी व्यवहार झाला त्यावेळी यावर बरीच टीकाटिप्पणी व चर्चा झाली होती. या घटनेवर पंतप्रधान कार्यालय » पान ७ वर

### संसदीय समिती करणार सखोल चौकशी

- जडीयूचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष व राज्यसभा सदस्य संजय झा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेली समिती या घटनेची चौकशी करत आहे. ही विमान दुर्घटना कशी झाली व यापुढे या घटना टाळायच्या असतिल तर काय करता येईल याबाबतीत ही समिती अभ्यास करत आहे. ही समिती डीजीसीए, एअर इंडिया व बोइंग कंपनीशीही बोलणी करणार आहे. विमानांची खरेदी निर्णय, सुरक्षा उपाय, विमानांची देखभाल याबाबतीतही ही समिती माहिती घेऊन विश्लेषण करणार आहे. विषेशता बोइंग ७८७-८ या विमानांच्या बाबतीत अधिक खोलात चौकशी करेल यामध्ये याच विमानांची का खरेदी करण्यात आली, याच्या स्पर्धेतील विमानांना डावलून यावरच का शिक्कामोर्तब केले ही माहिती उजेडात येईल.

# ईडीची नाचक्की

## वकीलांच्या नावाने समन्स काढल्याने टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सक्तवसुली संचालनालय (ईडी) या केंद्रीय एजन्सीला गेल्या काही महिन्यांत सर्वोच्च न्यायालयाच्या कार्यपद्धतीमुळे अनेकदा टीकेची झोड उठली आहे. आता सुप्रीम कोर्ट अॅडव्होकेट्स ऑन रेकॉर्ईसने (एससीएओआरए) सक्तवसुली संचालनालयाच्या एका कृतीवर आक्षेप तर घेतलाआहेच, शिवाय ईडीच्या कारवाईचे परिणाम अधोरेखित करणारे निवेदनही जारी केले आहे. सक्तवसुली संचालनालयाने नुकतेच ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांना समन्स बजावले आहे.

लोकशाही कामकाजातील वकिली व्यवसायाच्या भूमिकेवर प्रकाश टाकताना एससीएओआरए म्हणाले, "न्यायपालिकेचे स्वातंत्र्य आणि बारचे स्वातंत्र्य हे आपल्या घटनात्मक लोकशाहीचे दोन स्तंभ आहेत. निर्भय आणि स्वतंत्र वकिलांशिवाय न्यायालयांचे प्रभावी कामकाज अशक्य आहे. एससीएओआरएने म्हटले आहे की ते "एजन्सीजद्वारे कार्यकारी अधिकारांच्या मनमानी वापराविरोधात तीव्र निषेध नोंदवतात." दरम्यान, ईडीने दातार यांना बजावलेले समन्स मागे घेतले आहे.

एससीएओआरएने एक निवेदन जारी करून यावर आक्षेप घेतला असून, कायदेशीर व्यावसायिकांची चिंता वाढली आहे. एससीएओआरएचे मानद सचिव निखिल जैन यांनी १६ जून रोजी » पान ७ वर

### कायदेशीर सल्ला देण्याच्या अधिकारावर हल्ला

- अशा कृतींमुळे कायदेशीर सल्लागारांचे स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या कायदेशीर प्रतिनिधित्वाच्या घटनात्मक अधिकारावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे निवेदनात म्हटले आहे. या निर्णयामुळे मोठ्या प्रमाणात कायदेशीर समुदायात एक भयानक संदेश गेला आहे आणि भीती न बाळगता स्वतंत्र कायदेशीर सल्ला घेण्याच्या प्रत्येक नागरिकाच्या मूलभूत अधिकाराला धोका निर्माण झाला आहे, असे असोसिएशनने म्हटले आहे.

# वारीच्या लोकरंगातील 'संत सृष्टी'चे महादर्शन

## मंगळवारी महापालिकेच्या वतीने उद्घाटन; शिल्पकार महेंद्र थोपटे यांच्या संकल्पनेतून साकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुरंदर :** पंढरपूरच्या वारीचे लोकरंग अनुभवणाऱ्या पुणेकरांसाठी एक अद्वितीय कलादालन उभारले जात असून, "संत सृष्टी" या शिल्पआकारातील भव्य आणि वैचारिक दृष्टीने समृद्ध प्रकल्पाचे उद्घाटन मंगळवारी पुण्यात होणार आहे. महापालिका प्रशासनाच्या पुढाकारातून साकारत असलेल्या या 'संत सृष्टी'तून संत साहित्य, वारीची परंपरा आणि सामाजिक-सांस्कृतिक घटनांचे शिल्पदर्शन घडणार आहे.

शिल्पकार महेंद्र थोपटे यांच्या संकल्पनेतून आणि सृजनातून ही सृष्टी आकार घेत असून, यात तब्बल २५ शिल्पांद्वारे वारकरी संप्रदायाची गाथा उभी केली जाणार आहे. २१ फूट ते साडेदहा फूट उंचीची शिल्पकृती या प्रदर्शनात प्रमुख ठरणार आहे.



> "शिल्पकलेच्या माध्यमातून संतवाङ्मयाची जीवनदृष्टी, सामाजिक भूमिका आणि अध्यात्मिक संकल्पना नव्या पिढीपर्यंत पोहोचतील."
>
> -शिल्पकार महेंद्र थोपटे

यामध्ये संत ज्ञानेश्वर, निवृत्ती महाराज, संत सोपानकाका, मुक्ताई यांचा जीवनप्रवास त्यांच्या विशिष्ट वयोगटांतील घटनांच्या माध्यमातून साकारण्यात आला आहे.

"वारी ही केवळ धार्मिक यात्रा नाही, ती सामाजिक संस्कृतीची वाहक आहे. 'संत सृष्टी' पुण्याच्या कलाक्षेत्रात एक नवा अध्याय उघडणारी ठरणार आहे," असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. » पान ७ वर

### संत परंपरेचा सजीव इतिहास

- या संत सृष्टीमध्ये विविध घटनांवर आधारित समूह शिल्प साकारण्यात आले असून, वारीच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला आहे. विशेषतः पालखी सोहळा, त्यातील वाढते स्वरूप, भक्तांची सहभागिता, आणि समाजमनावर पडणारा परिणाम – हे सारे घटक शिल्पांद्वारे प्रभावीपणे मांडण्यात आले आहेत. "संत परंपरेचा लौकिक केवळ अध्यात्मापुरता मर्यादित नाही, तर ती समाजमन घडवणारी शक्ती आहे. या सृष्टीतून नव्या पिढीला त्या परंपरेची ओळख होईल.

### भव्य भगवी पताका

- या कलादालनात २०० फूट उंच भगवी पताका उभारण्यात आली असून, ती वारीच्या आध्यात्मिक तेजाचे प्रतीक ठरणार आहे. संत साहित्यातील निवडक प्रसंग, भक्तीभाव आणि सामाजिक समतेचे संदेश शिल्पांमधून साकारण्यात आले आहेत.

# कर्नाटकाने अलमट्टीतील पाणीसाठा वाढवला; चिंतेत वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अलमट्टी धरण जून महिन्यात ४७ टक्क्यांपर्यंत भरण्यास केंद्रीय जल आयोगाने परवानगी दिली आहे, पण कर्नाटक सरकारच्या जलसंपदा विभागाने मान्सून पावसाचा जोर वाढण्यापूर्वीच अलमट्टी धरणात ५२ टक्के पाणीसाठा ठेवून जल आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केले आहे. कर्नाटक सरकारच्या या भूमिकेमुळे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांतील कृष्णा, पंचगंगा, वारणा नदीकाठच्या नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.



कर्नाटकातील अलमट्टी धरणाची १२३ टीएमसी म्हणजे ५१९.६ मीटरपर्यंत पाणीसाठवण क्षमता आहे. या धरणामध्ये कुठल्या महिन्यात किती पाणीसाठा केला पाहिजे, याबद्दल केंद्रीय जल आयोगाने नियम ठरविले आहेत. त्यानुसार जूनअखेरपर्यंत ५७ टीएमसी म्हणजेच ५१३.६० मीटर पाणीसाठा ठेवणे गरजेचे आहे. ४७ टक्क्यांपर्यंत पाणीसाठा गरजेचा आहे.

असे असतानाही कर्नाटकातील अलमट्टी धरण व्यवस्थापनाने दि. १५ जून रोजी धरणात ६४.०३ टीएमसी पाणीसाठा ठेवला असून, ५२ टक्के धरण भरले आहे. सध्याच्या पाणीसाठ्याची आकडेवारी केंद्रीय जलआयोगाच्या नियमाला धरून नाही. अलमट्टी धरणात २३ हजार २३० क्युसेक पाण्याची आवक असून, केवळ १० हजार क्युसेक विसर्ग होत आहे.

### चीन अण्वस्त्रांची संख्या १५०० वर नेणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** चीनची अण्वस्त्र क्षमता जगात सर्वाधिक वेगाने वाढते आहे. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या नव्या अहवालानुसार, चीनने २०२३ पासून दरवर्षी स्वतःच्या शस्त्रसाठ्यात सुमारे १०० नव्या अण्वस्त्रांचा समावेश केला आहे आणि २०२५ च्या सुरुवातीपर्यंत त्यांच्याकडे सुमारे ६०० अण्वस्त्र आहेत. सोमवारी जाहीर केलेल्या वार्षिक अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. चीन आता काही अण्वस्त्रे 'लॉंच-रेडी' स्थितीत ठेवली असून, पूर्वी केवळ अमेरिका आणि रशियाकडे अशी अण्वस्त्रे असायची.

चीनने उत्तर भागातील वाळवंटी प्रदेशात आणि पूर्व भागातील डोंगराळ भागात एकूण » पान ७ वर

## शाळेच्या पहिल्या दिवशी

# अजित पवार यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शाळा प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमाअंतर्गत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी शाळा सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी दौंड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आलेगाव पुनर्वसन या शाळेत विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी गट विकास अधिकारी महेश ढोके, गटशिक्षणाधिकारी संजय महाजन, विस्तार अधिकारी शरीफा तांबोळी, केंद्र प्रमुख आशा धाडगे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वीरधवल (बाबा) जगदाळे आदी उपस्थित होते.



आज शालेय जीवनातील आठवणीला उजाळा मिळाला असे सांगून श्री. पवार म्हणाले, भावी पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देण्यासोबतच सर्व शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे ही राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे. » पान ७ वर

### ...तर पाकिस्तान इस्रायलवर अणुबॉम्ब टाकेल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष सध्या चांगलाच चिघळला आहे. दोन्ही देशांकडून एकमेकांवर मोठ्या प्रमाणात क्षेपणास्त्र डागली जात आहेत. इराण-इस्रायलच्या वादात भारताचा शेजारी पाकिस्तानची एन्ट्री झाली आहे. इस्रायलने इराणवर अणुबॉम्ब टाकला, तर पाकिस्तान इस्रायलवर अण्वस्त्र हल्ला करेल, असा दावा इराणच्या एलिट दलांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने केवला आहे.

जनरल मोहसेन रेजाई यांनी एका इराणी टीव्ही चॅनेलला दिलेल्या मुलाखतीमध्ये हा हल्ला केला आहे. इराण आणि इस्रायलमध्ये झालेल्या क्षेपणास्त्रांच्या » पान ७ वर

# रॉबर्ट वाड्रा विरोधात नव्याने समन्स

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सक्तवसुली संचालनालयाने रॉबर्ट वाड्रा यांना नव्याने समन्स बजावून १७ जून रोजी चौकशीसाठी बोलावले आहे. मनी लॉन्ड्रिंग प्रकरणी प्रियांका गांधी वाड्रा यांच्या पतीची चौकशी करायची आहे. हे प्रकरण ब्रिटनमधील शस्त्रास्त्र व्यापारी संजय भंडारी यांच्याशी संबंधित असून त्यांचे रॉबर्ट वढेरा यांच्याशी संबंध असल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणी एजन्सीला त्याची चौकशी करायची आहे. मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) या प्रकरणाचा तपास सुरू असून वाड्रा यांचाही या प्रकरणाशी संबंध असल्याचे बोलले जात आहे. यापूर्वी ईडीने रॉबर्ट वढेरा यांना समन्स बजावून १० जून रोजी चौकशीसाठी बोलावले होते.



रॉबर्ट वाड्रा यांनी ताप असून कोरोनाची लक्षणे जाणवत असल्याचे सांगत चौकशीत सहभागी होण्यास नकार दिला होता. त्यांनी कोरोना चाचणीही करून घेतली. रॉबर्ट वढेरा यांचा समन्स टाळण्याचा कोणताही हेतू नाही, असे त्यांच्या वकिलांचे निवेदन ही आले. ते केव्हाही एजन्सीसमोर हजर राहण्यास तयार आहेत. या महिन्यात ते परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. अशा परिस्थितीत तो प्रवासापूर्वी किंवा नंतर कधीही एजन्सीसमोर हजर राहू शकतो. वाड्रा यांची » पान ७ वर

# कर्नाटकमध्ये बाईक टॅक्सीवर बंदी कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगळुरू :** कर्नाटक सरकारने बाईक टॅक्सी सेवांवर बंदी घालण्याचा निर्णय कायम ठेवताच, प्रसिद्ध अॅग्रीगेटर रॅपिडोने राज्यात 'बाईक पार्सल' नावाची नवीन सेवा सुरू केली आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या बंदी आदेशावर स्थगिती देण्यास नकार दिला आणि त्यानंतर ही नवी सेवा सुरू करण्यात आली.



कर्नाटक सरकारने स्पष्ट केले की, राज्यात बाईक टॅक्सी सेवा मान्य नाही आणि त्यामुळे कोणत्याही प्रकारे अशा सेवांना परवानगी दिली जाणार नाही. रॅपिडो अॅपनेही आपल्या ग्राहकांना संदेश देत सांगितले की, "१६ जून पासून कर्नाटकमध्ये बाईक टॅक्सी सेवा उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार थांबवण्यात येत आहे. आम्ही कायद्याचा पूर्ण सन्मान करतो आणि भविष्यात पुन्हा ही सेवा सुरू होईल, अशी आशा बाळगतो."

रॅपिडोच्या अॅपवर बाईक टॅक्सी पर्याय बंद झाला असला, तरी त्याऐवजी 'बाईक » पान ७ वर

# जोरदार पावसामुळे खडकवासला धरणसाखळीत वाढ


### जलसाठा

**खडकवासला प्रकल्पातील धरणांमध्ये चांगला पाऊस झाला आहे. सद्यःस्थितीत धरणाच्या पाणलोट परिसरातील ओढे-नाल्यातून पाणी वाहत असून, हे पाणी धरणात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. सोमवारी देखील सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू असल्याने ती कायम राहिल्यास पर्यायाने धरणाच्या पाणीपातळीत आणखी वाढ होऊ शकते.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पात रविवारी सायंकाळनंतर झालेल्या जोरदार पावसामुळे चारही धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात जमा होऊ लागले असून, रविवारी सायंकाळी या धरणांमध्ये एकूण ५.२० टीएमसी पाणी होते.

सोमवारी सकाळपर्यंत हा साठा वाढून ५.४५ टीएमसीवर पोहोचला असल्याची माहिती पाटबंधारे विभागाकडून देण्यात आली आहे.



घाटमाथ्यावर झालेल्या मुसळधार पावसामुळे ओढे आणि नद्यांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा येवा सुरू असून, पुढील काही दिवसांत पाणीसाठ्यात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

खडकवासला प्रकल्पातील धरणांमध्ये चांगला पाऊस झाला आहे. सद्यःस्थितीत धरणाच्या पाणलोट परिसरातील ओढे-नाल्यातून पाणी वाहत असून, हे पाणी धरणात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. सोमवारी देखील सकाळपासूनच पावसाची संततधार सुरू असल्याने ती कायम राहिल्यास पर्यायाने धरणाच्या पाणीपातळीत आणखी वाढ होऊ शकते.

### चारही धरणांमधील पावसाची नोंद

- खडकवासला : ४५ मिमी
- पानशेत : ९३ मिमी
- वरसगाव : ९३ मिमी
- टेमघर : ८० मिमी

#रा

## स्टेशनरी असोसिएशनचा राजेंद्र बाठिया यांना पुरस्कार

**पुणे :** स्टेशनरी कटलरी अँड जनरल मर्चंटस् असोसिएशनतर्फे व्यापारी एकता दिनानिमित्त व्यापा-यांच्या कार्याच्या गौरव करणा-या पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दिनांक २३ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता एस.एम. जोशी सभागृहात हा समारंभ होणार आह. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे असणार आहेत, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष सचिन जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषदेला यावेळी असोसिएशनचे उपाध्यक्ष संजय राठी, सचिव किशोर पिरगळ, खजिनदार मोहन कुडचे, तसेच पदाधिकारी सूर्यकांत पाठक, दिलीप कुंभोजकर, अरविंद पटवर्धन, सुरेश नेऊरगांवकर, मदनसिंह राजपूत, नितीन पंडीत, किशोर चांडक, अनिल प्रभुणे, धनंजय रामलिंगे, राजकुमार गोयल, सुनिल शिगवी, मनिष परदेशी, राजेश गांधी आदी उपस्थित होते.

सचिन जोशी म्हणाले, असोसिएशनतर्फे देण्यात येणारा व्यापार भूषण पुरस्कार यंदा मार्केटयार्डमधील राजेंद्र कुमार मोहनलाल आणि कंपनीचे राजेंद्र बांठिया यांना प्रदान करण्यात येणार आहे. व्यापार भूषण पुरस्काराचे स्वरुप पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे आहे.

## मार्गदर्शन कला आणि करियरचे...!



पुणे संवाद, पुणे, हाऊस ऑफ सक्सेस, भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे मॅनेजमेंट असोसिएशन आणि पुणे विद्यार्थी गृह यांच्या संयुक्त विद्यमाने 'नेक्स्ट जेन करिअर फेस्ट' या उपक्रमाअंतर्गत 'कला आणि करिअर' या विषयावरील प्रदर्शनी आणि मार्गदर्शन सत्रांचा समारोप नुकताच संपन्न झाला.

## मानवी मेंदू तंत्रज्ञानापेक्षा कायम वरिष्ठच : फडणीस


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कला या संवाद साधणाऱ्या आहेत. कॉम्प्युटर, लॅपटॉप, आयपॅड, एआय ही सगळी टूल्स आहेत कला नव्हेत. मानवी मेंदू तंत्रज्ञानापेक्षा कायम वरिष्ठच आहे. सर्जनशीलता, सृजन तसेच भावना ही या तांत्रिक माध्यमातून कधीच साकारली जाणार नाही याचे भान ठेवून कलाकाराने पुढे जायला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी केले.

संवाद, पुणे, हाऊस ऑफ सक्सेस, भारती विद्यापीठ स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्, पुणे मॅनेजमेंट असोसिएशन आणि पुणे विद्यार्थी गृह यांच्या संयुक्त विद्यमाने 'नेक्स्ट जेन करिअर फेस्ट' या उपक्रमाअंतर्गत 'कला आणि करिअर' या विषयावरील प्रदर्शनी आणि मार्गदर्शन सत्रांचा समारोप शि. द. फडणीस यांच्या उपस्थित झाला. त्या वेळी ते बोलत होते. सुनील महाजन, प्रसाद मिरासदार, शारंगधर साठे तसेच प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी, ज्येष्ठ चित्रकार मुरली लाहोटी, कॉलेज ऑफ फाईन आर्टच्या प्राचार्य डॉ. अनुपमा पाटील, चित्रकार प्रा. राधाकृष्ण पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रसाद मिरासदार यांनी केले तर मान्यवरांचा सत्कार सुनील महाजन यांनी केला.

## डॉ. उपेंद्र सहस्त्रबुद्धे यांना जळगावकर स्मृती पुरस्कार

**पुणे :** गानवर्धन संस्थेतर्फे प्रसिद्ध संवादिनी वादक डॉ. उपेंद्र सहस्त्रबुद्धे यांचा कै. पंडित अप्पासाहेब जळगावकर संवादिनी वादक पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे.



पुरस्कार वितरण समारंभ शनिवार, दि. २१ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता बेडेकर गणपती मंदिर, कोथरूड येथे आयोजित करण्यात आला असून पुरस्काराचे वितरण सुप्रसिद्ध व्हायोलिनवादक, पंडित अतुलकुमार उपाध्ये यांच्या हस्ते होणार आहे. शाल, सन्मानपत्र आणि रुपये दहा हजार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, अशी माहिती गानवर्धन संस्थेचे अध्यक्ष दयानंद घोटकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे.

शास्त्रीय संगीतामध्ये गायन, वादन आणि नृत्य यांना साथसंगत करणारे आणि संवादिनीला स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे सुप्रसिद्ध ज्येष्ठ संवादिनीवादक कै. पंडित अप्पासाहेब जळगावकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त त्यांचे शिष्य डॉ. उपेंद्र सहस्त्रबुद्धे यांचा गौरव करण्यात येत आहे. त्यांनी अनेक मोठमोठ्या कलाकारांना शास्त्रीय गायन, अभंग, नाट्यसंगीत अशा मैफिलीत साथसंगत केली आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त डॉ. सहस्त्रबुद्धे यांचा स्वतंत्र संवादिनी वादन कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर विदुषी कै. वीणा सहस्त्रबुद्धे यांची शिष्या, पुण्यातील युवा गायिका सानिका कुलकर्णी यांच्या शास्त्रीय गायनाची मैफल आयोजित करण्यात आली आहे. कलाकारांना प्रसिद्ध तबलावादक अमित जोशी साथसंगत करणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

# वारीच्या गर्दीवर 'एआय'ची 'नजर'...!

## पालखी सोहळ्यासाठी आधुनिक तयारी: पालखी सोहळा होणार सुरक्षित

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळयाला एक आगळीवेगळी परंपरा आहे. ताल, सूर आणि भक्ती या त्रिसूत्रींचा संगम झाल्याने हा पालखी सोहळा जगाच्या नकाशावर जाऊन पोचला असून या भक्तीमय अशा वातावरणात गेल्या काही वर्षांपासून परदेशी भक्तही मोठ्या भक्तीभावाने तल्लीन होउन सहभागी होत आहेत. या वारीतील भाविकांची संख्या पंधरा लाखाहूनही अधिक वारकरी या वारीत सहभागी झाले होते. त्यामुळे या गर्दीवर नियंत्रण ठेवताना पोलीस प्रशासनालाही काही प्रमाणात मर्यादा येत आहेत; ही बाब लक्षात घेऊन या वारीतील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यंदा 'एआय' चा आधार घेण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय पोलीस प्रशासनाने घेतला आहे.



" गेल्या काही वर्षांच्या कालावधीत वारीतील भाविकांना सुरक्षित सेवा देण्यासाठी पोलीसांच्या वतीने प्रयत्न करण्यात येत आहेत; त्यामध्ये पोलीसांना अपेक्षित यश येत आहे. तरीही त्यामध्ये अधिकाअधिक सूसूत्रता आणण्याचा पोलीसांचा प्रयत्न असणार आहे; त्याचाच एक भाग म्हणून यंदा हा प्रयोग करण्यात येणार असून त्यामध्ये निश्चितच यश येइल यामध्ये शंका नाही.

**-अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे शहर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू झाली आहे. यंदाचा सोहळा अधिक सुरक्षित व शिस्तबद्ध व्हावा, यासाठी पुणे पोलिसांकडून कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

यंदा १९ जूनपासून देहू व आळंदी येथून पालख्या प्रस्थान ठेवणार आहेत. लाखो भाविक सहभागी होण्याची शक्यता लक्षात घेता, गर्दीचे अचूक विश्लेषण करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. विश्रांतवाडी, संचेती चौक, गुडलक चौक, भैरवनाथ मंदिर, गाडीतळ आणि दिवे घाट या ठिकाणी AI-आधारित कॅमेरे बसवले जाणार आहेत. यामुळे भाविकांची संख्या, वाहनांची वर्दळ आणि संभाव्य अडथळ्यांची माहिती पोलिसांना वेळेत मिळणार आहे, असे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केले.



**वाहतूक व बससेवेचे नियोजन**

२० आणि २१ जून रोजी दोन्ही पालख्या पुणे शहरात मुक्कामी राहणार असून, २२ जूनला पहाटे हडपसरमार्गे पुढील प्रवासाला निघणार आहेत. यामुळे काही मार्गांवर वाहतूक बदल करण्यात आला आहे. दिवे घाट मार्ग पालखीच्या वेळी बंद ठेवण्यात येणार असून, सर्व बसेस बोपदेव घाट मार्गे वळवण्यात आल्या आहेत. पुणे महापालिकेने भाविकांच्या सोयीसाठी ६० जादा बससेवांचे नियोजन केले आहे.

### विशेष रेल्वेगाड्यांची सोय

● राज्यातील विविध भागांतून येणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेकडून ८० विशेष रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहेत. नागपूर, कोल्हापूर, अमरावती, खामगाव, लातूर आणि भुसावळ येथून या रेल्वेगाड्या थेट पंढरपूरला जातील. तसेच, पुणे-मिरज मार्गावर १६ अनारक्षित रेल्वे फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असून, या गाड्या ३ ते १० जुलैदरम्यान सकाळी पुण्यातून सुटून सायंकाळी मिरजला पोहोचणार आहेत.प्रत्येक रेल्वेत १२ सामान्य द्वितीय श्रेणी डबे व शयनयान कोच असतील. या सुविधेमुळे विशेषतः ग्रामीण भागातील भाविकांना पंढरपूरची वारी अधिक सुलभपणे करता येणार आहे.

### स्वयंसेवक आणि नियंत्रण केंद्रांचीही स्थापना

● वारकऱ्यांच्या सोयीसाठी विविध ठिकाणी नियंत्रण कक्ष व स्वयंसेवक नेमण्यात आले आहेत. प्रशासनाकडून वारकऱ्यांना योग्य दिशा व मदत मिळावी यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात आली आहे. वारकऱ्यांचा हा सांस्कृतिक आणि धार्मिक उत्सव यशस्वी व सुरळीत पार पडावा, यासाठी यंदा प्रशासन आणि पोलिसांकडून तांत्रिक व मानवी संसाधनांचा योग्य मिलाफ साधण्यात आला आहे.

## हिंजवडी मेट्रो अद्यापही 'यार्डात'च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे काम अंतिम टप्प्यात असले तरी काही तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणींमुळे या प्रकल्पाच्या पूर्णत्वात आणखी विलंब होणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) या प्रकल्पाची अंतिम मुदत मार्च २०२६ पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे.

या मेट्रो प्रकल्पाच्या मार्गामध्ये येणाऱ्या 'राजभवन'च्या परिसरातील भूमीचा ताबा घेण्यास सुरुवातीला प्रशासनाला नकार मिळाला होता. सुरक्षेच्या कारणास्तव कामाला मंजुरी मिळत नव्हती. अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेनंतर फेब्रुवारी महिन्यात जागेचा ताबा दिला गेला, मात्र प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या अद्यापही प्रक्रियेत अडकल्या आहेत.

२३.३ किलोमीटर लांबीच्या या मेट्रो मार्गावर एकूण २३ स्थानके असून, त्यातील बहुसंख्य ठिकाणी पूल बांधणी, रुळ टाकणे, सरकते जिने, सिग्नल यंत्रणा व विद्युत उपकरणांची बसवणूक आदी कामे ८५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाली आहेत. मात्र 'राजभवन'जवळील स्थानकाचे काम प्रलंबित असून, त्यामुळे संपूर्ण मार्गाची चाचणीही रखडली आहे.

या मेट्रो प्रकल्पाची संकल्पना हिंजवडीतील आयटी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसह सर्वसामान्य प्रवाशांना शहराच्या मध्यवर्ती भागात सहज पोहोचता यावे, यासाठी मांडण्यात आली होती. सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पास भूसंपादन, परवानग्या आणि निविदांतील प्रक्रिया यांमुळे सुरुवातीपासूनच विलंब झाला होता.

" या प्रकल्पासाठी आता उर्वरित काम, चाचण्या आणि तांत्रिक सुधारणा पूर्ण करण्यासाठी सुमारे दहा महिन्यांची अतिरिक्त मुदत आवश्यक आहे. तरीही हे काम लवकरात लवकर पूर्ण करुन या प्रकल्पाला गती देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवण्यात आला असून, लवकरच त्याबाबत अधिकृत निर्णय अपेक्षित आहे. एकदा परवानग्या पूर्ण झाल्यानंतर उर्वरित कामे गतीने पूर्ण केली जातील,

**-रिनाज पठाण,** मुख्य अभियंता, पीएमआरडीए

## भाऊसाहेब पाटणकर यांच्या शायरीवर विशेष कार्यक्रम

**पुणे :** कायझेन मीडिया आणि मावळा युवा क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे जिंदादिल शायर भाऊसाहेब पाटणकर यांच्या शायरीवर आधारित 'स्मरण - जिंदादिल शायर भाऊसाहेब पाटणकर' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रम शुक्रवार, २० जून रोजी सायंकाळी ५ वाजता सदाशिव पेठेतील भारतीय विचार साधना सभागृहात (भावे शाळा परिसर) आयोजित करण्यात आला आहे. अपर्णा जोग, शिल्पा देशपांडे, सुनीता कुलकर्णी यांचा कार्यक्रमात सहभाग असणार असून रंगत-संगत आणि आडकर फाऊंडेशनचे अध्यक्ष अॅड. प्रमोद आडकर, सिने दिग्दर्शक, अभिनेते तसेच भाऊसाहेब पाटणकर यांचे नातजावई किरण यज्ञोपवीत यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती विनायक माने यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## सहनशीलता, त्यागाचे मूर्तीमंत रूप म्हणजे रमाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला एकत्र करणारे, संघटित ठेवणारे संविधान दिले, जे जनतेला सर्वश्रेष्ठ मानते. अशा बाबासाहेबांच्या आयुष्यात आपल्या असाधारण त्याग, सहनशीलता, निष्ठेने रमाईंनी आगळेवेगळे स्थान निर्माण केले. रमाईंचे बाबासाहेबांच्या आयुष्यातील स्थान अनन्यसाधारण होते. रमाईंच्या स्मृती आंबेडकरी चळवळीचा प्रेरणास्रोत आहेत. त्या चळवळीचे आपण प्रणेते व्हावे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विधीज्ञ, अॅड. सुधाकरराव आव्हाड यांनी केले.

महामाता रमामाई भीमराव आंबेडकर यांच्या ९०व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रमाईंचे विचार घराघरात पोहचविणाऱ्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या अॅड. वैशाली चांदणे आणि रमाकांत म्हस्के यांचा रमाईरत्न स्मृती पुरस्काराने आव्हाड यांच्या हस्ते या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रमाई महोत्सवाचे अध्यक्ष अॅड. प्रमोद आडकर होते. महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष सचिन ईटकर, संयोजक विठ्ठल गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुणे महामाता रमामाई भीमराव आंबेडकर यांच्या ९०व्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रमाईंचे विचार घराघरात पोहचविणाऱ्या आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या अॅड. वैशाली चांदणे आणि रमाकांत म्हस्के यांचा रमाईरत्न स्मृती पुरस्काराने आव्हाड यांच्या हस्ते या कार्यक्रमात गौरव करण्यात आला.

# वैविध्यपूर्ण, मनमोहक नृत्याविष्कारांनी सजला 'रज महोत्सव'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** 'बनस्ते डाकीला गजा, बरसके थरे आसीची रज' यावरील ओडिशाचा पारंपरिक नृत्याविष्कार, 'रंगबती' लोकनृत्य, एकाच मंचावर सादर झालेल्या भरतनाट्यम, ओडिशी, गौडियो, कथकली, कथ्थक, कुचिपुडी, मोहिनीअट्टम, मणिपुरी, सात्रीया अशा वैविध्यपूर्ण, मनमोहक नृत्य नवरत्न कार्यक्रमातून रज महोत्सव सजला. नृत्यांतून उमटलेल्या हृदयस्पर्शी भावमुद्रा, नजाकत अन् अभिनयाने उपस्थितांची वाहवा मिळवली. मासिक पाळी आरोग्याबाबत जनजागृती आणि मातृत्वाचा सन्मान करण्यासाठी कलिंगा कला केंद्र ट्रस्टतर्फे ओडिशाच्या पारंपरिक 'रज महोत्सव २०२५' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित महोत्सवात भारतीय संस्कृती व परंपरेचे दर्शन घडले. नृत्यांगना व गायिका, कलिंगा कला केंद्र ट्रस्टच्या संस्थापक डॉ. ममता मिश्रा, ट्रस्टचे अध्यक्ष व आयपीएस संजीब पटजोशी, महासचिव संदीप राणा, सोंदिपा राणा, सुब्रकांता मोहंती, हिरकणी सोशल फाउंडेशनच्या सीईओ पूर्णिमा लुनावत, नृत्यांगना



स्वागतिका मोहापात्र, अनुपमा सेन, मीनाक्षी पुलगावकर, प्रायोजक लीना मोदी, उद्योजक अतुल गुंजाळ, अरविंद बुधानी, ट्रस्टच्या सहसचिव पौलमी चॅटर्जी, खजिनदार लोकनाथ सारंगी, सदस्य निक्षिता सारंगी यांची विशेष उपस्थिती होती. वेगवेगळ्या राज्यांच्या पारंपरिक नृत्याचे मिश्रण असलेल्या नृत्य नवरत्न या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. ओडिशा सरकारच्या ओडिया लँग्वेज लिटरेचर अँड कल्चरल डिपार्टमेंटच्या सहकार्याने हा महोत्सव पार पडला.

'बनस्ते डाकीला गजा, बरसके थरे आसीची रज' या सामूहिक नृत्याला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. डॉ. ममता मिश्रा, स्वागतिका महापात्रा, रश्मीता प्रसाद, स्मिता दास, अरुणिमा मोहंती, ओडिशी नृत्यांगना मधुमिता मिश्रा यांच्या शिष्यांनी डोळ्याचे पारणे फेडणारे सादरीकरण केले. नृत्य नवरत्न या कार्यक्रमात पुजायिता भट्टाचार्य (ओडिशाचे ओडिशी), पौलोमी साखळकर (पश्चिम बंगालचे गौडीयो), सुजा दिनकर (केरळचे मोहिनीअट्टम), धनिया मेनन (आंध्रप्रदेशाचे कुचिपुडी), मौसमी रॉय-देव (उत्तरप्रदेशाचे कथक), पारोमिता मुखर्जी (केरळचे कथकली), सुमना चॅटर्जी (मणिपूरचे मणिपुरी), योषा रॉय (आसामचे सात्रीया), प्रिया भट्टाचार्य (तामिळनाडूचे भरतनाट्यम) नृत्यप्रकार सादर केले. 'रंगबती' गाण्यावरील लोकनृत्याने उपस्थितांना ताल धरायला लावला. सर्व महिला कलाकारांना 'रज क्वीन'चा क्राऊन देऊन सन्मानित करण्यात आले.

" ओडिशामध्ये रज महोत्सवाला अनन्यसाधारण महत्व आहे. हा रज महोत्सव मासिक पाळी स्वच्छता आणि जागरूकता यांना संस्कृतीशी जोडतो. रज हा मूळ शब्द 'रजस्वला' आहे. हा चार दिवसांचा उत्सव असून, ओडिशात प्राचीन काळापासून साजरा केला जातो. हा धरणीमातेच्या मातृत्वाच्या तयारीचे प्रतीक आहे.

**-डॉ. ममता मिश्रा,** संस्थापक, कलिंगा कला केंद्र ट्रस्ट

# सुट्ट्यांमुळे वन विभागाला लाखोंची 'मेजवानी'...!

## पंधरा हजार पर्यटकांनी सिंहगडावर लुटला 'वर्षा विहारा' चा आनंद : वन विभागाला सव्वादोन लाखांचे उत्पन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**पुणे :** पर्यटकांसाठी सिंहगडाचे सौंदर्य नेहमीच अप्रूप असते; त्यातच पावसाच्या सरींनी न्हालेला सिंहगड, हिरवाईने नटलेले डोंगरदऱ्यांचे सौंदर्य आणि आल्हाददायक हवामान यामुळे शनिवार आणि रविवार असे सलग दोन दिवस सिंहगडावर पर्यटकांची अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळाली. सुट्टीचा शेवटचा दिवस आणि सोमवारपासून शाळांना सुरुवात होणार असल्याने नागरिकांनी कुटुंबीयांसह गडावर येत निसर्गाचा मनमुराद आनंद लुटला. विशेष म्हणजे शनिवार आणि रविवारच्या सुट्ट्यांच्या दिवशी तब्बल पंधरा हजाराहून अधिक पर्यटकांनी सिंहगडावर हजेरी लावली; त्यातून वन विभागाला सव्वादोन लाखांचे उत्पन्न मिळाले.

शनिवारी (ता. १४ जून) आणि रविवारी (ता. १५ जून) सिंहगडावर एकूण १५ हजारांहून अधिक पर्यटकांनी हजेरी लावली. यामध्ये २,५०४ दुचाकी आणि ९०० चारचाकी वाहनांद्वारे अंदाजे १०,५०० पर्यटक तर खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांद्वारे सुमारे ५,००० पर्यटक गडावर पोहोचले.

या दोन दिवसांत वाहनचालकांकडून उपक्रम शुल्काच्या माध्यमातून ₹२,१६,७०० इतकी रक्कम जमा झाली असून ती थेट 'घेरा सिंहगड' वनसंरक्षण समितीच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. ही रक्कम गडावरील स्वच्छता, वृक्षारोपण, पाणवठ्यांची देखभाल, पायवाटांचे संरक्षण आणि गडाच्या जैवविविधतेच्या संवर्धनासाठी वापरली जाते.

रविवारी विशेषतः पर्यटकांची संख्या अधिक झाल्याने सिंहगड घाटात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली. शेवटच्या तीन किलोमीटरच्या टप्प्यात अनेक पर्यटकांनी आपली वाहने रस्त्याच्या कडेला लावून पायी गड चढण्याचा पर्याय स्वीकारला. कोंढणपूर फाट्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या.



### बालचमूंनी लुटला निसर्गाचा आनंद

● पानशेत, खडकवासला आणि सिंहगड परिसरात सध्या पावसाचे आगमन झाले असून त्याने निसर्ग खुलवला आहे. त्यामुळे पुणेकरांसाठी सिंहगड हा पुन्हा एकदा मुख्य पर्यटन केंद्र ठरू लागला आहे. सोमवारपासून मुलांच्या शाळांना सुरुवात होणार असल्याने सुट्टीचा शेवटचा दिवस नागरिकांनी कुटुंबीयांसह गडावर येत निसर्गाचा मनमुराद आनंद लुटला.

### शिवप्रेमींनी तळीरामांची 'उतरवली'...!

● गडाचे पावित्र्य राखण्यासाठी गडावर मद्य घेऊन जाण्यास बंदी घालण्यात आली आहे, तरीही काही तळीराम मद्य घेऊन जात असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे.गडावर मद्य पानासह प्रवेश टाळण्यासाठी सुरक्षारक्षक सज्ज होते. याच अनुषंगाने दोन वाहनचालकांवर दारू सोबत घेऊन जाण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या दंडाची रक्कम देखील समितीकडे जमा करण्यात आली.



## सुनिता देव्हाडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**पुणे :** महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्या उत्तर विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी सुनिता विठ्ठलराव देव्हाडे यांची निवड करण्यात आली आहे. शिरूर तालुक्यातील श्री क्षेत्र रामलिंग येथील मंदिरात झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष अशोकराव मगर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मंगल आढाव, महिला आघाडीच्या माजी जिल्हाध्यक्षा अनिता मगर यांनी देव्हाडे यांना निवडीचे पत्र दिले. यावेळी रमेश राऊत, हरिभाऊ जाधव, नितीन कुटे, गणपत क्षीरसागर, रामदास जाधव, सनी राऊत, विठ्ठलराव देव्हाडे यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते. या बैठकीचे सूत्रसंचालन दत्तात्रय शिंदे यांनी केले.देव्हाडे पाटील यांनी यापूर्वी शिरूर तालुक्याच्या महिला आघाडीचे अध्यक्षपद यशस्वीरीत्या सांभाळले आहे. अध्यक्षपद ही मोठी जबाबदारी असून या पदाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणावर भर देण्यास माझे प्राधान्य राहणार आहे, त्याशिवाय समाजासह अन्य महिलांच्या सुरक्षेसाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असून महिलांना आर्थिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहे, अशी ग्वाही देव्हाडे यांनी निवडीनंतर बोलताना दिली.





## श्री शिवाजी मराठा कॉलेजमध्ये 'झाडे लावा' उपक्रम

**पुणे :** श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात 'झाडे लावा, झाडे जगवा' हा पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बजरंग सुतार, अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बापूसाहेब गणपत चौगुले उपस्थित होते. डॉ. बजरंग सुतार म्हणाले , जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न, पाणी, हवा आणि निवारा आपल्याला निसर्गातूनच मिळतो. पर्यावरणामुळे पृथ्वीवरील हवामानाचा समतोल राखला जातो, जैवविविधता टिकून राहते आणि मानवाचे आरोग्यही सुरक्षित राहते. मात्र पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे पूर, दुष्काळ, तापमानवाढ यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे झाडे लावणे, प्रदूषण कमी करणे, नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करणे आणि पर्यावरणाबाबत जनजागृती करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्रा. सुचिता जवळेकर यांनी सर्वांना पर्यावरण संवर्धनाची शपथ दिली. तसेच, आपल्या दैनंदिन जीवनात हरित सवयी आत्मसात करून आपण पर्यावरण रक्षणासाठी सक्रिय योगदान द्यावे,असे आवाहनही त्यांनी केले.

## २२ जून रोजी 'डिव्हाईन कॉन्फ्लुएन्स २०२५'

**पुणे :** भारतीय शास्त्रीय आणि आशियाई पारंपरिक कलांचा भव्य संगम घडवणारा 'डिव्हाईन कॉन्फ्लुएन्स २०२५' हा विशेष कार्यक्रम रविवार,दि.२२ जून रोजी सायंकाळी ६:३० वाजता गणेश कला क्रीडा मंच, पुणे येथे रंगणार आहे. कथक नृत्य, जपानी तायको ड्रम्स आणि आशियातील इतर पारंपरिक कला प्रकारांचा मनोहारी संगम रसिकांना अनुभवता येणार आहे.
हा कार्यक्रम मनीषा नृत्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा एक भाग असून, संस्थेने कथक नृत्य प्रशिक्षण व प्रसाराच्या क्षेत्रात दिलेल्या पाच दशकांच्या अमूल्य योगदानाचा गौरव करण्यासाठी आयोजन करण्यात आला आहे.

गुरु पं.मनीषा साठे यांचा जपानी तायको ड्रम्सचे विख्यात कलाकार यासुहितो ताकिमोतो यांच्यासोबत गेल्या तीन दशकांहून अधिक काळ चाललेला 'कलात्मक संवाद' या कार्यक्रमातून नव्या रूपात प्रकट होणार आहे.यावर्षीच्या 'डिव्हाईन कॉन्फ्लुएन्स' मध्ये कोरियन फॅन डान्स, ड्रॅगन डान्स, हेवन लेडी, चायनीज स्टिक डान्स यांसारख्या रंगतदार ओरिएंटल सादरीकरणांनी कार्यक्रमाची रंगत वाढणार आहे. कार्यक्रमातील खास आकर्षण म्हणजे 'नृत्यधारा' हे भावस्पर्शी कथक सादरीकरण, ज्यात एकाच कुटुंबातील तीन पिढ्यांतील पाच नृत्यांगना सहभागी होणार आहेत. या सादरीकरणात गुरु मनीषा साठे, त्यांची कन्या शांभवी दांडेकर,सून तेजस्विनी साठे आणि नातवंडे सर्वेश्वरी व आलपी यांचा समावेश आहे.

## तरुण पिढीमुळे रामराज्य येण्यास वेळ लागणार नाही

**पुणे :** सध्याची तरुणपिढी ही बुद्धिमान असून त्यांच्या मध्ये चांगली प्रयोगशीलता आहे. त्यामुळे भविष्यात देशात रामराज्य येण्यास वेळ लागणार नाही, असे मत संत साहित्याच्या अभ्यासक डॉ. आरती दातार यांनी व्यक्त केले. हिंदू महिला सभेच्या वतीने ऐतिहासिक रामायण - बालकांड कार्यक्रमाचे एस. एम. जोशी सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असताना डॉ. दातार बोलत होत्या.

टीम इतिहास यांच्यातर्फे 'ऐतिहासिक रामायण - बालकांड' या कार्यक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. आयटी अभियंता म्हणून काम करणारे आदित्य गोखले आणि आर्यमन लिमये या दोघांनी संशोधन करून या कार्यक्रमाचे लिखाण केले आहे. रामायणातील बालकांडामध्ये असणारा इतिहास, भूगोल, अध्यात्म, मानसशास्त्र या तरुणांनी पिंजून काढले असल्याने या कार्यक्रमाची उंची वाढली असल्याचे डॉ. दातार यावेळी म्हणाल्या. या कार्यक्रमात प्रणव बापट, सानिका पिंगळे, अथर्व कदम यांनी साथसंगत केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुप्रिया दामले यांनी केले. वंदना जोगळेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# 'यु टर्न' मुळे 'फटफजितीच'...!

### अहिल्यानगर रस्त्यावर वाहतूक कोंडी कायम; खुद्द आमदारही त्रस्त

पुण्याहून अहिल्यानगर हा महामार्ग अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. याच महामार्गाच्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगरसह राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरला याच महामार्गावरुन जावे लागते; त्याशिवाय मध्यप्रदेश या राज्यात जाण्यासाठी नागरिकांना याच महामार्गाचा वापर करावा लागतो. त्यातच गेल्या काही वर्षांच्या कालावधीत या परिसरातील नागरीकरण वाढले आहे; त्यातूनच या भागाला आर्थिक सुबत्ता आली असली तरीही या महामार्गाला वाहतूक कोंडीचे 'ग्रहण' लागले आहे; त्यामुळे ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पोलीसांनी 'यु टर्न' चा मार्ग अवलंबला आहे, तरीही हा मार्ग 'वळणावळणा' चा झाला असून त्यामुळे पोलीसांची 'फटफजिती' झाली आहे.



"वडगावशेरी मतदारसंघात वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. केवळ गती वाढवणारी वाहतूक नव्हे, तर नागरिकांसाठी सुरक्षित वाहतूक ही देखील तितकीच गरजेची आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती पावले उचलावीत.

**-बाप्पूसाहेब पठारे,** आमदार वडगावशेरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे-नगर रस्त्यावर वाढत चाललेली वाहतूक कोंडी, अपुऱ्या नागरी सुविधा, रस्त्यांची दुरवस्था आणि पादचारी मार्गांवरील असुरक्षितता यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. यासंदर्भात तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी महापालिका प्रशासन, वाहतूक शाखा आणि वाहतूक नियंत्रण विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

शहराच्या पूर्व भागातील येरवडा, शास्त्रीनगर, कल्याणीनगर, रामवाडी, विमाननगर, टाटा गार्डन, खराडी बायपास, जनक बाबा दर्गा, युवान आयटी पार्क, खराडी जकात नाका या परिसरात सिग्नल फ्री वाहतूक योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या माध्यमातून वाहतुकीचा वेग वाढला असला, तरी सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सुधारणा अद्याप प्रलंबित असल्याने नागरिकांचा उद्रेक वाढत आहे.

विमाननगर आणि चंदननगर परिसरातील भुयारी मार्गांची स्थिती अत्यंत दयनीय असून, ते तातडीने दुरुस्त करण्याची गरज असल्याचे आमदार पठारे यांनी स्पष्ट केले. या मार्गांमध्ये प्रकाशयोजना अपुरी असून, स्वच्छतेचा अभाव आहे. त्यामुळे नागरिकांना या मार्गांचा वापर करताना भीती वाटत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### अशा आहेत उपाययोजना

- बीआरटी मार्ग काढल्यानंतर विस्कळित झालेला दुभाजक रस्त्याच्या मध्यभागी पुन्हा बसवणे
- काही सेकंदांचे पादचारी सिग्नल उभारणे
- दुभाजक सुरू होणाऱ्या ठिकाणी प्रतिबिंबित फलक लावणे
- प्रमुख भागांकडे जाण्यासाठी दिशादर्शक आणि मार्गदर्शक फलक उभारणे
- वाहतूक नियंत्रणासाठी स्मार्ट सिग्नल यंत्रणा बसवणे

# ६६२ जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट रखडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरातील जुन्या पुलांचे व कल्व्हर्ट्सचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिकेने घेतला असला, तरी तज्ज्ञ सल्लागार नियुक्ती प्रक्रियेतच हा प्रस्ताव अडकून पडला आहे. त्यामुळे पुण्यातील सुमारे ६६२ पुलांची स्थैर्यता तपासण्याचे काम रखडले आहे.

शहरातून मुळा, मुठा, राम नदी, आंबील ओढा, माणिक नाला, नागझरी, भैरोंबा नाला अशा विविध मोठ्या नद्या आणि ओढ्यांवर जुने व लहान-मोठे असे अनेक पूल आहेत. बदलत्या हवामानामुळे अल्पावधीत मोठा पाऊस कोसळण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत पुलांची सुरक्षितता तपासणे अत्यावश्यक बनले आहे. नुकतेच मावळ तालुक्यातील कुंडमळा येथे पूल कोसळल्याची घटना घडल्याने या विषयाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.

महापालिकेच्या भवन विभागाने यापूर्वी शहरातील ९८ प्रमुख पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले होते. त्यापैकी ३८ पुलांमध्ये दुरुस्तीची गरज असल्याचे निदर्शनास आले होते. प्राथमिक टप्प्यात ११ पुलांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले. यामध्ये वि.भा. पाटील पूल (बोपोडी), एस.एम. जोशी पूल (नवी पेठ), वीर सावरकर पूल (कर्वे रस्ता), राजीव गांधी पूल (औंध), कात्रज गावठाण पूल, न्यू संगम ब्रीज आणि आगाखान ब्रीज (कल्याणीनगर) यांचा समावेश आहे.

या दुरुस्ती कामांमध्ये बीअरिंग बदलणे, एक्सपान्शन जॉइंट्स दुरुस्त करणे अशा तांत्रिक सुधारणा केल्या गेल्या. उर्वरित २७ पुलांसाठी सुमारे २७ कोटी रुपयांची आवश्यकता असून, चालू वर्षाच्या महापालिकेच्या अंदाजपत्रकात त्यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

दरम्यान, मागील वर्षी महापालिकेने शहरातील उर्वरित सुमारे ६६२ लहान पुलं आणि कल्व्हर्ट्सचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला होता. या कामासाठी पाच वर्षांच्या मुदतीसाठी तज्ज्ञ सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. या प्रक्रियेत तीन संस्थांनी सहभाग घेतला आहे. नियुक्ती झाल्यानंतर पहिल्या वर्षात सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यावर आधारित अहवाल सादर केला जाणार आहे. पुढील चार वर्षे दरवर्षी नियमित तपासणी करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता युवराज देशमुख यांनी दिली.

# गायन-वादनाच्या मैफलींनी बहरला संगीत महोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतीय अभिजात संगीत परंपरेतील विविध वाद्ये आणि कंठसंगीताच्या वैविध्यपूर्ण सुश्राव्य सादरीकरणांचा अनुभव रसिकांनी ७ व्या उस्ताद बाले खान स्मृती संगीत महोत्सवाच्या निमित्ताने घेतला. सतार, बासरी, सारंगी, तबल्याचे एकल तसेच सहवादनाचे आविष्कार या महोत्सवात रंगले आणि गायनाचे विविध रंगही रसिकांची दाद मिळवणारे ठरले.

पुण्यातील सुहाना बसंत फाउंडेशन आणि कन्नड संघ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला सतार नवाज उस्ताद बाले खान संगीत महोत्सव १४ व १५ जून रोजी रसिकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाला.यावर्षीचा महोत्सव पद्मविभूषण उस्ताद झाकीर हुसैन यांना समर्पित करण्यात आला होता. ख्यातनाम सतारवादक उस्ताद उस्मान खान, आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी, कन्नड संघाच्या अध्यक्षा मालती कलमाडी, उपाध्यक्षा इंदिरा सालीयान, पं. विजय कोपरकर, पं. राजेंद्र कुलकर्णी, पं. अतुलकुमार उपाध्ये, पं. अरविंदकुमार आझाद, पंडित सुधाकर चव्हाण, महोत्सवाचे आयोजक प्रसिद्ध सतारवादक रईस बाले खान आदी मान्यवरांच्या उपस्थितीत महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन झाले.




**पुणे** पुण्यातील सुहाना बसंत फाउंडेशन आणि कन्नड संघ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला सतार नवाज उस्ताद बाले खान संगीत महोत्सव १४ व १५ जून रोजी रसिकांच्या उदंड प्रतिसादात संपन्न झाला. महोत्सवाचे हे सातवे वर्ष असून या कार्यक्रमाचा रसिक पुणेकरांनी लाभ घेतला.

# डॉ. दीपक शिकारपूर यांच्या ६१ व्या पुस्तकाचे प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "अभिनव उद्योजकांची यशोगाथा" या डॉ. दीपक शिकारपूर लिखित पुस्तकाचे प्रकाशन पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक अध्यक्ष डॉ. आनंद देशपांडे यांनी केले. यावेळी लेखक डॉ. शिकारपूर, ज्येष्ठ उद्योजक दिलीप कुंभोजकर, युरोपातील "आरएमबीएफ"चे प्रमुख रॉबर्ट स्टेझिनर आणि एकविरा प्रकाशनचे भालचंद्र कुलकर्णी उपस्थित होते.



"आरएमबीएफ" आंतरराष्ट्रीय बिझनेक्स्ट कॉन्क्लेव्हमध्ये पहिल्या दिवशी (१३ जून) या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी बोलतांना डॉ. देशपांडे म्हणाले की, आम्ही दे-आसरा फाउंडेशनच्या माध्यमातून स्टार्टअप्ससाठी अनेक उपक्रम करत आहोत. अशा पुस्तकातून नवउद्योजक तरुणांना प्रेरणा मिळेल आणि अधिकाधिक उद्योजक तयार होतील, अशी शक्यता वाटते. उद्योग क्षेत्राच्या वाढीमुळेच देशाचा विकास होणार आहे. यावेळी रॉबर्ट स्टेझिनर म्हणाले की, वसुधैव कुटुंबकम ही भारताची संस्कृती आहे, त्यामुळेच उद्योजकांना एक चांगले व्यासपीठ मिळत आहे. प्रादेशिक भाषांमधून तरुणांना समजेल अशी पुस्तके आल्यानेच व्यवसाय वाढीस लागतील.

ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ असलेल्या डॉ. शिकारपूर यांचे हे ६१ वे पुस्तक आहे. ह्या प्रसंगी डॉ शिकारपूर म्हणाले "भारतीय अर्थव्यवस्थेत उद्योजक हे नावीन्य, रोजगार निर्मिती आणि आर्थिक वाढीचे मुख्य चालक आहेत. त्यांच्या योगदानामुळे अनेक घटकांचे जीवनमान उंचावते, उत्पादकता वाढते आणि संपत्तीची निर्मिती होते . एका दृष्टीने ते राष्ट्रनिर्माते आहेत असे मी समजतो"

# "शाळा शिकताना तहान भूक हरली... विठ्ठल नामाची शाळा भरली...!

## फटाक्यांची आतषबाजी; विद्यार्थ्यांचे औक्षण; फुलांचा वर्षाव, नव्याकोऱ्या पुस्तकांची भेट : शाळा प्रवेश दणक्यात

**तब्बल दीड ते दोन महिन्यांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर आज शहर, उपनगर, पिंपरी- चिंचवडसह जिल्ह्यातील शाळा आज दणक्यात सुरु झाल्या. नव्याने शाळेत दाखल होत असलेल्या काही विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते, तर आईला सहा ते सात तास सोडून शाळेत थांबावे लागणार असल्याने काही विद्यार्थ्यांचे चेहरे हिरमुसले होते. मात्र शाळेत जाताना होत असलेली फटाक्यांची आतषबाजी, फुलांचा वर्षाव, महिला शिक्षकांकडून होत असलेले औक्षण यामुळे हे विद्यार्थी चागलेच सुखावले होते. त्यातच शाळेच्या पहिल्याच दिवशी नवी कोरी पुस्तके हातात मिळाल्याने आणि आईबाबांनी हवे ते दप्तर तसेच टिफिनसह बॉटलही घेऊन दिल्याने त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता; त्यामुळे त्यांच्या मुखातून नकळत "शाळा भरताना तहान भूक हरली...विठ्ठल नामाची शाळा भरली...! या गाण्याच्या ओवी बाहेर पडत होत्या.**

# सुंदरबाई मराठे विद्यालयात प्रवेशोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खराडी येथील गेनबा सोपानराव मोझे संस्थेच्या सुंदरबाई मराठे विद्यालयात विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्षात आगळ्या वेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले .

आज शाळेचा पहिलाच दिवस आणि पहाटे पासूनच परिसरात मुसळधार पाऊस असताना सुद्धा ९५ टक्के मुले शाळेत स्वच्छ आणि नीटनेटक्या गणवेशात हजर होते.

शाळेची सुरूवातच " शाळा भरताना तहान भूक हरली...विठ्ठल नामाची शाळा भरली.. या गाण्याने झाली.. मुले शाळेत प्रवेश करीत असतानाच गाणे गुणगुणत इमारती मध्ये प्रवेश करीत होते त्यावेळी त्यांचे वर पुष्पवृष्टी करण्यात आली . ढोल ,ताशा, सनई वाद्याचा सुरात, फुग्यांची सजावट ,रांगोळी काढून औक्षण आणि गुलाब पुष्प देऊन मुलांचे स्वागत करण्यात आले, या वेळी संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मोझे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मोझे शाळा समिती अध्यक्षा श्रीमती अलका पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय सोमवंशी,पर्यवेक्षक सुनील वळसे, उपस्थित होते. संजय हुंबे, जेम्स साखरे,रोहित डामरे, दीपक सोनवणे आणि विद्या कव्हेकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.





# नू.म.वि मुलींची प्रशालेत प्रवेशोत्सव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण प्रसारक मंडळीच्या नू.म.वि मुलींची प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रशालेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगलोरकर , डायरेक्टर ऑपरेशन्स श्रीरंग कुलकर्णी तसेच उपासनी , घोणे , श्रीपाद पवार , राख उपस्थित होते . प्रशालेच्या विद्यार्थिनींनी बँडच्या गजरात सर्व नवीन प्रवेशित विद्यार्थिनींचे स्वागत केले .याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते पाचवी ते आठवीच्या विद्यार्थिनींना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले व भेटवस्तू देण्यात आल्या.



प्रशालेच्या मुख्याध्यापिका वर्षा गुमास्ते , उपमुख्याध्यापिका उल्का पाटणे ,पर्यवेक्षिका संगीता गौड यांनी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनींचे औक्षण करून स्वागत केले. प्रशालेच्या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले ,महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेत विद्यार्थिनींना शालेय शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थिनी व पालक यांच्याशी सुसंवाद साधत प्रशालेच्या मुख्याध्यापिका वर्षा गुमास्ते यांनी इयत्ता दहावी व बारावीचा निकाल सांगत उज्वल यशाची परंपरा कायम ठेवण्याची खात्री दिली. तसेच शि . प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे सदस्य सुधीर काळकर आणि शाळा समिती अध्यक्ष व नियामक मंडळ सदस्यजयंत किराड यांचे भेटवस्तू व मार्गदर्शन यासाठी आभार मानले.. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमिला साळवे यांनी केले.

# 'माय फर्स्ट डे ॲट स्कूल' व 'छत्रीतून अक्षरांचा पाऊस

## 'संकल्पनेचे पालकांकडून कौतुक



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** जुनी सांगवीतील अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या लिटल फ्लॉवर इंग्लिश मिडीयम स्कुल व भारतीय विद्यानिकेतन विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी बालचमुंचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेला होता. शाळेविषयी आपुलकी आणि आवड निर्माण व्हावी, यासाठी 'माय फर्स्ट डे ॲट स्कूल', तसेच 'छत्रीतून अक्षरांचा पाऊस' ही संकल्पना राबविण्यात आली.

शाळेमध्ये प्रवेश करणारे बालक व त्यांना शाळेत सोडायला आलेले पालक यांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी अरविंद सोसायटीच्या अध्यक्षा आरती राव, प्रशालेचे सचिव प्रणव राव, भारतीय विद्यानिकेतनच्या मुख्याध्यापिका आशा घोरपडे, लिटल फ्लॉवरच्या मुख्याध्यापिका नीलम पवार, लिटल फ्लॉवर प्री प्रायमरी स्कुलच्या मुख्याध्यापिका इशिता परमार, पर्यवेक्षिका स्मिता बर्गे, पर्यवेक्षिका प्रीती पाटील, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक उपस्थित होते.

ज्ञानाचा प्रारंभ हा सर्जनशील आनंदातून होत असतो.

विद्यार्थ्यांनी नेहमी आनंदातून शिक्षण घ्यावे, म्हणून यावर्षी खास 'छत्रीतून अक्षरांचा पाऊस' ही संकल्पना राबवण्यात आली. छत्रीतून विविध रंगाची कागदी अक्षरे हळुवारपणे विद्यार्थ्यांवर पडत होती, हे दृष्य नयनरम्य भासत होते. तितकेच ते भावनिक आणि शैक्षणिकदृष्ट्या प्रेरणादायी होते. हा अभिनव प्रयोग पालक व विद्यार्थ्यांसाठी विशेष कौतुकास पात्र ठरला.

प्रवेशद्वारावर फुलांची आरास, रांगोळी, फलकलेखन करून वातावरण प्रफुल्लित केले होते. विद्यार्थी जणू आपण सेलिब्रेटीच आहोत, अशा थाटात वावरत होते. विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट ठेवण्यात आला होता. तसेच मुलांना चॉकलेट व स्माइली स्टिकर्स देण्यात आली. शाळेच्या पहिल्या दिवशी कोणत्याही प्रकारचे पुस्तकी शिक्षण न देता विद्यार्थ्यांकडून विविध ॲक्टिव्हिटी करून घेतल्या.

आरती राव म्हणाल्या, की जून महिना म्हटलं की मृग नक्षत्र व पावसाला सुरुवात होते, ज्याप्रमाणे नैसर्गिकरीत्या ग्रामीण व्यक्तीच्या आयुष्यात चेतना निर्माण करणारा दिवस असतो. तसाच विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनात त्यांचे आयुष्य घडवणारा दिवस म्हणजे त्यांच्या शाळेचा पहिला दिवस. त्यांच्या जीवनाला एक दिशा व आकार देणारा दिवस आहे. प्रणव राव यांनी बालचमुंना चालू शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

# नवे वर्ग, नवे मित्र आणि नवीन स्वप्नं

## पिंपळे सौदागर येथे नाना काटेंकडून विद्यार्थ्यांचे स्वागत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस..यानिमित्त पिंपळे सौदागर येथील प्राथमिक शाळा क्रमांक ५१ येथे माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फुले देऊन स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी आयोजित प्राथमिक शाळेतील मुलांचे पहिले पाऊल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाची माजी .विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली.

तसेच विठ्ठल उर्फ नाना काटे हस्ते प्रथम दिवसाचे आकर्षण असणारी शालेय पाठयपुस्तकांचे व शालेय वस्तूंचे किट तसेच गणवेश वाटप यावेळी विद्यार्थ्यांना करण्यात आले.

याप्रसंगी पालिकेच्या संगणक विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता मा. नीलकंठ पोमन साहेब,मुख्याध्यापिका श्रीमती सुरेखा गेंगजे मॅडमबालवाडीच्या पर्यवेक्षिका खंडागळे ,आकांशा फौंडेशन चे सदस्य ,उद्योजक सोमनाथ खेडेकर व सर्व शिक्षक वृंद तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व समिती सदस्य, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# गुलाबपुष्प देऊन महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे स्वागत

## शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळाच्यावतीने आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आयुष्यात ध्येयाचा एवरेस्ट गाठण्यासाठी अभ्याससोबतच साहसी खेळात देखील विद्यार्थ्यांनी सहभागी झाले पाहिजे. देशासाठी, समाजासाठी काही तरी चांगले काम करण्याचा संकल्प करीत विद्यार्थ्यांनी शाळेत पाऊल ठेवले. पुणे महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प आणि रेवडी देऊन स्वागत यावेळी करण्यात आले. त्यांच्या स्वागताला आंतरराष्ट्रीय पुरस्काराप्राप्त साहसी गिर्यारोहक उमेश झिरपे व आमदार हेमंत रासने यांची प्रमुख उपस्थिती होती.

शुक्रवार पेठेतील सेवा मित्र मंडळ यांच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यानिकेतन क्रमांक १ आणि डॉ. वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यानिकेतन या शाळेतीमल विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक, प्रशासकीय अधिकारी सुनंदा वाखारे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आनंद सराफ, अखिल मंडई मंडळाचे विश्वास भोर, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष पराग शिंदे, शिरीष मोहिते, अमर लांडे, विक्रांत मोहिते आदी यावेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप देखील यावेळी करण्यात आले.





पुण्यात विद्यानिकेतनच्या २० शाळा आहेत. या शाळांमधून अनेक हुशार मुले पुढे आली आहेत. त्यांना मिळालेल्या मदतीच्या सहाय्याने मोठी उंची गाठली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी लहानपणीच मोठी स्वप्ने पहा आणि कायम प्रयत्नशील राहा. शाळेतील कर्तृत्ववान विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत नक्की करू.

**-आमदार हेमंत रासने**

उमेश झिरपे म्हणाले, शालेय अभ्यासाला साहसाची जोड दिली पाहिजे. गिर्यारोहणामुळे नेतृत्व गुण आणि संघ भावना निर्माण होते. प्रत्येकाला आयुष्यात एक 'एव्हरेस्ट' गाठायचा असतो, परंतु ते साध्य करताना शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त असले पाहिजे. यासाठी प्रत्येकाने गिर्यारोहण केले पाहिजे. आनंद सराफ यांनी मनोगत व्यक्त केले.

# 'तेर एन्व्हायरॉथॉन' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** तेर पॉलिसी सेंटरच्या वतीने आयोजित 'तेर एन्व्हायरॉथॉन – रन फॉर एन्व्हायर्नमेंट' या पर्यावरण संवर्धनासाठीच्या विशेष उपक्रमाला रविवारी, १५ जून रोजी पुण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पहाटे ४.३० वाजता पुणे ग्रामीण पोलीस हॉकी ग्राउंड (पाषाण) येथून या स्पर्धेला सुरुवात झाली.या स्पर्धेत ७०० हून अधिक पर्यावरणदूत आणि नागरिक सहभागी झाले होते. स्पर्धा ही केवळ धावण्याची स्पर्धा न राहता पर्यावरणाविषयी जागर आणि प्रत्यक्ष कृती करण्याचा संकल्प ठरली. स्पर्धेच्या निमित्ताने प्रत्येक सहभागीमागे एक झाड लावण्याचा संकल्प तेर पॉलिसी सेंटरने केला, हे या उपक्रमाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले.

स्पर्धा तीन, पाच आणि दहा किलोमीटर अशा तीन गटांमध्ये पार पडली. १२ ते १८, १९ ते ४०, ४१ ते ५५ आणि ५६ वर्षांवरील अशा वयोगटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. १० कि.मी. गटासाठी रोख पारितोषिके, तर इतर गटांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली होती. अनेक नामवंत कंपन्यांचे गट यामध्ये सहभागी झाले.कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी टाटा ब्लू स्कोप चे अजय रतन, श्री. गोविंद, गुगल कंपनीचे विजय कुमार, श्री.उमेश पाहुणे म्हणून उपस्थित होते. पारितोषिक वितरण समारंभासाठी निवृत्त ज्येष्ठ पोलिस अधिकारी मधुकर झेंडे, पर्यावरणासाठी भारतभर धाव घेणारे आणि श्रीनगर ते खारडुंगला ही पर्यावरण दौड पार पाडणारे कर्नल भूपेंद्र सुब्बू, बसंत प्रधान, अनुप बनिया, लव बर्मन या चार पर्यावरणप्रेमींनी उपस्थित राहून उपस्थितांना प्रेरणा दिली. सौ.प्रिया जैन-बीडकर यांनी सूत्रसंचालन केले.

# पालिका आयुक्तांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीचा उत्सव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाळा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम संत रामदास स्वामी प्राथमिक विद्यालय मनपा शाळा क्र. ४२ (मराठी) व शाळा क्र. ३७ (कन्नड) येथे आज मोठ्या उत्साहात पार पडला.

पहिल्या घंटेसोबतच शाळा परिसरात आनंदी वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटासोबतच फुगे, फुलांच्या माळा, ढोल-लेझीमच्या गजरात नवागतांचे स्वागत करण्यात आले. रंगीबेरंगी रांगोळ्या व गुलाब पुष्प देत शाळेच्या प्रवेशद्वारावरच नवोदित विद्यार्थ्यांना आनंददायी स्वागत मिळाले.

या प्रसंगी पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना नवीन वर्षासाठीच्या पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी आयुक्तांनी दोन्ही शाळांची पाहणी करत, शाळेतील उपक्रम, ग्रंथालय व संगीत कक्षाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी सामान्य ज्ञानाशी संबंधित प्रश्न विचारून त्यांच्या आत्मविश्वासाचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला विजयकुमार थोरात (उपआयुक्त, शिक्षण विभाग), सुनंदा वाखारे (प्रशासकीय अधिकारी), गोविंद दांगट (सहाय्यक आयुक्त, घोले रोड क्षेत्रीय कार्यालय), गव्हाणे (अधीक्षक अभियंता), शिल्पकला रंधवे (सहायक प्रशासकीय अधिकारी), विभागीय पर्यवेक्षक, दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पुणे विद्यार्थ्यांच्या किलबिलाटासोबतच फुगे, फुलांच्या माळा, ढोल-लेझीमच्या गजरात नवागतांचे स्वागत करण्यात आले. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांच्या हस्ते एपस्थित विद्यार्थ्यांना नवी कोरी पुस्तके देण्यात आली.

# 'एमआयटी एडीटी'त 'इ-मोबिलिटी' उत्कृष्ठता केंद्राचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

पुणे : इलेक्ट्रीकल वाहने भारतासह जगाचे भविष्य आहेत. परंतू, अद्यापही काही गैरसमज असल्याने लोक अपेक्षितरित्या इलेक्ट्रीकल वाहनांची खरेदी करत नाहीत. इलेक्ट्रीक चारचाकी वाहनांना चालविण्यासाठीचा खर्च इतर इंधनांपेक्षा अतिशय अल्प आहे. केवळ या वाहनांबद्दल आणि त्यांच्या बॅटरी आयुष्याबद्दलचे गैरसमज दूर करण्याची गरज असून ते केल्यास भारतात इलेक्ट्रीक वाहनांची विक्रमी विक्री होईल, असे मत टाटा मोटर्सचे मुख्य मानव संसाधन अधिकारी सिताराम कंदी यांनी व्यक्त केले.



एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे येथे यांत्रिक विभाग व इम्पीरियल सोसायटी ऑफ इनोव्हेटिव्ह इंजिनिअर्स (आयएसआयई) प्रा. लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'इ-मोबिलिटी'मधील उत्कृष्टता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी, एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनिता कराड, अवजड उद्योग मंत्रालयाचे उत्पादन क्षेत्राचे उपसचिव गौरव जोशी, कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव प्रा.डॉ.महेश चोपडे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंगचे संचालक डॉ. विरेंद्र शेटे, अधिष्ठाता डॉ.सुदर्शन सानप, यांत्रिक विभाग प्रमुख डॉ.सचिन पवार, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुराज भोयार, इव्ही कार्यक्रम संचालक प्रा.शशांक गावडे आदी उपस्थित होते.

कंदी म्हणाले, टाटा मोटर्स आणि एमआयटी एडीटी यांच्यात अनेक वर्षांपासून सामंजस्य करार असून त्या अन्वये एमटेक इन ईव्ही टेक्नॉलॉजीची पहिली बॅच यंदा पास होवून बाहेर पडली याचा मनस्वी आनंद आहे.



या सेंटरमुळे विद्यार्थ्यांना इव्ही बॅटरी मॅनेजमेंट सिस्टीम, चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर आणि ग्रीन टेक्नॉलॉजीसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये थेट प्रात्यक्षिक प्रशिक्षणाची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांना नवकल्पना, संशोधन आणि स्टार्टअप्ससाठी उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देणारे हे सेंटर, देशाच्या आर्थिक व पर्यावरणीय विकासात मोलाचे योगदान देईल.

**-प्रा.डॉ.सुनिता कराड;**
कार्यकारी संचालक,

# शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत पक्षप्रवेश

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून जाहीर प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील शेकडो युवा, महिला कार्यकर्त्यांनी शिवसेनेचे मुख्य नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. खासदार श्रीरंग बारणे यांनी शिवबंधन बांधून सर्वांचे पक्षात स्वागत केले. महापालिका निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना दिल्या.

थेरगाव येथील जनसंपर्क कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यावेळी शिवसेना महिला नेत्या सुलभा उबाळे, युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, शिवसेना जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, उपजिल्हा प्रमुख राजेश वाबळे, दिलीप पांढरकर, शहरप्रमुख निलेश तरस, पिंपरी-चिंचवड युवासेना जिल्हा प्रमुख राजेंद्र तरस, युवासेना जिल्हा प्रमुख सागर पाचरणे, पिंपरी-चिंचवड महिला संघटिका सरिता साने, युवतीसेना जिल्हा प्रमुख सायली साळवी, माजी नगरसेवक बाळासाहेब ओव्हाळ, माजी नगरसेविका विमल जगताप, संतोष सौंदनकर, अंकुश कोळेकर, दिलीप कुसाळकर, कानिफनाथ तोडकर, प्रदीप दळवी, स्वरूपा खापेकर, शारदा वाघमोडे, कार्यकर्ते महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चिंचवड विधानसभा संघटक सुदर्शन देसले, शहर संघटिका शिला भोंडवे, रमेश विश्वकर्मा यांच्या प्रयत्नातून हा भव्य पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी सुरेश विश्वकर्मा, राजेश विश्वकर्मा, आदित्य यादव, भाविक गोडसे, अभिषेक गुप्ता, अंकुश यादव, प्रितीताई भुजबळ यांच्यासह शेकडो कार्यकर्ते शिवसेनेत सामील झाले.

राज्यभरात शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित दररोज पक्ष प्रवेश होत आहेत. त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवड शहरातही मोठ्या संख्येने पक्षप्रवेश होत आहेत

### युवा सेनेच्या माध्यमातून संघटना मजबूत

● पिंपरी-चिंचवड शहरात युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेने संघटना वाढीवर भर दिला आहे. युवा सेनेच्या माध्यमातून संघटना मजबूत होत आहे. विविध पक्षातील कार्यकर्ते पक्षात प्रवेश करीत आहेत. घरोघरी जाऊन संघटन वाढविले जात आहे. शिवसेनेच्या सभासद नोंदणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे.




## "पीएसबी एचआर एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड" सोहळा उत्साहात संपन्न

**पिंपरी :** उद्योग व्यवसायाच्या दैनंदिन कामकाजात 'एचआर'ची भूमिका आव्हानात्मक असते. कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच येणाऱ्या प्रत्येक समस्या, प्रश्न यांचा विचार करून निर्णय घ्यावे लागतात. त्यामुळे उद्योग व्यवसायाचे परिचालन नियमित गतीने सुरू ठेवणे शक्य होते, असे मत पुनावाला फाउंडेशनच्या अध्यक्षा पद्मश्री डॉ. लीला पुनावाला यांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित, पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) आणि पुणे बिझनेस स्कूलच्या (पीबीएस) वतीने "एचआर एक्सलन्स अ‍ॅवॉर्ड – २५" सोहळा शनिवारी (दि. १४) बालेवाडी येथे पार पडला. यावेळी पीसीसीओईचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, पुनावाला फाउंडेशनचे फिरोज पुनावाला, कोरियन असोसिएशनचे भारतातील प्रतिनिधी एडगर ली, निरंतरा इकोचे प्रसन्न राव, महाराष्ट्र इकॉनोमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे उपाध्यक्ष सचिन इटकर, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, पीसीसीओईचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पीसीईटी प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ शीतलकुमार रवंदळे, पीबीएस संचालक डॉ. गणेश राव, अधिष्ठाता डॉ. मिनाक्षी त्यागी, आशिष गाकरे आदी उपस्थित होते.



## कुंडमळा येथील घटना अतिशय दुर्दैवी – खा. बारणे

**मावळ :** मावळ तालुक्यातील इंदोरी येथील कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील लोखंडी पादचारी पूल कोसळून झालेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. या घटनेत तीन पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. पाण्यात वाहून गेलेल्या पर्यटकांचे शोधकार्य सुरू आहे. हा पूल जीर्ण झाला होता. असे जीर्ण पूल तातडीने दुरुस्त करण्याची मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी केली. खासदार बारणे म्हणाले, कुंडमळ्यात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक गर्दी करतात. कुंडमळा नदी ओलांडण्यासाठी, या बाजूवरून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठीचा हा पूल आहे. पूल जीर्ण झाला आहे. दोन दिवसांपूर्वीच मावळातील प्रशासनासोबत बैठक घेतली होती. पर्यटन स्थळावर अधिकचा बंदोबस्त तैनात करण्याच्या सूचना दिल्या होत्या. कुंडमळ्यातील लोखंडी पूल जीर्ण झाला होता. मावळात मोठी पर्यटन स्थळे आहेत. अनेक ठिकाणच्या पुलंची दुरवस्था झाली आहे. तातडीने ते दुरुस्त करावेत.कुंडमळ्यातील दुर्घटनेत जखमी झालेल्यांना सर्वतोपरी मदत केली जात आहे. सोमटणे येथील रुग्णालयात दाखल केले आहे. डॉक्टरांच्या संपर्कात असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

# पिंपरी चिंचवडसाठी अभिमानाचा क्षण

## १६ पिंपरी-चिंचवडकरांचा सातासमुद्रापार डंका

### ९० किलोमीटरची कठीण मॅरेथॉन केली पूर्ण

> यावर्षी ४५७ भारतीयांनी त्यात भाग घेतला.त्यात तब्बल ९९ स्पर्धक हे पुणे जिल्ह्यातील होते.महाराष्ट्रातून अमरावतीचा देव चौधरी याने सात तास तीन मिनिटे अशी सर्वोत्तम वेळ नोंदवली.या स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रत्येकाला सव्वा लाख ते दीड लाख खर्च आला
>
> -पांडुरंग बोडके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पिंपरी :** गिनिज बुक मध्ये नोंद जगातील सर्वात कठीण,लांब पल्याची दक्षिण आफ्रिकेतील यावर्षीची ९८ वी कॉमरेडस मॅरेथॉन नुकतीच झाली.ती १६ पिंपरी-चिंचवडकरांनी पूर्ण करीत दक्षिण आफ्रिकेत भारताचा तिरंगा डौलाने फडकावला.त्याबद्दल त्यांच्यावर उद्योगनगरीतून कौतुकाचा वर्षाव सुरु आहे.त्यांच्यातील प्रकाश ठोंबरे यांनी सलग चार,तर धनराज हेळंबे आणि पांडुरंग बोडके या पिंपरी-चिंचवडकरांनी सलग ३ वेळेस ती पूर्ण करीत शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

जगभरातील २० हजार ९७२ स्पर्धक तथा अ‍ॅथलिट शंभर वर्षे जुन्या या स्पर्धेत सहभागी झाले.कोरोना महामारीचा फटका या स्पर्धेला २०२० आणि २०२१ ला बसला. अन्यथा या वर्षी २०२५ ची ही स्पर्धा शंभरावी ठरली असती. दरवर्षाप्रमाणे जगात धावण्यात दरारा असलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या धावपटूंनीच यावर्षी विजेतेपदावर मोहोर उमटवली. त्यांचे टेटे डिजाना (पुरुष) आणि गेर्डा स्टेन (महिला) हे विजेत ठरले. त्यांनी अनुक्रमे पाच तास २५ मिनिटे २८ सेंकद आणि पाच तास ५१ मिनिटे १९ सेंकद एवढा वेळ नोंदवला. तर, भारतासह जगभरातील स्पर्धकांना त्यासाठी सात तासांहून जास्त वेळ लागला. दहा तासाच्या आत, ती पूर्ण केली,तरच प्रमाणपत्र आणि पदक भेटते, असे या स्पर्धेत ती चांगल्या वेळेत (नऊ तास ४२ मिनिटे) पूर्ण करणाऱ्या बोडके यांनी सांगितले.

त्यांची औषध दुकांनाची साखळी आहे.यावर्षी त्यांच्यासह डॉ.धनराज हेलंबे, वैभव माळी, प्रकाश ठोंबरे, शिवाजी खुळे, मच्छिंद्र शिंदे, सचिन घारे, रोहित क्षीरसागर, दत्तात्रय चौधरी, अवनीश कुमार, संजय सिर्सवा, संतोष गायकवाड, सिद्धार्थ वाघ,आदित्य वागरे, प्रसन्नप्रिया रेड्डी आणि अजय काळे यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन ती पूर्ण केली. त्याबद्दल माजी नगरसेवक राहूल कलाटे यांनी या सर्वांचे अभिनंदन केले. त्यांचे हे यश प्रेरणा देणारे असून, पिंपरी चिंचवडसाठी हा अभिमानाचा क्षण असल्याचे ते म्हणाले.

दरवर्षी दक्षिण आफ्रिकेतील दोन शहरांदरम्यान ही स्पर्धा होते.एकावर्षी ती चढाच्या रस्त्यावर झाली,तर दुसऱ्या वर्षी ती उतारावर होते. यावर्षी ती सकाळी पावणेसहा वाजता सुरु झाली. शेवटच्या वीस किलोमीटरमध्ये ओनालेना खोंखोबे याला मागे टाकीत डिजानाने आघाडी घेत ती शेवटपर्यंत टिकवली. शेवटच्या दहा किलोमीटरमध्ये त्याने आपला वेग आणखी वाढवित विजेपदाला गवसणी घातली. पहिल्या दहामध्ये सहा दक्षिण आफ्रिकन धावपटू आहेत. स्पर्धेचया महिला गटाचत झांबियाची धावपटू एलिझाबेथ मुकोलोमा मध्यंतरापर्यंत आघाडीवर होती.परंतू,नंतर स्टेनने आघाडी घेतल्यानंतर तिने कधीही मागे वळून पाहिले नाही.या स्पर्धेतील विजेता,उपविजेत्यासह पहिल्या दहा क्रमाकांना लाखो रुपयांचे बक्षिस असते. २००८ पासून भारतीयांनी या स्पर्धेत सहभाग घेण्यास सुरवात केली.

# तीन दिवसांवर पालखी सोहळा मात्र खड्डे जैसे थे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी :** महामेट्रो, अर्बन स्ट्रीट आणि जलवाहिनीच्या कामासाठी केलेल्या रस्तेखोदाईमुळे निगडी ते पिंपरी या सेवा रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. वाहतूक नियंत्रण दिव्यांचा कालावधी अधिक असल्याने वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागत आहेत. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. निगडी ते पिंपरी मार्गावर महामेट्रोचे काम सुरू आहे. मेट्रोचे खांब उभारण्यासाठी खोदाई केली आहे. यासाठी सुरक्षा कठडे उभारले असून, त्याच्या आत हे काम सुरू असते. या कामामुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. बीआरटी मार्गामध्ये जलवाहिनीची खोदाई सुरू आहे.

त्यामुळे पीएमपी बससुद्धा सेवा रस्त्यावरूनच धावत आहेत. सेवा रस्त्याची रुंदी कमी झाल्याने यातून मार्ग काढताना वाहनचालकांना मोठीच कसरत करावी लागत आहे. निगडी, आकुर्डी, चिंचवड, मोरवाडी या सर्व महत्त्वाच्या चौकांतील सिग्नलचा कालावधी अधिक असल्याने वाहनांच्या दूरपर्यंत रांगा लागत आहेत. सकाळी आणि सायंकाळच्या वेळी अर्धा किलोमीटर अंतरासाठी चालकांना वीस मिनिटे लागत आहेत.

### पालखी मार्गावर खड्डे

● श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहूतून १८ जून रोजी प्रस्थान होणार असून, १९ जून रोजी ती आकुर्डीत मुक्कामी असणार आहे. निगडीतील भक्ती-शक्ती चौकात पालखी सोहळ्याचे पालिकेच्या वतीने स्वागत केले जाते. मात्र, या चौकात मेट्रो मार्गासाठी मोठ्या प्रमाणात खोदाई सुरू आहे. पिंपरीपर्यंत मेट्रो, अर्बन स्ट्रीट, जलवाहिनीसाठी रस्तेखोदाई सुरू आहे. खड्डे पडले आहेत. पालखी सोहळा पाच दिवसांवर आला असताना मार्गावरील हे खड्डे कायम आहेत.

## वाय.सी.एम.हॉस्पिटल रक्तकेंद्रात 'जागतिक रक्तदाता दिन' साजरा



**पिंपरी :** जागतिक आरोग्य संघटनेद्वारे 2004 पासून दरवर्षी प्रसिद्ध वैद्यकशास्त्रज्ञ, नोबेल पारितोषिक विजेते डॉ. कार्ल लँडस्टिनर यांचा जन्मदिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिवसाच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपाच्या वाय.सी.एम. हॉस्पिटल रक्तकेंद्राने शहरातील विविध ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.


यावर्षीच्या "रक्त देऊया, आशा जागवूया : एकत्रितपणे जीव वाचवूया !" या संकल्पनेवर आधारित जागतिक रक्तदाता दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी पिंपरी चिंचवड मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे वाय.सी.एम. हॉस्पिटल विभाग प्रमुख तथा अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, वाय.सी.एम हॉस्पिटल रक्तकेंद्राचे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. नीता घाडगे, चिंचवड देवस्थान ट्रस्टचे श्री. घोडके रक्ताचे नाते ट्रस्टचे सुहास हिंगणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

# ४०० हून अधिक विद्यार्थ्यांचा गुणगौरव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** आरंभ सोशल फाउंडेशन आयोजित विद्यार्थी गुणगौरव समारंभ व करिअर मार्गदर्शन शिबीर समारंभ रविवारी दि.१५ जून २०२५ रोजी आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकाराम नगर, पिंपरी येथे उत्साहात पार पडला. पिंपरी चिंचवड शहरातील चारशेहून अधिक दहावी, बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. शहराचे माजी उपमहापौर तुषार हिंगे, आरंभ फाऊंडेशनच्या संचालिका सोनाली तुषार हिंगे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. टॅब, स्मार्ट वॉच, बॅग आणि प्रशस्तिपत्रक असे बक्षिसांचे स्वरूप होते.

या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून युवा मित्र सौमित्र पोटे यांनी मार्गदर्शन केले. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे माजी सदस्य सदाशिव खाडे, भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, मंडल अध्यक्ष जयदीप खापरे, आयआयबी शिक्षण संस्थेचे अ‍ॅड महेश लोहारे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामदास अण्णा लुक्कर, आदी मान्यवर उपस्थित होते. निवेदक अक्षय शुभांगी रविंद्र मोरे यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.



> प्रतिकूल परिस्थितिशी झगडा देऊन तुम्ही तुमच्या हिमतीवर हे गुण मिळवले. तुमच्या या इच्छेला, तुमच्या या उर्जेला तुषार भाऊंच्या माध्यमातून टर्बो इंजिन लागलं आहे. म्हणूनच तुमचा गुणगौरव होत आहे.
>
> -सौमित्र पोटे,



## लोक अदालतीमध्ये ३६ प्रकरणे निकाली

**निगडी :** येथील पिंपरी-चिंचवड अपर तहसील कार्यालयात लोकअदालत आयोजित केली होती. त्यामध्ये ठेवण्यात आलेल्या ११५ प्रकरणांपैकी परस्पर तडजोडीने ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्याकडे विविध प्रकारची प्रकरणे दाखल होतात. मात्र, वादी-प्रतिवादी अनेकदा उपस्थित नसतात. यामुळे अशी प्रकरणे निकाली निघण्यास वर्षानुवर्षे वाट पाहावी लागते. मात्र, अशी प्रकरणे लोकअदालतीद्वारे तातडीने निकाली निघावीत, यासाठी लोकअदालत आयोजित केली जाते. यात महाराष्ट्र महसूल कायद्यातील ११५ कलममधील १२ प्रकरणे, तुकडे बंदीतील १५, कलम १५ मध्ये दोन, ज्येष्ठ नागरिक, कलम ८४-क मधील, महसुली वसुली प्रमाणपत्राची प्रत्येकी दोन प्रकरणे निकाली निघाली.

# अजितदादांच्या राष्ट्रवादीला मोठी ताकद मिळणार




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आजवरची सर्वात मोठी ताकद मिळणार असल्याने पक्षाला हत्तीचे बळ येणार आहे. स्वबळावर तीन-चार वेळा जिंकलेल्या आपापल्या भागात वलय असलेल्या दिग्गज अशा तब्बल ७९ माजी नगरसेवकांची यादी तयार झाली आहे. दादांच्या उपस्थितीत प्रवेश कर्णाऱ्यांत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत गेलेले स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह मागच्या पंचवार्षीक मधील २७ वजनदार माजी नगरसेवकांचाही समावेश आहे. धक्कादायक बाब म्हणजे सत्ताधारी भाजप आणि ठाकरेंच्या शिवसेनेतील प्रभावी नेत्यांचाही प्रवेश करणाऱ्यांत समावेश असणार आहे.

भाजप आमदार महेश लांडगे यांच्या बालेकिल्ल्यात भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृहात उद्या १७ जून रोजी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांचा मेळावा होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यावेळी मोठी घोषणा करणार असल्याचीही चर्चा आहे. महापालिका निवडणूक स्वबळावर लढायची की भाजप आणि शिंदे गटाला बरोबर घेऊन महायुतीत लढायचे त्याची चाचपणी होणार आहे. २०१७ मध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचा भाजपने दारुण पराभव केला आणि २५ वर्षांच्या सत्तेला सुरूंग लावला होता. २०१९ मध्ये मावळ लोकसभा मतदारसंघातसुध्दा पार्थ पवार यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला होता. दोन्ही पराभव अजित पवार यांच्या जिव्हारी लागले होते. तेव्हापासून पुन्हा या शहरात एकहाती सत्ता आणायचीच असा दृढनिश्चय अजितदादांनी केला आहे.

### सगळी नेतेमंडळी स्वगृही परतणार

● मेळाव्याच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेसचे शक्तीपरिक्षण होणार आहे.बरोबर मागच्या १७ जून २०२४ मध्ये गव्हाणे यांच्यासह २४ माजी नगरसेवकांनी दादांच्या राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी दिली होती. २०१७ मध्ये महापालिकेतील सत्तेचे वारे भाजपच्या दिशेने होते म्हणून राष्ट्रवादी सोडून अनेकांनी जय श्रीराम चा नारा दिला होता. आता ही सगळी नेतेमंडळी स्वगृही परतणार आहेत. स्वतः अजित पवार त्या सर्वांचे स्वागत करणार आहेत.

संपादकीय विशेष

# दखलपात्र आकडेवारी

प्यू रिसर्च सेंटर'च्या ताज्या अहवालानुसार 2060 पर्यंत मुस्लिम लोकसंख्या तीन अब्जांपेक्षा जास्त होईल. सध्या जगातील एकूण मुस्लिम लोकसंख्या अंदाजे दोन अब्ज आहे. याचा अर्थ आगामी 35 वर्षांमध्ये मुस्लिम लोकसंख्या शंभर कोटींनी वाढेल. येणाऱ्या काळातील मुस्लिमांच्या संख्येत होणाऱ्या मोठ्या वाढीमागे उच्च लोकसंख्या दर, धर्मांतर दर आणि तरुण मुस्लिम लोकसंख्या ही मुख्य कारणे मानली जात आहेत. इस्लाम केवळ जन्मदराच्या बाबतीतच वाढत नाही. आपली ओळख टिकवून ठेवण्याच्या दराबाबतही तो आघाडीवर आहे. 'प्यू रिसर्च सेंटर'च्या एका सर्वेक्षणात आढळून आले आहे की मुस्लिम कुटुंबात वाढलेले नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त लोक अजूनही स्वतःला मुस्लिम मानतात. फक्त अमेरिकेमध्ये ही संख्या सुमारे 74 टक्क्यांपर्यंत घसरली आहे. धार्मिक ध्रुवीकरणाच्या या युगात धर्मांतर हा एक वादग्रस्त मुद्दा आहे; परंतु 'प्यू रिसर्च सेंटर'चा अहवाल त्यात स्पष्टता आणतो. जगातील 13 देशांमध्ये धर्मांतराद्वारे इस्लाम धर्मात वाढ होण्याचे प्रमाण तीन टक्क्यांपेक्षा कमी आहे. इंडोनेशियासारख्या मुस्लिमबहुल देशांमध्ये इस्लाम स्वीकारण्याचा किंवा सोडण्याचा दर एक टक्क्यापेक्षा कमी आहे. तथापि, ख्रिश्चन, यहुदी आणि हिंदू यासारख्या इतर प्रमुख धर्मांच्या तुलनेत इस्लाम सोडणाऱ्या लोकांची संख्या सर्वात कमी आहे. इस्लाम धर्म सोडणारे बहुतेक लोक आता कोणताही धर्म स्वीकारत नाहीत किंवा स्वतःला ख्रिश्चन म्हणून ओळख लावत नाहीत. अमेरिका, केनिया, घाना सारख्या देशांमध्ये ख्रिश्चन धर्मातून इस्लाम धर्मात रूपांतर होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. ही बाब लक्षवेधी असल्याने नोंद घेणे आवश्यक आहे.

दर वर्षी ब्रिटनमध्ये सुमारे सहा हजार लोक इस्लाम स्वीकारतात. एका अहवालानुसार, ब्रिटनमध्ये इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्यांमध्ये बहुतेक महिला होत्या. दर वर्षी अंदाजे वीस हजार अमेरिकन लोक इतर धर्मातून इस्लाम स्वीकारतात. 'प्यू रिसर्च'नुसार अमेरिकेत इस्लाम स्वीकारणाऱ्यांची संख्या ही धर्म सोडणाऱ्या अमेरिकन मुस्लिमांच्या संख्येइतकीच आहे. इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्यांपैकी 77 टक्के लोक ख्रिश्चन धर्माचे आहेत, तर उर्वरित 23 टक्के लोक इतर धर्माचे आहेत. 'गिनीज बुक'नुसार, 1990 ते 2000 दरम्यान जगभरात ख्रिश्चन धर्म स्वीकारणाऱ्यांपेक्षा अंदाजे 1.25 कोटी जास्त लोकांनी इस्लाम स्वीकारला. इस्लाम हा जागतिक स्तरावर सर्वाधिक धर्मांतर अनुभवणारा दुसऱ्या क्रमांकाचा धर्म आहे. 2050 पर्यंत भारत इंडोनेशियाला मागे टाकून सर्वात जास्त मुस्लिम लोकसंख्या असलेला देश बनेल. तथापि, तरीही भारतातील हिंदू लोकसंख्या मुस्लिमांपेक्षा जास्त असेल; पण त्याचा युरोपवर मोठा परिणाम होईल. कारण ब्रिटन आणि फ्रान्समधील ख्रिश्चन लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या 50 टक्क्यांपेक्षा कमी होईल. एका अंदाजानुसार 2050 मध्ये युरोपमधील मुस्लिमांची लोकसंख्या सुमारे दहा टक्के असेल. 2050 मध्ये अमेरिकेतील प्रत्येक 50 पैकी एक व्यक्ती मुस्लिम असेल तर उप-सहारा आफ्रिकेत दहा ख्रिश्चन व्यक्तिंपाठोपाठ चार मुस्लिम असतील. इस्लाम हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा धर्म आहे आणि जगात त्याचे सुमारे दोन अब्ज अनुयायी आहेत. ख्रिश्चनांची संख्या त्यांच्यापेक्षा 20 टक्के जास्त आहे.

ख्रिश्चनांप्रमाणेच मुस्लिमही जगभर पसरले आहेत; परंतु ते बहुसंख्य असलेल्या फार कमी देशांमध्ये लोकशाही आहे. जगातील एकूण मुस्लिम लोकसंख्येपैकी सुमारे 60 टक्के लोक आशियामध्ये राहतात. भारत, इंडोनेशिया, बांगलादेश आणि पाकिस्तान या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या चार मुस्लिम देशांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात लोकशाही आहे. मुस्लिम बहुसंख्य असलेल्या देशांमध्ये धर्मनिरपेक्षता हा एक वाईट शब्द किंवा पाश्चात्य कल्पना मानली जाते; परंतु मुस्लिम अल्पसंख्य असलेल्या लोकशाही देशांमध्ये त्या देशाच्या धर्मनिरपेक्ष वचनबद्धतेची वारंवार परीक्षा घेतात. फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका, बेल्जियम, जर्मनी इत्यादी देश याची उदाहरणे आहेत. जगातील मुस्लिम हे एका व्यापक राष्ट्रीयतेचा भाग आहेत. इस्लामची संकल्पना व्यापक असली, तरी मुस्लिम देश सतत आपापसात आणि इतर देशांशी लढत राहिले आहेत. इराण-इराक युद्ध हे सर्वात जास्त काळ चाललेले युद्ध होते. यानंतर मोठ्या संख्येने इस्लामी लोक सद्दाम हुसेनविरुद्ध उभे राहिले. व्यापक इस्लामचा म्हणजेच उम्माचा आत्मा जमिनीवर प्रभावी राहिला असेल, तर तो बहुराष्ट्रीय दहशतवादी गटांच्या स्वरूपातच राहिला, हे एक कटू सत्य आहे.

भारतात मुस्लिमांच्या वाढत्या लोकसंख्येवर टीका करणारा एक घटक आहे. धार्मिक विद्वेषावर राजकीय पोळी भाजून घेणाऱ्या या घटकाकडे दुर्लक्ष केले, तरी 'प्यू रिसर्च सेंटर'च्या ताज्या अहवालाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. हा अहवाल इस्लाम आणि मुस्लिमांच्या जागतिक प्रभावाकडे लक्ष वेधतो. मुस्लिम समाजात साक्षरतावाढ, रोजगारवृद्धी आणि पुरोगामी विचारसरणी रुजवली, तर मुस्लिम समाजाचा वाढता प्रभावही कुणाला खुपणार नाही. 2010 मध्ये इंडोनेशिया, पाकिस्तान आणि भारत हे अनुक्रमे सर्वात जास्त मुस्लिम लोकसंख्या असलेल्या पहिल्या तीन देशांमध्ये होते. 'प्यू रिसर्च सेंटर'च्या अहवालानुसार 2030 पर्यंत पाकिस्तान इंडोनेशियाला मागे टाकून सर्वात जास्त मुस्लिम लोकसंख्या असलेला देश बनेल. अशीच स्थिती राहिल्यास 2050 पर्यंत पाकिस्तानही मागे राहील आणि जगात सर्वाधिक मुस्लिम भारतात असतील. तथापि, तरीही भारतातील बहुसंख्य लोकसंख्या हिंदूंची असेल. 2011 च्या जनगणनेनुसार, भारतात 17.22 कोटी मुस्लिम होते. ते देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 14.2 टक्के होते. अलीकडेच, सरकारने म्हटले होते की, 2023 च्या अखेरीस देशातील मुस्लिमांची एकूण लोकसंख्या 20 कोटींपर्यंत पोहोचली असावी. भारत अशा देशांमध्ये समाविष्ट आहे, जिथे मुस्लिम लोकसंख्या सर्वात वेगाने वाढत आहे. देशातील बहुसंख्य हिंदू लोकसंख्येच्या तुलनेत हा दर जास्त आहे. 2030 पर्यंत अमेरिकेत मुस्लिम लोकसंख्या 6.2 दशलक्ष असेल.

'प्यू रिसर्च'चा अंदाज आहे की 2030 पर्यंत अमेरिकेतील एकूण मुस्लिम लोकसंख्या तेथील एकूण लोकसंख्येच्या 1.7 टक्के असेल. कॅनडामध्ये 2010 च्या तुलनेत 2030 मध्ये मुस्लिम लोकसंख्या तीनपट जास्त असेल. 2010 मध्ये कॅनडामध्ये एकूण 9.4 लाख मुस्लिम होते. 2030 मध्ये त्यांची संख्या सुमारे 27 लाखांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे.

# विकासाची स्थिती, व्याजकपातीची भीती

**सरत्या आठवड्यामध्ये बरकतीच्या बातम्या समोर आल्या. अर्थात मुदत ठेवीवर कमी व्याज मिळणार असल्याने नाराजीची लकेरही पहायला मिळाली. सर्वप्रथम संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी पहायला मिळाली. दरम्यान, सोन्यापेक्षा सुवर्ण कंपन्या जास्त फायद्यात असल्याचे निरिक्षण समोर आले. त्याच वेळी भारतात 17 कोटी लोक दारिद्र्यरेषेबाहेर आल्याचा दावा पहायला मिळाला. त्याबद्दल मतमतांतरेही समोर आली.**

अर्थनगरीतून

महेश देशपांडे
आर्थिक घडामोडींचे जाणकार

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये बरकतीच्या बातम्या पहायला मिळाल्या. अर्थात मुदत ठेवीवर कमी व्याज मिळणार असल्याने नाराजीची लकेरही पहायला मिळाली. सर्वप्रथम संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी पहायला मिळाली. दरम्यान, सोन्यापेक्षा सुवर्ण कंपन्या जास्त फायद्यात असल्याचे निरिक्षण समोर आले. महत्वाची बाब म्हणजे भारतात 17 कोटी लोक दारिद्र्यरेषेबाहेर आल्याचा दावा पहायला मिळाला. त्याबद्दल मतांतरेही समोर आली.

निफ्टी इंडिया डिफेन्स क्षेत्रातील कंपन्यांनी यंदा चांगली कामगिरी केली आहे. गेल्या पाच महिन्यांमध्ये या क्षेत्रातील शेअर्समध्ये जवळपास 40 टक्क्यांची तेजी आली आहे. निफ्टी 50 मध्ये केवळ पाच टक्क्यांची तेजी दिसून आली. एका रिपोर्टनुसार निफ्टी डिफेन्स निर्देशांकातील सात संरक्षण क्षेत्रातील स्टॉकच्या किंमतीमध्ये अलिकडच्या काळात 50 ते 100 टक्के तेजी पहायला मिळाली आहे. 'गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स'च्या शेअरमध्ये या वर्षी 111 टक्क्यांपर्यंत तेजी पहायला मिळाली. या कंपनीचा स्टॉक 1616 रुपयांवरून 3406 रुपयांवर पोहोचला. 6 जूनला या स्टॉकमध्ये 4.69 टक्क्यांची घसरण झाली. सध्या हा शेअर 3246.90 रुपयांवर आहे; मात्र एका महिन्यात या कंपनीचा स्टॉक 77.20 टक्क्यांनी वाढला आहे. 'भारत डायनॅमिक्स कंपनी'च्या स्टॉकमध्ये या वर्षात 75 टक्क्यांची तेजी पहायला मिळाली आहे. 1123 रुपयांवरून स्टॉक 1969 रुपयांवर पोहोचला आहे. दारुगोळा आणि मिसाईल सिस्टीम बनवणाऱ्या डिफेन्स क्षेत्रातील सरकारी कंपनीने गेल्या पाच वर्षांमध्ये 1613 टक्के रिटर्न दिला आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर'च्या शेअरमध्ये 38 टक्के तेजी आली आहे. 'सोलर इंडस्ट्रीज इंडिया'च्या शेअरमध्येही जोरदार तेजी आली आहे. हा शेअर 74 टक्क्यांनी वाढला असून या वर्षात 9783 वरुन 17023 रुपयांवर पोहोचला होता. सध्या हा शेअर 16523 वर आहे. एस्ट्रा मायक्रोवेव प्रोडक्टसच्या शेअरमध्ये 2025 मध्ये 54 टक्के तेजी आली आहे. 768 रुपयांवरून हा स्टॉक 1179 रुपयांवर पोहोचला आहे. 6 जूनला कंपनीचा शेअर 4.12 टक्क्यांनी घसरून 1130 रुपयांवर आला आहे. कोचीन शिपयार्डच्या शेअरमध्येदेखील 53 टक्के तेजी पहायला मिळाली आहे. हा स्टॉक 1539 रुपयांवरून 2351 रुपयांवर पोहोचला आहे. ही संरक्षण क्षेत्रातील मोठी कंपनी आहे. जानेवारी 2025 पासून या स्टॉकमध्ये 71 टक्क्यांची तेजी पहायला मिळाली आहे. 1008 वरून हा स्टॉक 1725 रुपयांवर पोहोचला आहे. माझगाव डॉक शिपबिल्डर्सच्या शेअरमध्ये 54 टक्क्यांची तेजी आली आहे. 2228 रुपयांवरुन हा स्टॉक 3430 रुपयांवर पोहोचला होता.

दरम्यान, सोने कर्ज देणाऱ्या मुथूट फायनान्स, मणप्पुरम फायनान्स आणि आयआयएफएल फायनान्स या कंपन्यांचे शेअर्स आठ टक्क्यांपर्यंत वाढले. याचे कारण रिझर्व्ह बँकेची (आरबीआय) घोषणा. त्यात सोन्यावर घेतलेल्या कर्जाचे मूल्य वाढवण्याचे सूतोवाच करण्यात आले होते. आता 2.5 लाख रुपयांपर्यंतच्या सोने कर्जावरील कर्ज ते मूल्य (एलटीव्ही) गुणोत्तर 75 टक्क्यांवरून 85 टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल, असे रिझर्व्ह बँकेने जाहीर केले आहे. एक लाख रुपयांचे सोने असेल, तर आता त्यावर 85 हजार रुपयांचे कर्ज मिळू शकते. पूर्वी ही मर्यादा 75 हजार रुपये होती. नवीन सुवर्ण कर्ज नियमावली दोन दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आली. हा निर्णय केवळ कर्जदारांसाठी फायदेशीर नाही, तर सुवर्ण कर्जक्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांसाठीही एक मोठा सकारात्मक संकेत आहे. रिझर्व्ह बँकेने एप्रिल 2025 मध्ये एक मसुदा नियामक चौकट जारी केली होती. त्यात सुवर्ण कर्जांशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वे प्रस्तावित केली होती. त्याचा उद्देश सर्व प्रकारच्या कर्जदात्यांसाठी, जसे की बँका, एनबीएफसी, गृहनिर्माण वित्त कंपन्या, सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांसाठी एकसमान नियम निश्चित करणे हा होता. नव्या नियमांनुसार सर्व कर्जदात्यांना त्यांच्या क्रेडिट आणि जोखीम धोरणांमध्ये सुवर्णकर्जाशी संबंधित नियम समाविष्ट करावे लागतील. सोन्याचे मूल्य आणि शुद्धता तपासण्यासाठी मानक प्रक्रिया लागू कराव्या लागतील. कर्जाचे पैसे कशासाठी वापरले जात आहेत, यावर लक्ष ठेवणे आवश्यक असेल. याखेरीज मागील कर्ज मानक श्रेणीत असेल आणि एलटीव्ही गुणोत्तरात येत असेल, तरच कर्जाचे नूतनीकरण आणि टॉप-अप उपलब्ध असेल. तसेच कर्ज देण्यापूर्वी कर्जदाराच्या परतफेड क्षमतेचे योग्य मूल्यांकन आणि योग्य परिश्रम करणे अनिवार्य असेल. रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय सुवर्ण वित्त कंपन्यांच्या व्यवसायाला चालना देऊ शकतो. यातून अधिक ग्राहक कर्जासाठी पुढे येऊन कंपन्यांचा व्यवसाय वाढेल.

याच सुमारास एक लक्षवेधी अर्थवृत्त देशात चर्चेचा विषय ठरले. भारताचा दारिद्र्यरेषेचा दर एका दशकात झपाट्याने घसरून 5.3 टक्क्यांवर आला. तो 2011-12 मध्ये 27.1 टक्के होता. ही टिप्पणी जागतिक बँकेने केली आहे. जागतिक संस्थेने दारिद्र्यरेषेची व्याप्ती वाढवून तीन अमेरिकन डॉलर प्रतिदिन केली आहे. जागतिक बँकेने असाही दावा केला आहे की 2011-12 ते 2022-23 या दशकात भारताने 17.1 कोटी लोकांना दारिद्र्यरेषेखालून बाहेर काढले आहे. जागतिक बँकेने एका अहवालात म्हटले आहे की 2017 ते 2021 दरम्यानच्या भारतातील महागाई दराचा विचार करता सुधारित दारिद्र्यरेषेचा तीन अमेरिकन डॉलरचा आधार घेतल्यास भारतातील गरिबीचा दर 5.3 टक्के होता. अहवालात म्हटले आहे की 2024 मध्ये भारतात 54,695,832 लोक दिवसाला तीन डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर जगत होते. भारतातील अतिगरिबी 16.2 टक्क्यांवरून 2.3 टक्क्यांपर्यंत घसरली. या काळात कमी तसेच मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये दारिद्र्याचा दर 33.7 टक्क्यांनी कमी झाला. जागतिक बँकेने मान्य केले आहे की मोफत आणि अनुदानित अन्न वितरणामुळे गरिबी कमी झाली असून ग्रामीण आणि शहरी गरिबीमधील दरी कमी झाली आहे. अहवालानुसार 54 टक्के अत्यंत गरीब लोक सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या पाच राज्यांमध्ये राहतात. भारताचा वास्तविक जीडीपी कोरोनापूर्वीच्या पातळीपेक्षा पाच टक्के कमी आहे. जागतिक बँकेनुसार सध्याच्या जागतिक अनिश्चिततेचे निराकरण पद्धतशीरपणे केले गेल्यास 2027-28 पर्यंत भारताचा विकास त्याच्या क्षमतेपर्यंत पोहोचेल. तथापि, भारतीय आर्थिक परिस्थितीमध्ये लक्षणीय घसरणीचे धोके आहेत. जागतिक स्तरावर सतत होत असलेल्या धोरणात्मक बदलांमुळे हे घडत आहे. वाढत्या जागतिक तणावामुळे भारताच्या निर्यातीची मागणी कमी होईल आणि गुंतवणुकीत पुनर्प्राप्ती होण्यास आणखी विलंब होईल.

आर्थिक वर्ष 2026-28 मध्ये चालू खात्यातील तूट अहवालानुसार सरासरी जीडीपीच्या 1.2 टक्के राहण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार भारताचा परकीय चलन साठा जीडीपीच्या सुमारे 16 टक्के स्थिर राहण्याची अपेक्षा आहे. एप्रिलमध्ये भारताविषयीच्या 'गरिबी आणि समता संक्षिप्त अहवाला'मध्ये जागतिक बँकेने म्हटले आहे की गेल्या दशकात भारताने गरिबीमध्ये लक्षणीय घट केली आहे. अतिगरिबी (दररोज 2.15 अमेरिकन डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्नावर जगणारी) 2011-12 मध्ये 16.2 टक्क्यांवर होती. 2022-23 मध्ये ती 2.3 टक्क्यांपर्यंत घटली आहे. यामुळे सुमारे 17 कोटी 10 लाख लोकांना अतिगरिबीतून बाहेर काढण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अतिगरिबी 18.4 टक्क्यांवरून 2.8 टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. शहरी भागात ती 10.7 टक्क्यांवरून 1.1 टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. त्यामुळे ग्रामीण-शहरी अंतर 7.7 टक्क्यांवरून 1.7 टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे.

आता एक महत्वाची बातमी. रिझर्व्ह बँकेने अलीकडेच रेपो दरात 0.50 टक्के कपात केल्याचा परिणाम कर्जदारांसाठी फायदेशीर असला, तरी मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांसाठी हानिकारक ठरू शकतो. रेपो दरात कपात झाल्यामुळे कर्जाचे व्याजदर कमी होत असले, तरी बँकांच्या ठेवींच्या दरांवरही त्याचा थेट परिणाम होतो. यामुळे मुदत ठेवींवरील परतावा कमी होऊ शकतो. बचतीवर निश्चित व्याजदर हवा असणाऱ्यांना आता कमी परतावा मिळण्याची शक्यता जास्त आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे आणि मुदत ठेव करण्यापूर्वी चांगले पर्याय माहिती करून घेणे आवश्यक आहे. हा निर्णय विशेषतः गृहकर्ज, वाहन कर्ज किंवा वैयक्तिक कर्ज घेतलेल्यांसाठी किंवा घेण्याचा विचार करत असलेल्यांसाठी फायदेशीर आहे. रेपो दरात कपात झाल्यामुळे बँका आता स्वस्त दरात कर्ज देऊ शकतात. त्यामुळे 'ईएमआय'मध्येही दिलासा मिळेल. रेपो दरात कपातीचा एक परिणाम मुदत ठेवी (एफडी) गुंतवणूकदारांवर होईल. गेल्या काही महिन्यांमध्ये रेपो दर कमी झाल्यामुळे बँकांनी मुदत ठेवींवरील व्याजदरही कमी केले आहेत. स्टेट बँक रिसर्चनुसार, फेब्रुवारी 2025 पासून मुदत ठेवींवरचे दर 30 ते 70 बेसिस पॉइंट्सने कमी झाले आहेत. केवळ मुदत ठेवीच नाही, तर बचत खात्यांवरही व्याजदर कमी होत आहेत. मुदत ठेवीत गुंतवणूक करायची असेल तर अजूनही संधी आहे. अनेक बँका दीर्घकालीन एफडीवर आठ टक्के किंवा त्याहून अधिक व्याज देत आहेत. तथापि, जास्त व्याज देणाऱ्या बहुतेक बँका लघु वित्त बँका आहेत, ज्यामध्ये काही धोकादेखील असतो. अशा परिस्थितीत गुंतवणूक करण्यापूर्वी डीआयसीजीसी विमा कव्हरअंतर्गत येते याची खात्री करावी. त्यात पाच लाखांपर्यंतच्या ठेवींचा समावेश आहे.







## राशीभविष्य

- **मेष** : आजचा दिवस उत्साहाचा राहील. अपेक्षित भेटीतून फलप्राप्ती होईल. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील.
- **वृषभ** : अनुभवींचा सल्ला ध्यानी घ्यावा. घाईगडबडीने निर्णय घेऊ नयेत. प्राप्तीचं प्रमाण उत्तम राहील.
- **मिथुन** : कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. महत्त्वाची कामं विनासायास होतील. कला-गुणांना वाव मिळेल.
- **कर्क** : गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. स्थावर प्रश्नात लाभ होईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **सिंह** : नव्या कामांना चालना मिळेल. प्रेम प्रकरणात तडजोडीची भूमिका ठेवावी. प्रवास शक्यतो टाळावा.
- **कन्या** : अनावश्यक खर्च टाळावा. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. खरेदीचे व्यवहार विचारानं करावे.
- **तूळ** : रखडलेली कामं मार्गी लागतील. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल. व्यवसायात उत्तम संधी लाभतील.
- **वृश्चिक** : गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवा. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **धनु** : अचानक नव्या समस्या उभ्या राहतील. इतरांचा सल्ला चुकीचा ठरेल. उष्णतेचे विकार उद्भवतील.
- **मकर** : नव्या योजनांना गती मिळेल. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. विद्यार्थ्यांना समस्या संभवतात.
- **कुंभ** : स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. यंत्र, वाहनांपासून जपून असावं. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **मीन** : नोकरीत कामाचा ताण वाढेल. सहकाऱ्यांशी जमवून घ्यायला हवं. दिलासादायक घटना घडतील.

## सल्ला मोलाचा — पसारा होतोय?

✻ महत्त्वाच्या वस्तू ठेवण्यासाठी ही कपाटं उपयोगी पडतात. तसेच कपाटात सामान मुडपत नाही किंवा कपडे चुरगाळत नाहीत.

✻ हँगर्सची निवड- हँगर्सची निवड करताना विचारपूर्वक करावी. एक हँगर अनेक कपड्यांसाठीही वापरता येतो. यासाठी कर्टन रिंग्जमध्ये कपडे अडकवून त्या हँगरला लावाव्यात. यामुळे कपडे चुरगाळत नाहीत. एकाच हँगरवर बरेच कपडे बसतात आणि मुख्य म्हणजे वेळेत सापडतात.

✻ मल्टीपर्पज हँगर्स- घरात स्टोल्स, टॉवेल्स, नॅपकिन असतात. ते कुठे अडकवावेत हा प्रश्न पडतो. अशा वेळी मल्टीपर्पज हँगरचा वापर करता येणं शक्य आहे. हे हँगर कुठेही सेट करणं शक्य असल्याने वस्तू नेमक्या ठिकाणी आणि हव्या त्या वेळी मिळणं शक्य आहे.

✻ कपाटातील एकाच मोठ्या कप्प्याचं रुपांतर लहान कप्प्यांमध्ये करण्यासाठी रॅक डिव्हायडरचा उपयोग करा.

## दिनविशेष — १७ जून

- **१९४४** : आइसलँडने (डेन्मार्कपासून) स्वातंत्र्य घोषित केले. ते प्रजासत्ताक बनले.
- **१९६३** : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक शाळांतून बायबलचे पठण करणे कायदेबाह्य ठरवले.
- **१९६७** : चीनने पहिल्या हायड्रोन बॉम्बचा स्फोट केला.
- **२०१३** : उत्तराखंडमध्ये एका दिवसात १३ इंच पाऊस पडला.

## सफर देशांची — उगवत्या सूर्याचा देश

प्रत्येक देश वेगळा. तिथली भाषा, संस्कृती, परंपरा, सण, चलन सगळं काही वेगळं. त्यामुळेच आपल्याला परदेशाचं आकर्षण असतं. तिथले लोकं कसे रहात असतील, काय काम करत असतील इथपासून त्या देशात पिकणाऱ्या फळं आणि भाज्यांपर्यंत बरंच काही जाणून घ्यायचं असतं. चला तर मग, आज जपानची सफर करू या.

जपान हा पूर्वेकडचा देश. त्यामुळेच त्याला उगवत्या सूर्याचा देश असं म्हटलं जातं. या देशात छोटी-मोठी मिळून ६८५२ बेटं आहेत. टोकियो ही जपानची राजधानी. हा देश अनेक अर्थांनी वेगळा आहे. इथली भौगोलिक परिस्थिती वैशिष्ट्यपूर्ण आहे. या देशात २०० पेक्षा जास्त ज्वालामुखी आहेत. जपानचा जवळपास ७० टक्के भूभाग डोंगराळ आहे. 'माउंट फुजी' हे जपानमधलं सर्वात उंच पर्वत शिखर आहे तसंच इथे याच नावाचा जागृत ज्वालामुखी आहे. जपानला दरवर्षी जवळपास १५०० भूकंपाचे धक्के बसतात. या देशाला भूकंप आणि त्सुनामीचा सर्वात जास्त धोका आहे. **क्रमशः**

## पंचांग

**मंगळवार, १७ जून २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
ज्येष्ठ कृ. ६, नक्षत्र : शततारका,
चंद्रराशी : कुंभ, योग : विष्कंभ,
सूर्योदय: ६.०४, सूर्यास्त: ७.१६


## फॉरवर्डस

**अपने होठों पे सजाये फिरते हैं लोग हमें...**

**हमारी शोहरत किसी अखबार की मोहताज नही।**

## आरोग्यमंत्र — उपयुक्त जीन थेरपी

कर्करोगाचा कहर झाला असून या आजाराने ग्रस्त रुग्णांची वाढती संख्या भयावह आहे. या रोगावर अंकुश ठेवण्यासाठी संशोधक अविरत प्रयत्न करत असतात. अशाच प्रकारच्या संशोधनातून रक्ताच्या कर्करोगावर जीन थेरपी अत्यंत उपयुक्त ठरु शकत असल्याचं समोर आलं आहे. यासंबंधी केलेल्या प्रयोगात सुमारे ८२ रुग्णांवर हा उपचार यशस्वी ठरत असल्याचं आढळलं आहे. या अभ्यासासाठी कॅलिफोर्निया येथील काईट फार्मा यांनी आर्थिक सहाय्य केलं. या रुग्णांना दिल्या गेलेल्या पहिल्याच जीन थेरपीनंतर रुग्णांच्या कर्करोगाच्या पेशींमध्ये घट झाल्याचं आढळून आलं. तीन महिन्यांमध्येच रुग्ण सुमारे ३६ टक्के पूर्ण बरे झाले. ही बाब 'विलक्षण' असल्याचं म्हटलं जात असून या उपचाराचे परिणाम किती काळ टिकून राहतात यावर आता अभ्यास सुरु आहे. यामध्ये रुग्णाचं रक्त विशिष्ट प्रक्रिया आणि साधनं वापरून, गाळून घेतात आणि त्यातून रोगप्रतिकारशक्तीसाठी महत्त्वाची भूमिका न बजावणाऱ्या टी पेशी बाजूला काढल्या जातात. त्यांच्या जागी कर्करोगाच्या पेशींना मारणाऱ्या पेशी घातल्या जातात. त्यानंतर पुन्हा एकदा शिरेतून रुग्णाच्या शरीरात हे रक्त सोडलं जातं. या उपचारांनंतर सहा महिन्यांनी ४१ टक्के रुग्णांमध्ये कर्करोगाच्या पेशींमध्ये किमान ५० टक्के घट झाल्याचं दिसून आलं. अर्थातच या तंत्राचे काही दुष्परिणामही आहेत का त्याविषयीचं संशोधनही सुरु आहे. ते दूर करून सुधारित जीन थेरपी रुग्णांना वरदान ठरु शकेल.



## ग्रुमिंग

✻ दाढी वाढवण्यासाठीची खास तेलं बाजारात मिळतात. या तेलांमधले घटक दाढीच्या वाढीसाठी उपयुक्त ठरतात.

✻ ऑलिव्ह, मॅकाडेमिया, बदाम आणि अॅव्होकॅडोची तेलं केसांच्या वाढीसाठी आणि मुळांच्या बळकटीसाठी योग्य मानली जातात. या तेलांमुळे दाढीचे केस दाट होतात. ही सगळी तेलं एकत्र करून तेल तयार केलं जातं.

✻ दाढी वाढवण्यासाठी खोबरेल तेलाचा वापरही करता येईल. या तेलामुळे दाढीचे केस दाट होऊ शकतात. मग काय मित्रांनो, दाढी वाढवण्याची योजना आखली असेल तर ही पूर्वतयारी करून ठेवा.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

### मृत आईचा बनाव करत हडपली सरकारी नोकरी

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील रिवा जिल्ह्यातील शिक्षण विभागात एक चकित करणारा घोटाळा समोर आला आहे. एका व्यक्तीने बनावट कागदपत्रांच्या आधारे आपली आई मृत असल्याचे दाखवत सरकारी नोकरी मिळवली. पण जेव्हा सत्य समोर आले, तेव्हा हा फसवणुकीचा प्रकार अनेकपटींनी गंभीर निघाला. गेल्या वर्षभरात अनुकंपा तत्वावरील ३६ नियुक्त्या करण्यात आल्या. त्यातील १० उमेदवारांनी कागदपत्रांसाठी नोटीसला प्रतिसाद दिला नाही. तपासाअंती त्यातील पाच नियुक्त्या बनावट निघाल्या आहेत. पारसिया गावचा रहिवासी बृजेश शिवहरण कोल याने दावा केला की त्याची आई बेला काली कोल, जी शिक्षिका म्हणून कार्यरत होती, तिचा मृत्यू झाला आहे.

### बॉम्बच्या धमकीने विमान परतले

**नवी दिल्ली :** हैदराबादला जाणाऱ्या लुफ्थांसा विमानाला हवेतच यू-टर्न घेऊन जर्मनीच्या फ्रँकफर्ट विमानतळावर माघारी परतावे लागले. या विमानाला बॉम्बची धमकी मिळाली होती, यामुळे त्याला माघारी परतावे लागले, असे हैदराबाद विमानतळाच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले. हे विमान भारतीय हवाई हद्दीबाहेर असताना त्याला बॉम्बची धमकी मिळाली होती. यामुळे हे विमान ज्या ठिकाणाहून आले होते तेथे त्याला परतावा लागले, असे अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले.

# पाकला पुन्हा ग्रे लिस्टमध्ये टाकणार?

## पहलगाम प्रकरणी एफएटीएफचा ठपका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगभरात उघड झाला आहे. पुन्हा एकदा पाकिस्तानला ग्रे लिस्टमध्ये टाकण्याची मागणी होत आहे. दरम्यान, जागतिक दहशतवादी निधीवर लक्ष ठेवणाऱ्या एफएटीएफ (फायनान्शियल अॅक्शन टास्क फोर्स) या संघटनेने २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध केला आहे. या हल्ल्यात पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी २६ निरपराध लोकांचा बळी घेतला होता. एफएटीएफने सोमवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निधी आणि नेटवर्कशिवाय असे हल्ले शक्य नाहीत. एफएटीएफच्या या वक्तव्यावर थेट पाकिस्तानला लक्ष्य करण्यात आले आहे.

दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा रोखण्यासाठी सदस्य देशांनी उचललेल्या ठोस आणि प्रभावी पावलांकडे आता अधिक लक्ष दिले जात असल्याचेही एफएटीएफने स्पष्ट केले आहे. पाकिस्तानकडून दहशतवादाला सातत्याने पाठबळ आणि निधी मिळत असल्याचे पुरावे भारताने उघड केले असतानाच हे वक्तव्य करण्यात आले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारत आता पाकिस्तानला पुन्हा एफएटीएफच्या 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकण्याची प्रक्रिया सुरू करणार आहे. २५ ऑगस्ट रोजी आशिया पॅसिफिक ग्रुपची बैठक आणि २० ऑक्टोबररोजी होणाऱ्या एफएटीएफच्या पूर्ण बैठकीपूर्वी भारत पाकिस्तानविरोधात सविस्तर डोजियर तयार करत आहे.




### 'ग्रे लिस्ट'शी पाकिस्तानचे जुने संबंध

● २००८ मध्ये पाकिस्तानला पहिल्यांदा एफएटीएफच्या ग्रे लिस्टमध्ये टाकण्यात आले होते. २०१० मध्ये काढून टाकले, परंतु २०१२ मध्ये पुन्हा समाविष्ट केले. २०१५ मध्ये त्याला वगळण्यात आले आणि त्यानंतर २०१८ मध्ये त्याला पुन्हा 'ग्रे लिस्ट'मध्ये टाकण्यात आले. एफएटीएफने ऑक्टोबर २०२२ मध्ये माघार घेतली, परंतु सुधारणा सुरू ठेवण्याचे निर्देश दिले. एफएटीएफच्या म्हणण्यानुसार, जगातील २०० हून अधिक देश आणि प्रदेश त्याच्या नेटवर्कशी जोडलेले आहेत आणि दहशतवादी फंडिंग रोखण्यासाठी एकत्र काम करत आहेत. सोशल मीडिया, क्राऊड फंडिंग आणि व्हर्च्युअल अॅसेट्स सारख्या नवीन धोक्यांबद्दल चेतावणी दिली जाईल आणि लवकरच सविस्तर विश्लेषण प्रकाशित केले जाईल, असे एफएटीएफने नुकतेच म्हटले आहे.

# पीएम मोदींना सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सोमवारी (दि. १६) सायप्रसमधील ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस III हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्यात आला. सायप्रस प्रजासत्ताकाचे पहिले अध्यक्ष मकारिओस III यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार राष्ट्राच्या प्रशंसनीय सेवेसाठी राष्ट्रप्रमुख आणि इतर महत्त्वाच्या व्यक्तींना प्रदान केला जातो.

निकोसिया येथील राष्ट्रपती निवासस्थानी आयोजलेल्या कार्यक्रमात सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडोलाइड्स यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुरस्कार प्रदान केला. या सन्मानाबद्दल पंतप्रधान मोदी यांनी क्रिस्टोडोलाइड्स यांच्यासह सायप्रसच्या जनतेचे आभार मानले.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, सायप्रसमधील सर्वोच्च सन्मान ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारिओस III या पुरस्कारानेमाझा सन्मान करण्यात आला याबद्दल मी सायप्रस सरकारचे आणि जनतेचे मनापासून आभार मानतो. हा सन्मान फक्त माझा नाही, तर १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे. हा त्यांच्या क्षमता आणि आकांक्षांचा सन्मान आहे. हा आपल्या देशाच्या सांस्कृतिक बंधुत्वाचा आणि "वसुधैव कुटुंबकम" च्या विचारसरणीचा सन्मान आहे. मी हा सन्मान भारत आणि सायप्रसमधील मैत्रीपूर्ण संबंधांना आणि आपल्या सामायिक मूल्यांना आणि परस्पर समंजसपणाला समर्पित करतो. सर्व भारतीयांच्या वतीने मी अत्यंत नम्रतेने आणि कृतज्ञतेने हा सन्मान स्वीकारतो. हा सन्मान शांतता, सुरक्षा, सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि आपल्या लोकांच्या समृद्धीप्रती असलेल्या आपल्या अढळ वचनबद्धतेचे प्रतीक आहे. मी या सन्मानाचे महत्त्व समजतो आणि भारत आणि सायप्रसमधील संबंधांप्रती असलेली जबाबदारी म्हणून तो स्वीकारतो. भविष्यात भारत आणि सायप्रसमधील भागीदारी नवीन उंची गाठेल. एकत्रितपणे, आपण केवळ आपल्या दोन्ही राष्ट्रांची प्रगती मजबूत करू शकत नाही तर शांततापूर्ण आणि सुरक्षित जागतिक वातावरण निर्माण करण्यातही योगदान देऊ, असा विश्वासही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

# मुंबई-ठाण्याला रेड अलर्ट, कोकणात मुसळधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मान्सूनने कोकणाचा संपूर्ण भाग व्यापला असून विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भाग मान्सूनची एन्ट्री झाल्याचं दिसून आलं आहे. राज्यभरात पावसाने जोरदार हजेरी लावली असून पुढील तीन तासांसाठी मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघरसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील काही तास चारही जिल्ह्यात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. त्याचसोबत



संपूर्ण कोकणमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली असून पुढील दोन ते तीन दिवस मोठ्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. परंतु संपूर्ण कोकणात जोरदार पाऊस सुरू आहे असून अनेक नद्या दुथडी भरुन वाहत आहेत. दरम्यान, घाट परिसरातून जाताना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गासाठी ऑरेंज अलर्ट असून काही ठिकाणी १०० मिमीहून अधिक पावसाची शक्यता आहे. विदर्भातील अमरावती, गोंदिया, भंडारा आणि नागपुरात देखील काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर सातारा आणि पुण्यातील घाट परिसरात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे

मुंबईसह ठाणे, पालघर आणि रायगडमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला असून काही तास मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर कोकणातील काही भागात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. दक्षिण गुजरात परिसरात पुढील २४ तासात कमी दाबाचे क्षेत्र तयार होणार आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन दिवस कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पान १ वरून

### रॉबर्ट वाड्रा विरोधात नव्याने समन्स

चौकशी केल्यानंतरच एजन्सी या प्रकरणी आरोपपत्र दाखल करू शकते.

एप्रिलमध्ये सीबीआयने रॉबर्ट वढेरा यांची सलग तीन दिवस चौकशी केली होती. पण हे प्रकरण आणखी एका मनी लॉंडरिंग प्रकरणाशी संबंधित होते, जे हरयाणातील जमीन व्यवहार आहे. २००८ मध्ये जमिनीचा करार झाला होता. आतापर्यंत रॉबर्ट वढेरा यांच्यावर मनी लॉन्ड्रिंगच्या तीन प्रकरणांमध्ये चौकशी सुरू आहे. संजय भंडारी यांच्या घरावर आयकर विभागाने २०१६ मध्ये छापा टाकला होता आणि त्यानंतर लगेचच ते देशसोडून पळून गेले होते. भंडारी यांच्या प्रत्यार्पणासाठी भारतानेही अर्ज केला होता, पण ब्रिटिश कोर्टाने तो फेटाळून लावला होता.

ईडीने २०२३ मध्ये आरोपपत्र दाखल केले. त्यात संजय भंडारी यांनी लंडनमधील १२, ब्रायनस्टन स्क्वेअर हाऊस २००९ मध्ये विकत घेतल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्यानंतर रॉबर्ट वढेरा यांच्या सूचनेनुसार त्याचे नूतनीकरण करण्यात आले. त्यासाठी चा निधीही वढेरा यांनी दिला होता. मात्र, वाड्रा यांनी या मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मालकी नाकारली आहे. राजकीय सूडबुद्धीने आपल्याला या प्रकरणात अडकवले जात असल्याचे वाड्रा यांचे म्हणणे आहे

### विमान अपघाताची पाळेमुळे यूपीए...

जातिने लक्ष ठेऊन आहे. पंतप्रधानांचे सचिव पीके मिश्रा यांनी जातीने हजर राहून एक्सिडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरो, एयरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया या एजन्सिच्या अधिकाऱ्यांशी बोलून या विमान दुर्घटने बाबत माहिती घेतली. पंतप्रधान मोदी हे सध्या विदेश दौऱ्यावर आहेत तरी बोईंग ७८७-८ या विमान दुर्घटनेकडे त्यांचे लक्ष असल्याचे दिसून येत आहे. त्यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना याबाबत अपडेट माहिती घेण्यास सांगितले आहे. त्याबरोबर पीएमओ या घटनेच्याबाबतीय ज्यापद्धतीने सक्रियता दाखवत आहे. त्याचा विचार करता या दुर्घटनेचे नेमके कारण लवकरात लवकर पुढे येईल अशी शक्यता आहे. त्यामुळे यापुढे अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करता येतील.

### ...तर पाकिस्तान इस्रायलवर अणुबॉम्ब टाकेल

हल्ल्यात दोन्ही देशांमध्ये सुमारे २४८ जणांचा मृत्यू (इराणमध्ये २३०, इस्रायलमध्ये १८) झाला आहे. इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे वरिष्ठ अधिकारी आणि इराणच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे सदस्य रेजाई म्हणाले, इस्रायलने इराणवर अणुबॉम्ब वापरल्यास, ते (पाकिस्तान) इस्रायलवर अणुबॉम्बने हल्ला करतील अशी पाकिस्तानने आम्हाला खात्री दिली आहे. रेजाई म्हणाले की, पाकिस्तानने 'इराणच्या मागे उभे राहण्याची' शपथ घेतली आहे आणि मुस्लिम जगाला एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी २०२४ च्या सुरुवातीला दोन्ही देशांमध्ये झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांनंतरच्या सलोख्याकडे लक्ष वेधले. त्यांनी असाही दावा केला की, इराणची क्षमता अद्याप जगासमोर उघड झालेली नाही.

इस्रायलविरुद्ध अण्वस्त्रे वापरण्याबाबत पाकिस्तानकडून कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही, परंतु पाकिस्तानने इस्रायलविरुद्धच्या लढ्यात इराणला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे हा संघर्ष आगामी काळात आणखी चिघळण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी सांगितलं की, इस्रायलमुळे निर्माण झालेल्या संघर्षांबद्दल पाश्चिमात्य जगाने चिंता केली पाहिजे.

### ईडीची नाचक्की

स्वाक्षरी केलेल्या निवेदनात ईडीची कारवाई चुकीची असल्याचे म्हटले असून, ही वकिली व्यवसायाच्या कामकाजावर आणि कायद्याच्या राज्यावर परिणाम करणारी प्रवृत्ती आहे, जी "तपासाच्या कक्षेबाहेर" आहे. ईडीच्या अशा प्रवृत्तीवर एससीएओआरएने तीव्र चिंता व्यक्त केली आहे. बार अँड बेंचच्या अहवालानुसार, दातार हे आदरणीय ज्येष्ठ वकील आहेत ज्यांच्या प्रामाणिकपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही. व्यावसायिक आचरण आणि कायदेशीर नैतिकतेचे सर्वोच्च मानदंड त्यांनी सातत्याने राखले आहेत. एससीएओआरएने म्हटले आहे की ईडीची कारवाई कायदेशीर सल्ला गुन्हेगारी संगनमत असल्याचे सांगत आहे जे दुर्दैवी आहे. ईडीचे हे मत घटनात्मकदृष्ट्या अमान्य आणि कायदेशीरदृष्ट्या अमान्य आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

### वारीच्या लोकरंगातील 'संत सृष्टी'चे महादर्शन

शास्त्रशुद्ध सल्लामसलत आणि अभ्यासपूर्ण मांडणी

या सृष्टीचे साकारकाम सुरू करण्यापूर्वी महाराष्ट्रातील ख्यातनाम संत साहित्य अभ्यासक, संशोधक आणि उपासकांचा सल्ला घेण्यात आला आहे. यामध्ये प्रा. सदानंद मोरे, डॉ. रा. ची. ढेरे, डॉ. देगलूरकर, तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संत अध्यासन, ज्ञानेश्वर अध्यासन आणि नामदेव अध्यासन केंद्रांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच, प्रकल्पाच्या कायदेशीर पूर्ततेसाठी महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालय, जिल्हाधिकारी कार्यालय, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वास्तुशास्त्रज्ञांची मान्यता घेण्यात आली असल्याची माहिती शिल्पकार थोपटे यांनी दिली.

नव्या पिढीसाठी प्रेरणास्त्रोत

ही शिल्पसृष्टी केवळ एक प्रदर्शन न राहता, पुण्याच्या सांस्कृतिक भूमीवर एक नवे अध्याय ठरेल, असा विश्वास व्यक्त होत आहे. नव्या पिढीसाठी ही संत परंपरेचे दालन एक प्रेरणास्थान ठरेल, असे जाणकार मानतात.

पुण्यातील नागरिकांना आणि वारीप्रेमींना हे 'संत सृष्टी'चे दर्शन म्हणजे संत परंपरेतील विविध पैलूंचा साक्षात्कार होईल. महापालिकेच्या पुढाकारामुळे आणि कलावंतांच्या मेहनतीमुळे उभ्या राहिलेल्या या दृश्यसृष्टीचा अनुभव घेण्यासाठी नागरिकांनी जरूर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कर्नाटकमध्ये बाईक टॅक्सीवर...

पार्सल' हा नवीन पर्याय दिसू लागला आहे. जणू 'प्रवासी' ऐवजी आता 'पार्सल' पाठवले जात आहे! सोशल मीडियावर काही वापरकर्त्यांनी यावर मिश्किल प्रतिक्रिया दिल्या आहेत. ओला आणि उबरसारख्या इतर राईड-शेअरिंग ॲप्सवर अद्याप बाईक टॅक्सीचा पर्याय उपलब्ध आहे, मात्र चालक त्या ट्रिप्स स्वीकारत नसल्याचे दिसते.

एप्रिलमध्ये न्यायालयाने बाईक टॅक्सी सेवांना सहा आठवड्यांत थांबवण्याचे निर्देश दिले होते, जोपर्यंत या संदर्भात नियम बनवले जात नाहीत. १३ जून रोजी झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने राज्याच्या धोरणात्मक निर्णयाचा आधार घेत स्थगिती नाकारली. न्यायालयाने नमूद केले की, "राज्य सरकारने या सेवांना मान्यता न देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे आम्ही स्थगिती देऊ शकत नाही." तसेच, न्यायालयाने हेही मान्य केले की या विषयात सार्वजनिक हित आणि चालकांचा उपजीविकेचा प्रश्न दोन्ही समाविष्ट आहे.

### अजित पवार यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

त्यादृष्टीने विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बूट उपलब्ध करुन देण्यात येत आहेत, याकरिता राज्य शासन शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च करीत आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना अडीअडचणी येणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात येत आहे. शिक्षकानेही विद्यार्थ्यांना दर्जेदार ज्ञान देण्याच्यादृष्टीने अध्यापन केले केले पाहिजे, असे ते म्हणाले.

राज्य शासनाने १० कोटी वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका वृक्षाची लागवड करून त्यांचे संगोपन केले पाहिजे. यामुळे लहानपणापासून विद्यार्थ्यांवर पर्यावरण विषयक संस्कार होण्यास मदत होईल या माध्यमातून पर्यावरणाचा समतोल साधण्याचा प्रयत्न आहे, असेही अजित पवार म्हणाले. अजित पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी आलेगावचे पुनवर्सनचे सरपंच नवनाथ झुंबर कदम, मुख्याध्यापिका अनिता खताळ, ग्रामसेवक अर्चना भागवत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संभाजी कुतवळ आदी उपस्थित होते.

### दहशतवादाचे उच्चाटन ही सर्वोच्च...

येथे १७ व्या बॅचच्या प्रोबेशनर्स डेप्युटी सुपरिटेंडेंट्स ऑफ पोलिस (डीवायएसपी) आणि २६ व्या बॅचच्या प्रोबेशनर्स सब-इन्स्पेक्टर (पीएसआय) यांच्या पासिंग-आउट परेडला उपराज्यपाल उपस्थित होते. त्यांनी पोलिस अकादमीतील सर्व प्रशिक्षक आणि अधिकाऱ्यांचे आणि उत्तीर्ण होणाऱ्या डीवायएसपी आणि पीएसआयच्या कुटुंबियांचे अभिनंदन केले. त्यांनी गुप्तचर यंत्रणांद्वारे चालविल्या जाणाऱ्या दहशतवादविरोधी कारवाया करण्याचे आणि ओव्हर-ग्राउंड वर्कर्सच्या नेटवर्कवर लक्षित हल्ले तीव्र करण्याचे आवाहन केले, दहशतवाद्यांना रसद आणि आर्थिक मदत करणाऱ्या घटकांना न्यायाच्या चौकटीत आणले पाहिजे, असे सांगितले.

### चीन अण्वस्त्रांची संख्या १५०० वर नेणार

३५० आंतरखंडीय बॅलिस्टिक क्षेपणास्त्र सिलोस पूर्ण केले आहेत किंवा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. या सिलोसद्वारे चीनची क्षमता २०३० पर्यंत अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत खूप जवळ पोहोचू शकते. तरीही, २०३५ पर्यंत चीनची अण्वस्त्रांची संख्या १५०० पर्यंत पोहोचली तरी ती अमेरिका आणि रशियाच्या सध्याच्या साठ्याच्या केवळ एक-तृतीयांश इतकीच असेल. सध्या अमेरिका आणि रशियाकडे प्रत्येकी अंदाजे ४००० ते ६००० अण्वस्त्रे आहेत.

भारताच्या क्षमतेतही वाढ

भारतानेही आपली अण्वस्त्र साठवणूक वाढवली असून, 'कॅनिस्टराईज्ड' मिसाईल्स विकसित करण्यावर भर दिला आहे. हे पूर्णत्वास गेल्यावर भारत क्षेपणास्त्रांमध्ये आधीपासून वॉरहेड लावून साठवू शकेल आणि एका क्षेपणास्त्रातून अनेक वॉरहेड्स सोडण्याची क्षमता मिळवू शकेल.


## ग्रामपंचायत टाकळी -हाजी ता. शिरूर

निविदा नोटीस क्र ०१ सन २०२५ - २६ ग्रामपंचायत टाकळी हाजी ता शिरूर जी पुणे येथे सुशिक्षित बेरोजगार वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून खालील कामांसाठी दोन पाकिट पद्धतीने सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदेची नमुना रक्कम रु.२००/ जमा करून ग्रामपंचायत टाकळी हाजी येथे दिनांक १७/६/२०२५ ते २३ /६/२०२५ रोजी सकाळी दहा वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. तसेच जमा करण्यात आलेल्या सीलबंद पाकिटातील तांत्रिक लिफाफा दिनांक २४/६/२०२५ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता अथवा कार्यालयीन सोयीच्या वेळी ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | बयाना रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | आपटे वस्ती रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. ता. शिरूर, जि. पुणे | आठ लक्ष | सूट | ६ महिने |

**निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

१. सदर कामाच्या अटी व शर्तीचा तपशील कोऱ्या निविदासंचामध्ये नमूद केला आहे.
२. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरी यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत टाकळी हाजी
ता. शिरूर, जि. पुणे

**सरपंच**
ग्रामपंचायत टाकळी
हाजी ता शिरूर जि पुणे

## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळविण्यात येते की महादेव जयवंत उत्तेकर मुक्काम पोस्ट एस आर59/1A/26 रूम नं. A15 सुयोग कॉलनी रहाटणी पुणे 411017 यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेले वाहन नंबर MH-14-LQ-1745 सदर दोन चाकी वाहन त्यांचे कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सुप्रिया महादेव उत्तेकर यांच्या नावावर पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

दि.१७/०६/२०२५

**- सुप्रिया महादेव उत्तेकर,
एस आर59/1A/26 रूम नं.
A15 सुयोग कॉलनी रहाटणी
पुणे 411017**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे जळोची, ता-बारामती, जि-पुणे येथील व परिसरातील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टातील नमूद शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालक दत्तात्रय उत्तरेश्वर पिसे यांनी आमचे अशिल उज्वला नंदकिशोर सोनवळ यांना कायमखुष खरेदी देण्याचे ठरलेले असून तसा तोंडी व्यवहार ठरलेला आहे. सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध नसल्याची खात्री व भरवसा दिला आहे. परंतू या उपरही या मिळकतीचे मालकी हक्क, वाटप, ताबा, गहाण दान, लिज, बक्षिस, नोकरनामा, खंडनामा, कुळ हक्क, विसारपावती, साठेखत, खरेदीखत, वहिवाट अगर इतर बाबींबाबत कोणाचीही कसलीही हरकत, व्यवहार अगर हितसंबंध असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५(पंधरा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. अन्यथा आमचे अशिल कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध नसल्याचे ग्राह्य धरुन व असल्यास जाणिवपुर्वक सोडून दिल्याचे गृहीत धरून व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

**-: परिशिष्टः-**

तुकडी पुणे पोट तुकडी बारामती मे दुय्यम निबंधक सो., बारामती यांचे अधिकार कक्षेतील, बारामती नगरपरिषद वाढीव हद्दीतील गाव मौजे जळोची येथील गट क्र. २८७/१ यांसी क्षेत्र ०२ हे. ५१ आर + पो.ख. ०६ आर असे एकुण ०२ हे.- ५७ आर यांसी चतु:सिमा पुर्वेस - रासकर यांच गट नं. २८५, २८६, दक्षिण- सातकर यांचा गट नं. २८४, पश्चिम- रामा सातकर यांचा गट नं. २८८, उत्तर- जळोची-कन्हेरी रस्ता डी.पी. ६० फुटी रोड यापैकी लिहुन देणार यांचे समाईकातील अविभक्त हिश्श्याचे संपुर्ण क्षेत्र ०० हे. -०२.५० आर क्षेत्र यांसी चतु:सिमा पुर्वेस- २० फुटी अंतर्गत समाईक रस्ता, दक्षिणेस- अंकुश रामचंद्र कदम यांचा खाजगी प्लॉट नं. ६, पश्चिमेस - विठ्ठल राघु मासाळ व इतर यांचे क्षेत्र, उत्तरेस- रोहित घनवट यांचे क्षेत्र खाजगी प्लॉट नं. १ ते ४ हा या जाहीर नोटीसीचा विषय असे.

बारामती
दिनांक: १६/०६/२०२५
शिक्का

**अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड. सर्जेराव मारुती मलगुंडे
रा-मलगुंडेवस्ती, जळोची, ता- बारामती,
जि-पुणे. मो.नं. ८१४९०७३०७९**

## जाहीर समन्स

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे
बारामती विभागीय कार्यालयः मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२**

**कर्मवीर ग्रा.बि. शेती सह. पतसंस्था मर्या. गुनवडी**
पत्ता-प्रविण प्लाझा, सिनेमा रोड, गाळा नं. ८, ता. बारामती, जि. पुणे-४१३१०२ — अर्जदार
**विरुध्द** — **जाब देणार**

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ताटे राजेंद्र सिताराम, राजेंद्र निवास, सकाळ ऑफीस शेजारी, आमराई बारामती | ३ | १३७३/२५ | १०४१७६/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २७/०६/२०२५ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे. या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. म्हणून आज दिनांक १३/०६/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

**सही (श्री.एस.एम.तांदळे)
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे**

## जाहीर समन्स

**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे
बारामती विभागीय कार्यालयः मयुरेश्वर अपार्टमेंट, पहिला मजला, भिगवण रोड, मु. पो. बारामती, ता. बारामती, जि. पुणे. फोन (०२११२) २२९५३२**

**श्री सिद्धेश्वर ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था मर्या., पणदरे**
शाखा-बारामती, जि. पुणे — अर्जदार
**विरुध्द** — **जाब देणार**

| क्र. | प्रतिवादीचे नाव | प्रतिवादी क्र. | दावा क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | आकाश राजेंद्र जाधव मु. पो. चिमणशहा मळा, ता. बारामती, जि. पुणे | १ | ४२/२०२५ | २१०१०/- |
| २ | आयोध्या राजेंद्र जाधव मु. पो. चिमणशहा मळा, ता. बारामती, जि. पुणे | २ | ४२/२०२५ | २१०१०/- |
| ३ | गोरख शरद शिंदे मु. पो. चिमणशहा मळा, ता. बारामती, जि. पुणे | ३ | ४२/२०२५ | २१०१०/- |
| ४ | प्रवीण रमेश भोसले मु. पो. मुर्टी, ता. बारामती, जि. पुणे | १ | ५१/२०२५ | ९६६४०/- |
| ५ | दत्तात्रय हरिभाऊ भोसले मु. पो. मुर्टी, ता. बारामती, जि. पुणे | ३ | ५१/२०२५ | ९६६४०/- |
| ६ | अजयकुमार भारत शितोळे मु. पो. फुरसुंगी, हवेली, पुणे | ४ | ५१/२०२५ | ९६६४०/- |
| ७ | रामचंद्र सदाशिव साळुंखे मु. पो. हरिकृपा नगर, ता. बारामती, जि. पुणे | ३ | ४१/२०२५ | २२७०६/- |
| ८ | सुनील बाबुराव हरिहर मु. पो. कॅनॉल रोड, साने गुरुजी मार्ग, बारामती, जि. पुणे. | २ | ४८/२०२५ | ६१५९७/- |
| ९ | आकाश प्रकाश शिवरकर मु. पो. आमराई ता. बारामती, जि. पुणे | ४ | ४८/२०२५ | ६१५९७/- |
| १० | आशितोष सुहास शिळवणे मु. पो. कोष्टी गल्ली, ता. बारामती, जि. पुणे | ३ | ४०/२०२५ | ६४०४२/- |
| ११ | शैलेश शिवाजी गोंडे मु. पो. माळेगाव बु., ता. बारामती, जि. पुणे | २ | ४३/२०२५ | ३९९८६/- |
| १२ | नितीन छगनराव काळे मु. पो. काळे वस्ती, मोतीबाग, ता. बारामती | २ | ४४/२०२५ | ४६४५१/- |
| १३ | सुरेश शिवाजी शेलार मु. पो. आमराई, ता. बारामती, जि. पुणे | ३ | ४४/२०२५ | ४६४५१/- |
| १४ | दिलीप किसन चांदगुडे मु. पो. उंडवडी सुपा, ता. बारामती, जि. पुणे | ३ | ४७/२०२५ | ८८९४१/- |
| १५ | बाजीराव विलास सोनवणे मु. पो. कळंबशेत, हवेली, जि. पुणे | १ | ४५/२०२५ | ३०६१७/- |
| १६ | शशिकांत विलास व्होरकाटे मु. पो. तावशी शिर्केवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे | ३ | ४५/२०२५ | ३०६१७/- |

सदर दाव्याचे कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील प्रतिवादींना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतू प्रतिवादी यांना समन्स रुजू न झाल्याने / त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक २७/०६/२०२५ रोजी ११.३० वाजता दाव्यासंबंधी कागदपत्रांसह आपण या न्यायालयात हजर रहावे.

या नोटीशीद्वारे उपरोक्त प्रतिवादी यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून आज दिनांक १३/०६/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हा जाहीर समन्स दिला आहे.

शिक्का

सही/-
**(श्री. एस. एम. तांदळे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा)
पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्थेचे सहकारी फेडरेशन लि., पुणे



## कुपवाडा येथे स्फोट, तीन जण जखमी

**श्रीनगर :** जम्मू आणि काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्यात सोमवारी झालेल्या स्फोटात १० वर्षांच्या मुलासह तीन जण जखमी झाले, असे अधिकाऱ्यांनी येथे सांगितले. जिल्ह्यातील लंगटे भागातील कचरी येथे जुनी मशीद पाडताना हा स्फोट झाला, असे त्यांनी सांगितले. मशीद व्यवस्थापन समिती जुनी मशीद पाडून नवीन बनवत होती.



## हज यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या विमानात धूर

**लखनौ :** २४२ हज यात्रेकरूंना घेऊन जाणाऱ्या सौदी एअरलाइन्सच्या जेद्दाह-लखनौ विमानाने रविवारी येथील विमानतळावर लँडिंग करताना विमानाच्या चाकांमधून धूर निघाल्याचे आढळून आल्यानंतर अलार्म वाजला, अशी माहिती सूत्रांनी दिली. ही घटना शहरातील चौधरी चरणसिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर घडली आणि सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे विमानातून खाली उतरवण्यात आले. विमानाला कोणतीही हानी झाली नाही. "जेद्दाहहून २४२ हज यात्रेकरूंना परत आणणाऱ्या सौदी विमानाच्या चाकांमधून धूर निघत असल्याचे आढळून आले," असे सूत्रांनी सोमवारी सांगितले.

## केरळमध्ये रंगाच्या गोडाऊनला आग



**त्रिशूर (केरळ) :** सोमवारी या जिल्ह्यातील चालकुडी येथे एका रंगाच्या गोडाऊनला भीषण आग लागली, असे पोलिसांनी सांगितले. दाट लोकवस्ती असलेल्या परिसरात असलेल्या या गोदामातून दाट, काळा धूर येत होता आणि त्याच्या शेजारी अनेक दुकाने आहेत. अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या आणि आग विझवण्याचे काम सुरू केले.

## त्रिपुरात ३३ आदिवासी वसतिगृहांमध्ये स्मार्ट वर्ग

**आगरतळा :** त्रिपुराच्या आदिवासी कल्याण विभागाने राज्यातील ३३ आदिवासी वसतिगृहांमध्ये स्मार्ट वर्ग सुरू केले आहेत, ज्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाचा लाभ घेता येईल, असे एका अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले. दोन आठवड्यांच्या धरती आबा जनभागीदारी अभियानाच्या शुभारंभानिमित्त आदिवासी कल्याण मंत्री विकास देबबर्मा यांनी रविवारी आदिवासी वसतिगृहात स्मार्ट क्लासचे उद्घाटन केले. या लाँचमध्ये सर्व ३३ सरकारी वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग दिसून आला, जे नव्याने विकसित केलेल्या डिजिटल पायाभूत सुविधांचा वापर करून कार्यक्रमात सामील झाले.

## दिल्लीतील अशोक विहारमध्ये पाडकाम मोहीम

**नवी दिल्ली :** सोमवारी वायव्य दिल्लीतील अशोक विहार आणि उत्तर दिल्लीतील वजीरपूर येथे मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात असताना अधिकाऱ्यांनी तोडफोड मोहीम सुरू केली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. "अशोक विहारमध्ये तोडफोड मोहीम सुरू आहे. तिथे सुमारे २५० पोलिस अधिकारी तैनात आहेत," असे डीसीपी (वायव्य) भीष्म सिंह म्हणाले. सोमवारी सकाळी अशोक विहारमधील जेलरवाला बाग परिसरात उत्खनन यंत्रांसह एक विशेष कार्य दल (एसटीएफ) तोडफोड मोहीम राबवण्यासाठी पोहोचले.

## कोलकात्यातील खिद्दरपूर मार्केटमध्ये आग

**कोलकाता :** नैऋत्य कोलकात्यातील खिद्दरपूर येथील एका गर्दीच्या बाजारपेठेत सोमवारी पहाटे आग लागली, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. या घटनेत कोणीही जखमी किंवा बेपत्ता झाले नाही, असे पोलिसांनी सांगितले.

# इराणचे इस्रायलवर हल्ले कायम

## क्षेपणास्त्र हल्ल्यात इमारतींचे नुकसान, ५ जणांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आण्विक तळांवर होणारे हल्ले आणि लष्करप्रमुखांसह २० वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या हत्येमुळे संतापलेल्या इराणने इस्रायलवर हल्ले सुरू केले आहेत. इराणने रविवारी रात्रभर इस्रायलवर क्षेपणास्त्रांनी हल्ला केला. या हल्ल्यांमध्ये इमारतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, तर ५ जणांचा मृत्यूही झाला आहे. सुमारे १०० इस्रायली नागरिक जखमी झाल्याची माहिती आहे. इतकंच नाही तर तेल अवीवमधील अमेरिकन वाणिज्य दूतावासही इराणच्या हल्ल्यांच्या विळख्यात सापडला आहे. इस्रायलमधील अमेरिकेचे राजदूत माईक हकाबी यांनी याला दुजोरा दिला आहे. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात वाणिज्य दूतावासाचे किरकोळ नुकसान झाले असले तरी कोणीही जखमी झाले नसल्याचे त्यांनी सांगितले. सर्व कर्मचारी सुरक्षित आहेत.



आता इस्रायलनेही इराणच्या नागरी भागांवर हल्ले करण्याची धमकी दिली आहे. इस्रायलचे संरक्षणमंत्री इस्रायल काट्झ यांनी सोमवारी सांगितले की, या हल्ल्यांची किंमत आता तेहरानच्या जनतेला मोजावी लागणार आहे. ते म्हणाले की, इराणने आमच्या नागरिकांना लक्ष्य केले आहे. इराणच्या भ्याड हुकूमशहाने आमच्या नागरिकांवर हल्ले केले आहेत, असे काट्झ म्हणाले. लष्कराशी लढू न शकणारा इस्रायल आता असे हल्ले करत आहे. आता तेहरानच्या जनतेला लवकरच त्याची किंमत मोजावी लागणार आहे.

### तरी शस्त्रसंधीची चिन्हे नाहीत

● सध्या चिंतेची बाब म्हणजे युद्ध सुरू होऊन ४ दिवस उलटले तरी अद्याप शस्त्रसंधीचा प्रयत्न झालेला नाही. आता इराणने अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासालाही लक्ष्य करून युद्धाला नवी दिशा दिली आहे. एकीकडे इस्रायलच्या हल्ल्यांमध्ये आमचा हात नसल्याचे अमेरिकेने म्हटले आहे, तर दुसरीकडे हे हल्ले अत्यंत अचूक असल्याचे सांगून अमेरिकेने आपल्या कारवाईचे कौतुक केले आहे. या युद्धात इराण कोणताही धोका पत्करू शकत नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. तो कुठल्याही प्रकारे कमकुवत आहे हे दाखवणार नाही. त्यांच्यासाठी ही जगण्याची आणि वर्चस्वाची लढाई आहे. मात्र, ट्रम्प यांनी रविवारी इस्रायल आणि इराण या दोन्ही देशांना चर्चेच्या टेबलावर येण्यास सांगितले.

इराणच्या राजधानीतील लोक आधीच घाबरले असून, तेहरानमधील पेट्रोल पंप आणि गॅस पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. इस्रायली लोक हल्ल्यांना बळी पडू नयेत म्हणून लोकांना आपले सामान वाहनांमध्ये भरून दुर्गम शहरे आणि गावांमध्ये जायचे आहे. परिस्थिती अशी आहे की तेहरानचे रस्ते जाम झाले आहेत आणि लोकांना शक्य तितक्या लवकर शहर सोडायचे आहे. सामान्य इराणी लोकांना वाटते की सोमवारची रात्र जड असू शकते. इस्रायलच्या हल्ल्यात आतापर्यंत २२४ इराणी ठार झाले आहेत. याशिवाय मोठ्या संख्येने लोक जखमी झाले आहेत. तर इराणच्या हल्ल्यात १४ इस्रायली ठार झाले असून सुमारे ४०० लोक जखमी झाले आहेत.

# भारताने वाढवली तुर्कीसह पाकची चिंता

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा सायप्रस दौरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी सायप्रसला पोहोचले आहेत. यावेळी दोन्ही देशांमधील व्यापार आणि यूपीआयसह अनेक मुद्द्यांवर चर्चा होऊ शकते. भारतीय पंतप्रधानांच्या या दौऱ्यामुळे तुर्कस्तानची चिंता वाढू शकते, असेही बोलले जात आहे. विशेष म्हणजे भारताने दहशतवादविरोधी ऑपरेशन सिंदूर दरम्यान तुर्कस्तानने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला होता.

दोन दशकांहून अधिक काळानंतर कोणत्याही भारतीय पंतप्रधानांचा सायप्रसचा हा पहिलाच दौरा आहे. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, भारत आणि सायप्रस यांच्यातील द्विपक्षीय व्यापार अलीकडच्या काही वर्षांत चढ-उतारादरम्यान स्थिर असून, एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत तो १३६.९६ दशलक्ष डॉलर्स होता.

पंतप्रधान मोदींच्या सायप्रस दौऱ्याकडे तुर्कस्तान आणि पाकिस्तानमधील मजबूत संबंधांना प्रतिसाद म्हणून पाहिले जात आहे. मात्र, याबाबत सरकारने अधिकृतरित्या काहीही सांगितलेले नाही.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, सायप्रस आणि तुर्कस्तान मध्ये बऱ्याच काळापासून संघर्ष सुरू आहे आणि याची सुरुवात १९७४ मध्ये तुर्कीआक्रमण आणि बेटाच्या फाळणीपासून झाली. सायप्रसला युरोपियन युनियनचे सदस्यत्व आहे. तर, तुर्किये केवळ टीआरएनसी म्हणजेच तुर्की रिपब्लिक ऑफ नॉर्दर्न सायप्रसला मान्यता देते. सायप्रसला जाऊन संभाव्य बफर झोनला भेट देणे हा तुर्कस्तानच्या विस्तारवादाच्या विरोधात आपण सायप्रसच्या पाठीशी आहोत, असा भारताचा संदेश असल्याचे आता बोलले जात आहे.

पाकिस्तानला राजनैतिकदृष्ट्या एकटे पाडण्याच्या भारताच्या धोरणाला हा निर्णय पाठिंबा देतो. सायप्रसने काश्मीर, दहशतवाद आणि यूएनएससी सुधारणांबाबतही भारताला पाठिंबा दिला आहे.



### सायप्रस का महत्त्वाचा आहे?

● सायप्रसचे पूर्व भूमध्य सागरातील स्थान आणि आशियात राहिल्यानंतर भौगोलिकदृष्ट्या आशियात असणे भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. हे समुद्रात तुर्किये आणि सीरियाच्या जवळ आहे. याशिवाय सायप्रसची सर्वात मोठी बँक असलेल्या युरो बँकेने नुकतेच मुंबईत कार्यालय सुरू करण्याची घोषणा केली आहे. व्यवसायाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे ठरू शकते. सायप्रसचे प्रगत वित्तीय सेवा क्षेत्र, कर प्रणाली आणि शिपिंग उद्योग युरोपियन बाजारपेठेकडे बघणाऱ्या भारतीय कंपन्यांसाठी आदर्श ठरेल. आयएमईसी अर्थात भारत-मध्य पूर्व-युरोप कॉरिडॉरच्या माध्यमातून कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीनेही सायप्रस महत्त्वाचा ठरणार आहे. कारण, तो त्या एनर्जी कॉरिडॉरचा च एक भाग आहे.

### भारताचे युरोपीय महासंघाशी असलेले संबंध

● २०२७ मध्ये सायप्रसकडे ईयू कौन्सिलचे अध्यक्षपद असेल. अशा परिस्थितीत व्यापार, सुरक्षेसह अनेक मुद्द्यांवर सायप्रसबरोबरच्या संबंधांचा फायदा भारताला होऊ शकतो. एफडीआय अर्थात थेट परकीय गुंतवणुकीच्या बाबतीतही सायप्रसचा भारतात मोठा वाटा आहे.

# रशिया-युक्रेन युद्धात उत्तर कोरियाचे नुकसान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या ३ वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमधील युद्धात उत्तर कोरियाच्या प्रवेशाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. उत्तर कोरियाचे हुकूमशहा किम जोंग उन यांनी आपले मित्र पुतीन यांच्या मदतीसाठी रशियाच्या वतीने लढण्यासाठी हजारो उत्तर कोरियन सैनिक पाठवले. आता नुकतीच बातमी समोर आली आहे की, युद्धात उत्तर कोरियाचे मोठे नुकसान झाले आहे. युक्रेनमध्ये रशियन सैन्यासोबत लढणाऱ्या उत्तर कोरियाच्या हजारो सैनिकांचा मृत्यू झाल्याचा दावा ब्रिटनच्या संरक्षण गुप्तचर यंत्रणांनी नुकताच केला होता.

रशिया-युक्रेन युद्धात उत्तर कोरियाचे किमान ६००० सैनिक एकतर मारले गेले आहेत किंवा त्यातील काही ठार तर काही जखमी झाले आहेत, असा दावा या अहवालात करण्यात आला आहे. किम जोंग उन यांनी रशियात आतापर्यंत ११ हजारांहून अधिक सैनिक पाठवले आहेत. यातील निम्म्या सैनिकांचा मृत्यू ही किम जोंग उन यांच्यासाठी चांगली बातमी नाही. ब्रिटनच्या संरक्षण मंत्रालयाने रविवारी आपल्या अधिकृत सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ही माहिती शेअर केली. यावेळी किम जोंग यांनी नुकतेच रशियात इतर सैन्य



पाठवल्याचेही सांगण्यात आले आहे. उत्तर कोरियाच्या सैनिकांचे सर्वात मोठे नुकसान रशियाच्या कुर्स्क येथील ओब्लास्टमध्ये झाले असून युक्रेनच्या सैनिकांविरुद्ध लढताना शेकडो सैनिक जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे.

मात्र, या सगळ्यातही पुतीन यांना उत्तर कोरियाचा पूर्ण पाठिंबा आहे. किम जोंग यांनी नुकताच पुतिन यांना एक खास संदेश पाठवला आहे. उत्तर कोरियाच्या हुकूमशहाने रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना पाठवलेल्या संदेशात म्हटले आहे की, उत्तर कोरिया नेहमीच रशियाच्या पाठीशी उभा राहील. रशिया दिनाचे औचित्य साधून किम यांनी पुतिन यांना आपले सर्वात लाडके मित्र म्हटले आणि दोन्ही देश एकमेकांचे मित्र असल्याचे सांगितले. किम जोंग उन यांनी दोन्ही देशांमधील भागीदारी अधिक मजबूत करण्यावरही भर दिला.

# जातीय जनगणनेसाठी अधिसूचना जारी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत सरकारने देशातील आगामी जनगणना करण्यासाठी सोमवारी अधिसूचना जारी केली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने सोमवारी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, लडाख आणि हिमाचल प्रदेशमधील जनगणना सहा महिने आधीच सुरू केली जाईल. बर्फवृष्टीचा फटका बसलेल्या या राज्यांची जनगणना १ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होणार आहे. १ मार्च २०२७ पासून ही राज्ये वगळता देशभरात जनगणनेची प्रक्रिया सुरू होणार आहे. यावेळी जनगणनेत जातीय जनगणनेचाही समावेश करण्यात येणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अधिसूचना जारी होण्याच्या एक दिवस आधी केंद्रीय गृहसचिव, रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत आगामी जनगणनेच्या तयारीचा आढावा घेतला. गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, ही जनगणना दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यात प्रत्येक घराची रहिवासी स्थिती, मालमत्ता आणि सोयीसुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची मोजणी केली जाणार आहे. यावेळी प्रत्येक घरातील लोकांची संख्या, त्यांचे वय, त्यांचा रोजगार आणि इतर सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक माहिती संकलित केली जाणार आहे. विशेष म्हणजे यावेळी जनगणनेचे अधिकारी लोकांना त्यांची जातही विचारणार आहेत. स्वतंत्र भारतात अशा प्रकारची ही पहिलीच घटना असेल.



चंथाबुरी
थायलंडमधील चांथाबुरी प्रांतातील चाओ लाओ बीचवर एक नर्तक आगीशी खेळताना.

# वक्फ विधेयकाचा मुस्लिमांना मोठा फायदा होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संयुक्त संसदीय समितीत अनेक महिन्यांच्या चर्चेनंतर आणि लोकसभा आणि राज्यसभेत प्रदीर्घ चर्चेनंतर मोदी सरकारने आणलेला वक्फ (दुरुस्ती) कायदा आता अंमलात आला आहे. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान अनेक प्रकारच्या चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या गोष्टी बोलल्या गेल्या, ज्यामुळे मुस्लीम समाजात अनेक गैरसमज निर्माण झाले. हे वक्फ विधेयक अनेक अर्थांनी महत्त्वाचे आहे. या कायद्यामुळे बिगर मुस्लिम व्यक्तींचे जमीन किंवा इतर कायदेशीर प्रश्न सोडविण्यात स्पष्टता येईल, परंतु त्याचा सर्वात मोठा फायदा मुस्लिम समाजातील गरीब आणि वंचित घटकांना होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुस्लिम समाजातील गरीब, मागास वर्गीय - ज्याला पस्मांडा मुस्लिम म्हटले जाते आणि त्यापैकी बहुतेक मूळ मुस्लिम आहेत - यांच्या कल्याणासाठी आपली वचनबद्धता वेळोवेळी व्यक्त केली आहे. काँग्रेस व इतर प्रादेशिक पक्षांचे मुस्लिम तुष्टीकरणाचे धोरण, व्होट बँकेचे राजकारण आणि अशरफ वर्गाशी थेट सौदेबाजी यामुळे गरीब मुस्लिमांना हक्काचे लाभ मिळू शकले नाहीत, असे गेल्या अनेक वर्षांपासून जाणवत होते. २००६ च्या सच्चर समितीच्या अहवालात मुस्लीम समाजाची बिकट सामाजिक-आर्थिक स्थिती स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली आहे.

या अहवालानुसार मुस्लिम समाजातील साक्षरता आणि पदवीचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. नोकऱ्यांमध्ये





प्रतिनिधित्वही खूप कमी आहे. या परिस्थितीच्या कारणांवर सविस्तर चर्चा करता येईल, पण स्वत:ला मुस्लीमसमर्थक म्हणवून घेणाऱ्या काँग्रेस सरकारच्या ६० वर्षांनंतरही ही दुर्दशा कायम आहे, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. मुस्लीम समाजाच्या, विशेषत: पस्मांडा वर्गाच्या खऱ्या गरजांकडे सातत्याने दुर्लक्ष करणारे एकमेव व्होट बँक व्यवस्थापन हेच या परिस्थितीचे मुख्य कारण आहे आणि त्याचा फायदा काही निवडक लोकांपुरताच मर्यादित होता, जे या समाजाला निवडणुकीच्या राजकारणात फायदा मिळवून देण्यासाठी चिथावणी देण्यात पारंगत होते.

त्याचप्रमाणे जुन्या वक्फ कायद्याचा गैरवापर मागील सरकारच्या काळात मोठ्या प्रमाणात झाला होता, जिथे मोठ्या वक्फ मालमत्तांचा वापर समाजाच्या कल्याणासाठी नव्हे तर एका छोट्या गटाच्या हितासाठी केला जात होता. हा गैरवापर त्याच लोकांनी केला जो समाजाच्या मतांचा 'कॉन्ट्रॅक्ट' करत राहिला. मुळात वक्फ ही मुस्लीम समाजातील व्यक्तीने दिलेली देणगी असून ती समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी वापरली पाहिजे. या मिळकतींवर बेकायदा कब्जा, त्यांच्या व्यवस्थापनातील अनियमितता, भ्रष्टाचार हे सर्वश्रुत आहे. त्यांच्याविरोधात वेळोवेळी आवाज उठविण्यात आला, पण ते दडपण्यात आले.

## विद्यार्थ्यांचे शाळेत धूमधडाक्यात स्वागत

**लोणी-धामणी :** निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवार (दि. १६) रोजी इयत्ता पाचवी व इयत्ता आठवी तसेच इतर वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पहिल्याच दिवशी शालेय पुस्तके व गुलाब पुष्प व गोड लाडू देऊन धूमधडाक्यात स्वागत करण्यात आले. त्याच बरोबर इतर वर्गातील विद्यार्थ्यांना सुद्धा गोड लाडू देऊन सर्वच विद्यार्थ्यांचे तोंड गोड करण्यात आले. त्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना आनंद झाल्याचे त्यांच्या चेहेऱ्यावरून दिसत होते. यावेळी प्राचार्य कांताराम टाव्हरे यांनी सर्व विद्यार्थी व उपस्थित पालकांचे स्वागत करून संस्थेचे अध्यक्ष ॲड.प्रदिप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या चालू शैक्षणिक वर्षात नवीन उपक्रमा बद्दल व शाळेच्या गुणवतेबदल उपस्थिथांना माहिती दिली. यावेळी माजी प्राचार्या सुनंदा गोरे, माऊली कडलक यांनी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून सध्याच्या स्पर्धेच्या यूगात आताच आपले ध्येय निश्चित करण्याचे आवाहन केले.यावेळी डॉ.विलास मेंगडे, शांताराम वळसे पाटील, गणेश येवले, तानाजी टाव्हरे, सिमा वळसे, शारदा बाबंळे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक उपस्थित होते. यावेळी ग्रंथपाल सुभाष बानखेले यांनी पूस्तके वाटपाचे नियोजन केले. सूत्रसंचालन मोहन दरेकर तर आभार पर्यवेक्षक संतोष वळसे यांनी मानले.

## पळसदेवच्या सरपंचपदा बाबत उत्सुकता कायम

**लोणी देवकर :** पळसदेव गावचे सरपंच अंकुश जाधव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे गावचे सरपंच पद रिक्त झाले आहे. या सरपंच पदाच्या निवडीचा कार्यक्रम अद्याप जाहीर झाला नसता तरी नवीन सरपंच कोण होणार यासाठी सत्ताधारी व विरोधी दोन्ही गटाच्या जोरदार बैठकांचे सत्र सुरू आहे. यामध्ये विरोधक एकत्र असले तरी सत्ताधाऱ्यांमध्ये मात्र सरपंच पदावरून रस्सीखेच पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आठ सदस्यांमध्ये सरपंच पदावर एकमत होत नसल्याने सरपंच सरपंच पदाचा सस्पेन्स अधिकच वाढला आहे. सत्ताधारी गटातील काही सदस्य विरोधी गटाच्या सदस्यांना मिळून आपल्याला सरपंच पदावर संधी मिळते का, याची चाचणी करत आहेत. त्यासाठी सत्ताधारी सदस्यांच्या विरोधी गटातील सदस्यांबरोबर बैठका सुरू आहेत; मात्र सत्ताधारी आठ सदस्यांची एकत्र बैठक होताना दिसत नाही. सत्ताधारी सदस्यांमध्ये परस्परांविषयी अविश्वास यामुळे त्यांच्यामध्ये दरी अधिकच वाढली आहे त्यामुळे आगामी सरपंच सत्ताधारी गटाचा होईल की नाही, याबाबत शंका निर्माण झाली आहे आहे. सत्ताधारी गटामध्ये पहिल्यांदा सरपंच कोण होणार यावर रस्सीखेच पाहिला मिळत आहे. उरलेला सहा ते सात महिन्यांचा कालावधी पाहता गावाला आगामी दोन सरपंच मिळतील अशी शक्यता आहे.

## इंदापूर तालुक्यात मका पिकाच्या क्षेत्रात वाढ



**इंदापूर :** इंदापूर तालुक्यात नुकत्याच झालेल्या मान्सूनपूर्व पावसामुळे शेतकऱ्यांनी तातडीने नियोजन करून लगबगीने खरीप हंगामातील मका पिकाची पेरणी मोठ्या क्षेत्रावर केली आहे. पेरणी झालेले मक्याचे पीक सध्या चांगले उगवून आले असून, सध्या सुरू असलेला मान्सूनचा पाऊस मका पिकाच्या वाढीसाठी फायदेशीर ठरत आहे. इंदापूर तालुक्यात गेल्या तीन-चार दशकांपासून मक्याचे पीक मोठ्या क्षेत्रावर तीनही हंगामांत घेतले जात आहे. या पिकाने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार दिला असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीमध्ये मका पिकाचा सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे चालू खरीप हंगामामध्ये समाधानकारक पाऊस होताच शेतकऱ्यांनी उपलब्ध क्षेत्रावर मक्याची पेरणी केली. जनावरांच्या हिरव्या चाऱ्यासाठी मका पिकाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. तसेच, मका पिकापासून शेतकरीवर्ग मुरघास तयार करीत आहेत. शिवाय, बाजारामध्ये मक्याला प्रतिक्विंटल चांगला बाजार मिळत असल्याने शेतकऱ्यांना नियमित आर्थिक उत्पन्न मिळत आहे. त्याचप्रमाणे मका पिकाच्या काढणीनंतर वाळलेल्या मकवानाची साठवणूक करून चाऱ्यासाठी वापर केला जात आहे. शिवाय बुरकुंडाचा वापर देखील ज्वलनासाठी होत आहे. त्यामुळे अवघ्या चार महिन्यांत तिन्ही हंगामांत येणारे मक्याचे पीक शेतकऱ्यांना कल्पवृक्षासारखे वाटत आहे, अशी माहिती इंदापूर पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी अजितराव घोगरे यांनी दिली.

# पुणे जिल्ह्यात राजकीय खळबळ

## शिंदे सेनेचे जिल्हाध्यक्ष शरद पवारांच्या व्यासपीठावर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खासदार शरद पवारांच्या उपस्थितीत आयोजित संकल्प मेळाव्याला शिवसेना (एकनाथ शिंदे गट) पुणे जिल्हाध्यक्ष भगवान पोखरकर यांनी हजेरी लावली. या घटनेमुळे पुणे जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. नगरचे खासदार निलेश लंके यांनी ही भेट घडवून आणल्याचे बोलले जाते.

रविवारी (दि. १५) मुंबईत झालेल्या या कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, नेते जितेंद्र आव्हाड, खासदार निलेश लंके, मुंबई शहर अध्यक्षा राखीताई जाधव यांच्यासह ३६ तालुके आणि सहा जिल्ह्यांतील कार्यकर्ते उपस्थित होते. शिंदे सेनेचे पुणे जिल्हाध्यक्ष तथा खेड पंचायत समितीचे माजी सभापती भगवान पोखरकर यांनी या व्यासपीठावर शरद पवार यांच्याशी संवाद साधला. राखीताई जाधव यांनी पोखरकर यांचे व्यासपीठावर स्वागत केले. नजीकच्या कालावधीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणूका होणार आहेत. काही वर्ष रखडलेल्या निवडणुकीची कार्यकर्ते वाट पाहून आहेत. अशा पार्श्वभूमीवर या भेटीमुळे राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले असले, तरी पोखरकर यांनी याला राजकीय रंग देण्यास नकार दिला.




शिंदे शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष भगवान पोखरकर शरद पवारांच्या व्यासपीठावर उपस्थित असतानाचे हे छायाचित्र.

"राष्ट्रवादीच्या मेळाव्याच्या ठिकाणी दुसऱ्या हॉलमध्ये भावाच्या मुलीचा साखरपुडा कार्यक्रम होता. जाता-येता आग्रह झाला म्हणून मी व्यासपीठावर गेलो. याला राजकीय अर्थ काढण्यात काही तथ्य नाही," असे स्पष्टीकरण पोखरकर यांनी दिले. मात्र, शिंदे सेनेच्या जिल्हाध्यक्षांनी शरद पवार यांच्या व्यासपीठावर हजेरी लावल्याने पुणे जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर चर्चा सुरू झाली आहे. ही भेट केवळ औपचारिक होती की त्यामागे काही राजकीय हेतू आहे? याबाबत आता राजकीय निरीक्षकांच्यात चर्चा होऊ लागल्या आहेत.

# एकलहरे सर्कल चौकात अंडर बायपासचे काम लवकरच



## आंदोलन स्थगित केल्याची हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानची माहिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** पुणे नाशिक महामार्गावर एकलहरे सर्कल चौकात अंडर बायपासचे काम लवकरच करणार असल्याचे पत्र राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने दिल्याने मंगळवारी होणारे आंदोलन स्थगित केले आहे अशी माहिती हुतात्मा बाबू गेनू युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबाजी चासकर यांनी दिली.

पुणे-नाशिक महामार्गावर एकलहरे सर्कल चौकात नुकत्याच झालेल्या अपघातात दोघांना जीव गमवावा लागला. यानंतर संतापाची लाट उसळली होती. संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले होते. या ठिकाणी झालेले अपघात पाहता या भागात उड्डाणपूल तयार करावा अथवा अंडर बायपास बनवावा अशी आग्रही मागणी करण्यात आली होती. राष्ट्रीय महामार्ग विभागाने तातडीने येथे गतिरोधक टाकले आहेत तसेच अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडून टाकल्या आहे.तसेच सर्विस रस्ता काम करून खुला केला आहे. दरम्यान या संदर्भात मंचर पोलीस ठाण्यात पुणे नाशिक महामार्ग टीम लीडर दिलीप शिंदे, अरुण चौधरी, पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांच्या समवेत बैठक झाली. बाबाजी चासकर, अमोल शेलार, नितीन भालेराव, कमलेश वर्पे , सुदर्शन शिंदे, हेमंत पडवळ, दत्ता चासकर, प्रीतम पडवळ,रोहन कानडे आदी उपस्थित होते.

त्यावेळी अनेक मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन लेखी स्वरूपात देण्यात आले. एकलहरे सर्कल चौकात अंडर बायपास लवकरच केला जाईल असे पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे मंगळवार दि. १७ रोजी होणारे आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे चासकर यांनी सांगितले. स्थानिक लोकप्रतिनिधी यांना भेटून लवकरच अंडर बायपास व्हावा यासाठी प्रयत्न करणार आहोत. तसेच अपघात होऊ नये यासाठी ज्या उपायोजना आवश्यक आहे त्या करण्यात येणार असल्याने आंदोलन स्थगित झाले आहे. मंचर पोलिसांनी या ठिकाणी एकलहरे सर्कल चौक अपघाताचा ब्लॅक स्पॉट असल्याचे घोषित केले आहे.

## अवसरी ते कल्याण एसटी बससेवा पूर्ववत




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील सुरू असलेली अवसरी ते कल्याण ही एसटी बस गेली दोन महिने बंद होती. त्यामुळे अवसरी आणि परिसरातील गावातील प्रवासी व विद्यार्थ्यांचे, कामगार यांचे मोठे हाल होत होते. त्यामुळे अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक ग्रामपंचायत तिने मुरबाड आगाराला पत्रव्यवहार व पाठपुरावा केल्यानंतर मुरबाड आगाराने शनिवारी अवसरी ते कल्याण ही एसटी बस पूर्ववत चालू केल्याने नारायणगाव, आळेफाटा, ओतूर, मुरबाड, कल्याण या मार्गे दररोज ये-जा करणाऱ्या कामगार, प्रवासी व विद्यार्थ्यांची सोय झाल्याने प्रवाशांनी मुरबाड आगर प्रमुखाचे आभार मानले आहेत.

मुरबाड आगाराने गेल्या ३४ वर्षांपूर्वी कल्याण ते अवसरी ही एसटी बस मुक्कामी चालू केली होती. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, निरगुडसर, गावडेवाडी, मेंगडेवाडी या सह परिसरातील गावातील प्रवाशांची चांगली सोय झाली होती.

अवसरी कल्याण एसटी बस ३४ वर्षात सतत फायद्यात चालत होती. परंतु दोन महिन्यापूर्वी कोणतेही कारण न देता एसटी बस बंद केली. त्या मुळे या भागातील प्रवासी व विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली होती. अवसरी खुर्दचे सरपंच वैभव वायाळ, अवसरी बुद्रुकचे सरपंच सारिका हिंगे, उपसरपंच अनिल हिंगे पाटील यांनी ठाणा डिव्हिजन प्रमुख धनंजय शिंदे यांच्याशी पत्र व्यवहार केल्यानंतर शिंदे यांनी तात्पुरत्या स्वरूपात विठ्ठलवाडी कल्याण अवसरी एसटी बस विठ्ठलवाडीवरून सकाळी सहा वाजता चालू केली होती.

मात्र, प्रवासी मोठ्या प्रमाणात मिळत नसल्याने ही एसटी बस तोट्यात चालत होती व प्रवाशांच्या फायद्याची नसल्याने मुरबाड एसटी आगाराने प्रवासी व विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार शनिवारपासून कल्याण ते अवसरी ही मुक्कामी एसटी बस पूर्ववत चालू केल्याने प्रवासी व विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

# पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सुसज्ज

## नीरा एसटी बसस्थानकावर बॉम्बशोधक पथकाची तपासणी

**नीरा :** संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने पुणे जिल्हा ग्रामीण बॉम्बशोधक आणि नाशक पथकाने नीरा येथील पालखी तळावर व एस.टी. बसस्थानकाची तपासणी केली. लांब पल्याच्या एसटी बस तसेच स्थानकात श्वान व अत्याधुनिक यंत्रणेच्या सहायाने तपासणी करण्यात आली.

सध्या सुट्ट्यांचा हंगाम संपत असून, प्रवासी मोठ्या प्रमाणावर घराबाहेर पडले आहेत. तसेच काही दिवसांनी आषाढी एकादशीच्या निमित्ताने संतांच्या पायी पालखी सोहळ्याचे मार्गक्रमण होणार आहे. पायी चालता न येणारे वारकरी मोठ्या संख्येने आळंदी, पंढरपूर किंवा इतर तीर्थक्षेत्रांना तसेच पर्यटनस्थळांना भेट देत आहेत. अशा वेळी ठिकठिकाणी गर्दी पहावयास मिळते. या गर्दीच्या पार्श्वभुमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली बॉबशोधक व नाशक पथक पालखी मार्गावरील गर्दीच्या ठिकाणी कसुन तपासणी करीत आहे. घातपात विरोधी तपासणी पथके सहाय्यक पोलीस निरीक्षक गिते व त्यांच्या सहकार्यांनी अत्याधुनिक यंत्रणेसह सिद्धी नावाच्या श्वानाने तपासणी केली. प्रवासी मोठ्या उत्सुकतेने या मोहीमेकडे पाहत होते.

> आषाढी वारी सन-२०२५ चे अनुषंगाने संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील खंडोबा मंदिर जेजुरी व नीरा बस स्थानक, जेजूरी गर्दीचे ठिकाण इत्यादींची घातपात विरोधी तपासणी पथकाने तपासणी केली आहे.
> **-दिपक वाकचौरे,** सहाय्यक पोलीस निरीक्षक, जेजुरी



# शिक्षणासाठी २५ कोटींचा निधी मंजूर; आ. बाबाजी काळे यांची घोषणा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** शिक्षणाला संस्कार आणि संस्कृतीची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांना यशाचे शिखर गाठता येते. अपयशाने खचून न जाता जिद्द आणि चिकाटीने पुढे जावे, असे आवाहन आमदार बाबाजी काळे यांनी केले.

खेड तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ आणि आय.आय.बी. करिअर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि १४) आयोजित गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ३५ शाळांसाठी आदर्श मॉडेल तयार करण्यात आले असुन त्यासाठी २५ कोटींचा निधी मंजूर झाल्याची घोषणा आमदार काळे यांनी केली. अंगणवाडीपासून प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तालुक्यातील कंपन्यांच्या सीएसआर फंडातून जास्तीत जास्त निधी मिळवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, शाळांमध्ये क्रीडांगणे आणि मूलभूत सुविधांसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन त्यांनी शाळा व्यवस्थापनांना केले. शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार आणि चुका सुधारण्याचा सल्ला देताना शिक्षकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि शाळांना प्रिंटरसह भौतिक सुविधा पुरवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. मुख्याध्यापक संघासाठी भवन उभारण्यास सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

**गुणवंतांचा सत्कार :** यावेळी इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेत ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच, तालुक्यातील १०० टक्के निकाल देणाऱ्या ५७ शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक आमदार जयंत आसगावकर, शिक्षण विस्ताराधिकारी जीवन कोकणे, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव शिवाजी कामठे, खेड मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर, सचिव रामदास पवार यांच्यासह ६०० पालक, विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय बोरकर यांनी केले, सूत्रसंचालन रवींद्र चौधरी यांनी, तर आभार रामदास पवार यांनी मानले.



## ऊसतोड मुकादमावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**इंदापूर :** ऊसतोडणी हंगामासाठी मजूर पुरवण्याचे आश्वासन दिल्यानंतर सहा लाख रुपये घेवून मजूर पुरवले नाहीत व घेतलेली रक्कम ही परत केली नसल्याच्या तक्रारीवरुन जालना जिल्ह्यातील ऊसतोडणी मुकादमावर इंदापूर पोलीस ठाण्यात रविवारी (दि. १५) दुपारी फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. नारायण प्रल्हाद राठोड (रा. वडगाव (वखारी) ता. जि. जालना) असे आरोपीचे नाव आहे. संतोष बिभीषण देवकाते (रा. पडस्थळ ता. इंदापूर) असे त्याच्या विरुध्द तक्रार देणाराचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले की, सन २०२४ -२५ च्या कर्मयोगी सहकारी साखर कारखान्याच्या ऊसतोड हंगामासाठी १८ कामगार पुरवण्याचे आश्वासन देवून आरोपी राठोड याने फिर्यादी देवकाते यांच्याकडून दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी सहा लाख रुपये घेतले. मात्र गेल्या नऊ महिन्यात त्याने कामगारही पुरवले नाहीत, घेतलेली रक्कमही परत केली नाही. नोटरी समोर करारनामा करून मुदतीत रक्कम द्यायची ठरल्यानंतर देखील आरोपीने ती दिली नाही. फसवणूक केली, अशा आशयाच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल झाला आहे. इंदापूर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## हिरड्याच्या झाडाची नोंद आता सात-बारा उताऱ्यावर

**मंचर :** हिरडा पिकाला हमीभाव मिळावा, यासाठी किसान सभेचा वतीने घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर निर्धार मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळी हिरड्याच्या झाडाची नोंद सात बारा उताऱ्यावर होणार, असे आश्वासन नायब तहसीलदार शांताराम किर्वे यांनी दिले. आंबेगाव तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात हिरडा हे प्रमुख नगद रक्कम देणारे महत्त्वपूर्ण पीक आहे. हिरडा पिकासाठी आदिवासी महामंडळाने मागील वर्षी प्रतीकिलो १७० रुपये हमीभाव जाहीर केला होता व त्याप्रमाणे हिरड्याच्या खरेदीला सुरुवात देखील केलेली होती. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय किसान सभा, आंबेगाव तालुका समितीच्या वतीने नुकताच घोडेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयावर निर्धार मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी किसान सभेच्या शिष्टमंडळ व विविध विभागाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक होऊन खालील सकारात्मक निर्णय झाले. विविध निर्णय होऊन हा मोर्चा स्थगित करण्यात आला. या मोर्चाला काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते अशोक काळे पाटील व माजी जिल्हा परिषद सदस्य विजय आढारी यांनी पाठींबा दिला. या बैठकीला सहाय्यक प्रकल्प अधिकारी संदीप पाटील, सोनूल कोतवाल, आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी रोहित बनसोडे, गटविकास अधिकारी अर्चना कोल्हे, नायब तहसीलदार शांताराम किर्वे, तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे, तसेच जल जीवन मिशन व ग्रामीण पाणीपुरवठाचे अधिकारी, वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## दर घसरल्याने दूध उत्पादक अडचणीत



**इंदापूर :** इंदापूर तालुक्यात दूध उत्पादन हा केवळ व्यवसाय नाही, तर अनेक कुटुंबांचा श्वास आहे. गायी-भाकड जनावरांची सेवा करताना शेतकरी स्वतःच्या लेकरासारखं त्यांचं संगोपन करतो; मात्र याच दुधाला बाजारात न्याय्य दर मिळत नसेल, तर शेतकऱ्यांच्या कष्टांना अर्थ उरत नाही. मागील काही दिवसांपासून दूध दरात टप्प्याटप्प्याने घसरण सुरू असून, यामुळे पशुपालक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अवकाळी पावसाने आधीच दुभत्या जनावरांच्या आरोग्यावर परिणाम केला होता. त्यानंतर आता दूध पावडर आणि बटरच्या दरात घसरण झाल्याने २५ मे पासून दूध संकलन दरात प्रतिलिटर दोन रुपयांची कपात करण्यात आली आहे. इंदापूर तालुका हा दूध उत्पादनात आघाडीवर असून, सोनाई, अमूल, दूधगंगा, नेचर, गोविंद आदी प्रकल्पांमार्फत दैनिक लाखो लिटर दूध संकलन होत असले, तरी याचा लाभ शेतकऱ्याच्या पदरात कितपत पडतो, हा खरा प्रश्न आहे. दुधाला फक्त ३२ रुपये प्रति लिटर दर दिला जात आहे. पूर्वी याच दुधाला ३४ रुपये दर मिळत होता.

## वाहतूक कोंडीने बारामतीकर त्रस्त

**बारामती :** शहरातील स्टेशन रोड, गांधी चौक, महावीर पथ, सिनेमा रोड, भिगवण चौक, अहिल्यादेवी चौक, कारभारी चौक, शिवाजी चौक, गुणवडी चौक येथे वाहतूक कोंडी नित्याची झाली असून, रेल्वे उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूला असलेल्या चौकांमध्ये वाहतूक कोंडीची स्थिती चिंताजनक आहे. वाहतूक पोलिस गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी प्रयत्न करीत असले तरी वाहनांची प्रचंड संख्या आणि पार्किंगची समस्या यामुळे त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. कामांसाठी बारामती, इंदापूर, दौंड, फलटण, अहिल्यानगर आदी भागातून येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. याशिवाय तालुक्यातून मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी येतात.

# महिलांची सुरक्षितता, उन्नतीसाठी वचनबद्ध

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** महाराष्ट्र राज्याने महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात नेहमीच पुढाकार घेतलेला आहे; राज्य नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणाकरिता प्रयत्नशील असून त्यांच्या सुरक्षितता, सशक्तीकरण, उन्नतीसाठी राज्यशासन वचनबद्ध आहे. महिलांचे सन्मान आणि प्रगती ही सामाजिक जबाबदारी असण्यासोबतच महाराष्ट्राचा समृद्ध भविष्याचा पाया आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंसहाय्यता समूहांना कर्ज धनादेश प्रदान कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी गट विकास अधिकारी डॉ. अनिल बागल, सहायक गट विकास अधिकारी नंदन जंराडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिमान माने, गटशिक्षणाधिकारी निलेश गवळी, बांधकाम विभागाचे उप अभियंता शिवकुमार कुपल, माजी नगराध्यक्ष सुभाष सोमाणी आदी उपस्थित होते.



अजित पवार म्हणाले, यावर्षी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिजन्मशताब्दीवर्ष, कोल्हापूर करवीर संस्थानच्या संस्थापक छत्रपती रण रागिणी महाराणी ताराबाई ३५० व, त्रिशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्ष असून यानिमित्ताने राज्य शासनाच्यावतीने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. स्वराज्य जननी राजमाता जिजाऊमाँसाहेब, छत्रपती महाराणी ताराबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या महाराष्ट्राच्या इतिहासाचा गौरवशाली अध्याय असून हा गौरव जपण्यासोबतच वाढविण्याचे काम करावे. महाराष्ट्राच्या मातीला राजमाता जिजाऊमाँसाहेब, छत्रपती महाराणी ताराबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा वारसा असून त्यांनी कृतीतून दिलेल्या वाटेवरच वाटचाल करायची आहे, त्यांच्या कार्याचा वारसा जपत पुढे नेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे ते म्हणाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अलौकिक असून त्या सर्वोत्कृष्ट राज्यकर्त्या, शासक होत्या, त्यांच्या अंगी प्रजेच्या कल्याणाप्रती असलेली तळमळ ही त्यांच्या कार्यातून दिसून येते. त्यांनी देशात सुंदर मंदिरे उभी करण्यासोबतच विविध नद्यांच्याकडेला घाट, धर्मशाळा, गावोगावी रस्त्याचे बांधकाम, पाणपोई उभारणीचे काम केले असून असे लोककल्याणकारी कार्य त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहेत. त्यामुळे शेकडो वर्षांपूर्वी बांधलेले बारव, घाट नादुरुस्त झालेले असल्यास त्याची दुरुस्ती करण्याचे काम राज्यशासनाने हाती घेतले आहे. देशाला आत्मनिर्भर करतांना महिला आत्मनिर्भर झाल्या पाहिजे, याकरीता राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणाकरीता विविध लोककल्याणकारी, क्रांतिकारी निर्णय, उपक्रम हाती घेण्यात आले असून त्यामध्ये स्वतंत्र महिला धोरण, वडिलोपार्जित संपत्तीत समान हक्क, शासकीय सेवेत ३३ टक्के राखीव जागा, स्थानिक स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण, एसटी बस भाड्यात ५० टक्के सवलत, मुलींना मोफत शिक्षणदेण्यासोबतच उच्च व तांत्रिक शिक्षण मोफत यांच्यासह राज्यात ७ लाख नवीन बचतगटांची स्थापना करण्यासोबतच बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत ३० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

### बारामतीत महिला बचतगटांना ४ कोटीहून कर्ज वाटप...

- या वर्षी बारामती तालुक्यातील बचत गटांना सुमारे ३ कोटी १५ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले असून १ कोटीहून अधिक रुपयांच्या कर्ज मंजूरी आदेश वाटप करण्यात येत आहे, ही रक्कम नसून नव्या प्रवाशाची सुरुवात आहे, घराघरामध्ये नवीन उद्योग उभारण्यास हातभार लागणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या स्वप्नांना आणि पंखांना बळ मिळणार असून पाल्यांना शिक्षण, कुटुंबाला स्थर्य पर्यायाने गावाची समृद्धी होण्यास मदत होणार आहे, असेही ते म्हणाले.

# आंबेगाव गटाची उत्सुकता कायम

## इच्छुक उमेदवारांची आपल्या सर्कलमध्ये मोर्चेबांधणी सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मंचर :** सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सरकारला दिल्याने रखडलेल्या निवडणुकां घेण्याचे आदेश सरकारला दिल्याने रखलेल्या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्यातील कोणते गाव कोणत्या गटाला अथवा गणाला जोडले जाईल याची चर्चा रंगू लागली आहे. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी आपल्या सर्कलमध्ये मोर्चेबांधणीला सुरूवात केली आहे.




आंबेगाव तालुक्यात जिल्हा परीषद पाच गट व पंचायत समितीच्या दहा गणांमध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार बोरघर पंचायत समिती गणात आहुपे, पिंपरगणे, तिरपाड, पाटण, आसाणे, माळीण, कुशिरे बु. पंचाळे बु. बोरघर, फुलवडे, महाळुंगे तर्फे घोडा, कानसे, सुपेधर, चपटेवाडी, गंगापुर बु. गंगापुर खुर्द आमोंडी. शिनोली पंचायत समिती गणात शिनोली, फदालेवाडी - उगलेवाडी, पिंपळगाव तर्फे घोडा, डिंभे खुर्द, गोहे बु., गोहे खुर्द, डिंभे बु. कोलतावडे, राजेवाडी, पोखरी चिखली, जांभोरी, तळेघर, फलोदे, राजपुर, कोंढवळ या बोरघर व शिनोली पंचायत समिती गणासाठी समाविष्ट असणा-या ग्रामपंचायतीच शिनोली - बोरघर जिल्हा परीषद गटासाठी असतील.

घोडेगाव पंचायत समिती गणात घोडेगाव, आंबेगाव गावठाण, कोलदरा-गोनवडी, धोंडमाळ - शिंदेवाडी, चिंचोली, नारोडी, गिरवली, काळेवाडी - दरेकरवाडी, ढाकाळे, आंबेदरा, साल, तळेकरवाडी. पेठ पंचायत समिती गणासाठी पेठ, कारेगाव, भावडी, थुगाव, कुरवंडी, चिंचोडी, पिंगळवाडी-लांडेवाडी, कोळवाडी - कोटमदरा या घोडेगाव - पेठ पंचायत समिती गणासाठी समाविष्ट असणा-या ग्रामपंचायती घोडेगाव - पेठ जिल्हा परीषद गटासाठी असतील.

कळंब पंचायत समिती गणात ठाकरवाडी, चास, महाळुंगे पडवळ, विठ्ठलवाडी, टाकेवाडी, साकोरे, नांदुर, लौकी, कळंब चांडोली बु. पंचायत समिती गणात चांडोली बु., खडकी, भराडी, थोरांदळे, नागापुर, जाधववाडी, रांजणी, वळती, भागडी.या कळंब-चांडोली बु पंचायत समिती गणासाठी समाविष्ट असणा-या ग्रामपंचायती कळंब - चांडोली बु. जिल्हा परीषद गटासाठी असतील. पारगाव तर्फे अवसरी बु. पंचायत समिती गणात शिंगवे, निरगुडसर, मेंगडेवाडी, जवळे, पारगाव तर्फे अवसरी बु., काठापुर बु.. जारकरवाडी पंचायत समिती गणात पोंदेवाडी, लोणी, वाळुंजनगर, खडकवाडी, लाखणगाव, देवगाव, जारकरवाडी, रानमळा, वडगाव पीर, मांदळेवाडी, शिरदाळे, धामणी, पहाडदरा. या पारगाव तर्फे अवसरी बु. - जारकरवाडी पंचायत समिती गणासाठी समाविष्ट असणा-या ग्रामपंचायती पारगाव तर्फे अवसरी बु. - जारकरवाडी जिल्हा परीषद गटासाठी असतील.

पिंपळगाव तर्फे महाळुंगे पंचायत समिती गणात वडगाव काशिंबेग, एकलहरे, तांबडेमळा, शेवाळवाडी, निघोटवाडी, पिंपळगाव तर्फे महाळुंगे, टाव्हरेवाडी, चांडोली खुर्द. अवसरी खुर्द पंचायत समिती गणात अवसरी खुर्द, पारगाव तर्फे खेड, अवसरी बु. गावडेवाडी. या अवसरी बु. - पिंपळगाव तर्फे महाळुंगे पंचायत समिती गणासाठी समाविष्ट असणा-या ग्रामपंचायती अवसरी बु. - पिंपळगा तर्फे महाळुंगे जिल्हा परीषद गटासाठी असतील. जिल्हा परीषद गटासाठी व पंचायत समिती गणासाठी या गावांतील ग्रामपंचायती जोडले जावू शकतात अशी चर्चा पारावर रंगू लागली आहे.

# भार्गवराम देवस्थानाला लवकरच तीर्थक्षेत्राचा दर्जा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगाव :** भावळती (ता. आंबेगाव) येथील श्री भार्गवराम देवस्थानाला लवकरच तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करू, अशी ग्वाही परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांनी दिली.

भार्गवराम देवस्थानाला परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांनी भेट दिली. भार्गवराम मंदिर व परिसराची पाहणी करून त्यांनी भार्गवरामाचे दर्शन घेतले. याप्रसंगी शरद सहकारी बँकेचे संचालक शिवाजीराव लोंढे, वळती गावचे सरपंच आनंद वाव्हळ, श्री भार्गवराम देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अंकुश भोर, उपाध्यक्ष सुखदेव गांजवे, कार्याध्यक्ष सुखदेव भोर, चिटणीस अंकुश लोंढे, खजिनदार पंढरीनाथ भोर, शामराव लोंढे, अर्जुन भोर, भागवत कथाकार प्रद्युम्न महाराज कुलकर्णी, आर्किटेक्ट अरविंद ब्रम्हे, नारायणगाव येथील ब्राह्मण सेवा संघाचे अध्यक्ष कॅप्टन उमेश अवचट, एकनाथ कुलकर्णी ,हरीश भवाळकर, राजेंद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

आशिष दामले म्हणाले, वळती येथे हे डोंगराच्या गुहेत भार्गवरामाचे सुंदर मंदिर आहे. ही तपोभूमी आहे. वळती ग्रामस्थांनी भार्गवराम देवस्थानाला तीर्थक्षेत्राचा "क" दर्जा मिळावा यासाठी ग्रामस्थांनी प्रस्ताव दिला आहे. योगायोगाने त्याच दिवशी पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याकडे मी तो प्रस्ताव देऊन आता त्याची प्रक्रिया देखिल सुरू झाली आहे. त्यामुळे लवकरच भार्गवराम देवस्थानाला तीर्थक्षेत्राचा "क" दर्जा मिळेल, अशी खात्री त्यांनी दिली. सरपंच आनंद वाव्हळ यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. सुखदेव भोर, सुखदेव गांजवे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बाळासाहेब ढोरे यांनी, तर आभार शिवाजीराव लोंढे यांनी मानले.

# सरदवाडी विद्यालय पुरस्काराने सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** शिक्षण क्षेत्रात सन्मानाचा मानला गेलेला माजी आमदार स्व. चंदुकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त संत सोपानकाका बँक व संत सोपानकाका फाउंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा संत सोपानकाका स्वच्छ व सुंदर शाळा तालुकास्तरीय पुरस्कार सरदवाडी, ता. शिरुर येथील अभिनव विद्यालयास नुकताच प्रदान करण्यात आला.

शिक्षक आमदार जयंत आसगावकर, माजी आमदार संजय जगताप,पशुसंवर्धन आयुक्त कांतीलाल उमाप, सोपानकाका बँकेचे अध्यक्ष रमणीलाल कोठडिया, संचालिका राजवर्धिनी जगताप, सतिश उरसळ, नंदकुमार सागर यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देवून या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अभिनव विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक शांताराम खामकर, संदीप सरोदे व माजी मुख्याध्यापक अरुण गोरडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या विद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबर आरोग्य, स्वच्छता,शिस्त व स्वछतेची प्रतिज्ञा व पर्यावरण पटसंख्या याबाबत विद्यालयाने सर्वोच्च गुणांकन प्राप्त करत जिल्ह्यात कायम केले. अभियानाचे प्रमुख नंदकुमार सागर, कुंडलिक मेमाणे, सुधाकर जगदाळे व हनुमंत पवार यांनी विद्यालयाच्या सर्व निकषाची पाहणी करत विद्यालयाची शिफारस केली. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष,माजी आमदार सूर्यकांत पलांडे, विद्यालयाचे मावळते मुख्याद्यापक डी.जी.घावटे, संस्थेचे पदाधिकारी व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.



सरदवाडी, ता.शिरुर येथील अभिनव विद्यालयास संत सोपानकाका सुंदर स्वच्छ माझी शाळा पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. (छायाचित्र - पोपट पाचंगे, कारेगाव.)

# बालमजुरीऐवजी बालकांना शाळेत पाठवा : अॅड. चंदनशिवे




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** आजचे बालक उद्याचे भविष्य असते, त्या मुळे त्याला बालमजुरी ऐवजी शाळेत पाठवा, असे आवाहन इंदापूर तालुका विधी सेवा समितीचे करारबद्ध वकील अॅड. संजय चंदनशिवे यांनी केले.

बालकामगार दिनाचे औचित्य साधून तालुका विधी सेवा समिती,इंदापूर वकील संघटना व पुणे येथील निर्माण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अंथुर्णे भागातील गोपाळनगर भटक्या विमुक्त जाती जमाती वसाहतीत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले की, बालकामगार मजुरीमुळे देशाचा विकास खुंटतो. निरक्षरता, बालविवाहाचे प्रमाण वाढते. अंधश्रद्धा वाढण्याबरोबरच दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या वाढते. बालकांचे संवैधानिक हक्क, अधिकार हिरावले जातात. त्यामुळे खेळण्याच्या अभ्यास करण्याच्या वयात शिक्षण व संस्कार मिळण्यासाठी बालकांना शाळेत पाठवा. समाजातील शेवटच्या घटकाला ही न्याय मिळाला पाहिजे ही विधी सेवा समितीची भूमिका आहे. त्यामुळे ज्यांचे उत्पन्न तीन लाख रुपयांपर्यंत आहे असे सर्व जाती धर्मातील गोरगरीब दुर्बल घटक किंवा अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जाती जमातीतील जे पिडीत लोक आहेत, ते आर्थिक कारणांमुळे न्यायापासून वंचित राहू नयेत, यासाठी त्यांना मोफत वकील देण्याचे काम ही समिती करते, अशी माहिती यावेळी अॅड. चंदनशिवे यांनी दिली. संकेत तोरणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. किरण यादव यांनी आभार मानले. या कार्यक्रमास निर्माण संस्थेचे गणेश चवरे, दीक्षा चवरे, प्रज्ञा थोरात, प्रिया सोनवणे यांच्यासह गोपाळनगर मधील रहिवासी विशेषतः महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# डिजिटल जगातला अनोखा उद्योग

आपण जगात कुठेही असलो तरी विकसित तंत्रज्ञानामुळे आपले काम कुठेही अडत नाही. गिऱ्हाईक जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात असला तरी उद्योजक, व्यावसायिक त्याच्याशी सहजरित्या संपर्क साधू शकतात. याच पार्श्वभूमीवर सोलापूरातील अरविंद रंगा या तरूण उद्योजकाने 'डिजि-ट्विन इंजिनियरिंग सर्व्हिसेस'च्या माध्यमातून अत्यंत वेगळ्या, प्रगत उद्योगात यशस्वी पाऊल टाकले. वास्तुकलेतील पदवी घेतल्यानंतर आर्किटेक्चरल आणि स्ट्रक्चरल डिझाईन, तसेच बांधकाम व्यवस्थापनाची आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामे करणाऱ्या अरविंद यांच्या कल्पकतेचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. सोलापूरमधल्या स्वतःच्या कार्यालयात बसून जगभरातील बांधकाम क्षेत्रातील ग्राहकांसाठी ते 'बिल्डिंग इन्फॉर्मेशन मॉडेलिंग' अर्थात 'बीआयएम'चे काम करतात. सुरूवातीला 'विप्रो'मध्ये कार्यरत असणाऱ्या अरविंद यांना चार वर्षे दुबई, एक वर्ष कतार, हैदराबाद, पुणे आणि सोलापूर येथील कंपन्यामधला जवळपास पंधरा वर्षांचा उद्योगाचा अनुभव आहे. अभियांत्रिकीशी संबंधित ३० जणांचा त्यांचा स्टाफ आहे तर ७५ जणांना त्यांनी इंटर्नशिप दिली आहे. वर्षाला लाखो रूपयांची उलाढाल करणारी त्यांची प्रगती थक्क करणारी आहे.

लाख रूपयांची नोकरी सोडून त्यांनी स्वतचा उद्योग सुरू करण्याचे ठरवले. परंतु, कोणतीही रिस्क न घेता आणि सुरू असलेली नोकरी न सोडता डिजिटल क्षेत्रातील उद्योग कसा सुरू करता येईल, याविषयी अरविंद यांचा विचार सुरू होता. त्यामुळे त्यांनी घरामध्येच ऑफिस सुरू केले. सोलापुरातील विद्यार्थी इंजिनियरिंगची पदवी घेतल्यानंतर सोलापूर सोडून अन्यत्र नोकरीला जातात. परगावात आपल्या कौशल्याने चमकतात, मग ही प्रतिभावान तरुणाई सोलापुरमध्येच थांबवली पाहिजे. आपल्या शहराचा विकास झाला पाहिजे, ही तळमळ त्यांना होती. अनुभवाची शिदोरी बरोबर होतीच म्हणून 'डिजि-ट्विन' या कंपनीची स्थापना त्यांनी केली. नोकरीनिमित्त संपर्कात असलेल्या कंपन्यांशी त्यांनी संवाद साधला आणि 'डिजि-ट्विन'साठी कामे घ्यायला सुरूवात केली. कामातले कौशल्य पसंतीस उतरल्यामुळे साहजिकच कामे वाढू लागली. सोलापूरमध्ये त्यांनी बी.ई., बी.टेक, इंजिनियरिंग डिप्लोमा अगदी आय.टी.आय. ड्राफ्ट्समनचा डिप्लोमा झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन त्यातील उत्तम काम करणाऱ्यांना कंपनीत नोकरी दिली. याआधी नोकरी करत असलेल्या कंपनीबरोबर ते आता पार्टनरशिपमध्ये काम करत आहेत.

**अचिव्हर**

आभासी रचना बांधकामाचे मॉडेलिंग करून देणे हा त्यांच्या कंपनीच्या कामाचा मुख्य उद्देश आहे. ते स्वतः आर्किटेक्ट आहेत. विविध बांधकाम प्रकारांची तसेच ऑटोडेस्क, ऑटोकॅड, रेविट, बीआयएम ३६०, २डी, ३डी सॉफ्टवेअर्सच्या तांत्रिक साधनांचा उत्तम अनुभव त्यांच्या ठायी आहे. त्यांचे बांधकाम रचनेची रेखाचित्रे तयार करण्याचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे. त्यामुळेच त्यांना जगभरातील मोठ्या कंपन्यांची कामे मिळतात. मोठ्या बहुमजली इमारतींचे थ्रीडी आर्किटेक्चर ते करून देतात. त्यांची कंपनी स्थापत्यशास्त्रातील विविध कामे करते. अरविंद रंगा यांनी आपल्या अंगभूत गुणवत्तेने अल्पावधीतच मोठी झेप घेतली. अगदी तरुणवयात स्वत:बरोबरच या क्षेत्रातील तरुण पदवीधर आणि तंत्रज्ञांना संधी देण्याचे काम ते करत आहेत. आईचे संस्कार, पत्नीची साथ आणि मित्रांनी वेळोवेळी केलेली मदत आणि सहकार्यामुळे आपण यशस्वी होऊ शकलो, असे ते नम्रपणे सांगतात. येत्या काळात आपल्या उत्कृष्ट कामाने जगभरात विस्तार करण्याचे त्यांचे व्हिजन आहे. त्यांचे कर्तृत्व पाहता ते लवकरच सफल होईल, यात शंका नाही.



## शेर की जुबानी

अजब सिलसिला है
बीतती रातों का यहां,
आंखो में कभी ख्वाब रहा,
कधी ख्याल रहा

शोर यूं ही न परिंदो ने
मचाया होगा,
कोई जंगल की तरफ,
शहर से आया होगा।

फोन के रिश्ते भी अजीब होते हैं।
बॅलन्स रखकर भी लोग गरीब होते है,
खुद तो मेसेज करते नहीं,
मुफ्त के मेसेज पढने के शौकिन होते हैं।

# घ्या त्वचेची योग्य काळजी



त्वचेवरील मुरुमं, डाग, डोळ्याखालील काळी वर्तुळं किंवा कोरड्या त्वचेसारख्या समस्यांवर चेहऱ्यावर कुठले तरी क्रीम, फेसमास्क, फेसपॅक लावत असाल तर, त्याचा तात्पुरता उपयोग किंवा परिणाम तुम्हाला नक्कीच जाणवेल. मात्र या गोष्टी वापरणे बंद केल्यावर, त्वचा पुन्हा आधीसारखी होऊ लागते. असे होऊ द्यायचे नसेल तर स्किन केअरबरोबर पोषक आहार असणे खूप गरजेचे असते. ✻ **त्वचा हायड्रेटेड ठेवणे:** पाणी पिणे ही सवय आपल्या शरीरासाठी किती महत्त्वाची आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. त्यामुळे आपल्या त्वचेला तजेला देण्यासाठी, त्याला कोरडे होण्यापासून वाचवण्यासाठी दररोज योग्यप्रमाणात पाणी पिणे अतिशय गरजेचे असते. ✻ **पौष्टिक आहार:** त्वचा उत्तम राहण्यासाठी आपल्या शरीराला आतून पोषण मिळणे गरजेचे असते. त्यामुळे आहारात भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने इत्यादी पोषक घटक असणारे पदार्थ घ्यावे. विविध फळं, भाज्या-पालेभाज्या, डाळी, सुकामेवा; मांसाहार करत असल्यास अंडी, मासे यांसारख्या गोष्टींचा समावेश करा. यामुळे केवळ त्वचेलाच नाही तर तुमच्या संपूर्ण शरीराला उपयोग होईल. ✻ **क्लिंझिंग:** दररोज रात्री झोपण्यापूर्वी तुमचा चेहरा स्वच्छ करून करून मगच झोपावे. मेकअप लावला असल्यास तो न चुकता काढून टाकावा. यासाठी तुम्ही सौम्य क्लिंझिंगचा वापर करू शकता. ✻ **मॉइश्चरायझर:** त्वचेचे रक्षण करण्यासाठी दररोज, एखाद्या सौम्य मॉइश्चराइजरचा वापर करावा. यामुळे चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाही आणि त्वचा मऊ राहण्यास मदत होते. ✻ **योग्य प्रमाणात झोप घेणे :** शक्यतो ७ ते ८ तासांची झोप घेण्याचा प्रयत्न करा. रात्री आपण झोपलेलो असतो; मात्र आपले शरीर, आपल्या पेशींना पुनरुज्जीवित करण्याचे काम करत असतात. त्यामुळे आपली त्वचा तरुण दिसण्यास मदत होते. म्हणून योग्य प्रमाणात झोप घेणे महत्त्वाचे असते. ✻ **ताण नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करा:** अतिरिक्त ताणाचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. त्यामुळे योगा, ध्यान किंवा दीर्घ श्वासोत्श्वास करून आलेला ताण नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करा. ✻ **धूम्रपान करणे टाळावे:** धूम्रपान करण्यामुळे आरोग्याला हानी पोहोचते. तसेच याचा परिणाम आपल्या त्वचेवर होत असतो. त्वचा सैल पडणे, चेहऱ्यावर सुरकुत्या येणे यासारख्या समस्या धूम्रपान केल्याने उद्भवू शकतात. त्यामुळे निरोगी आणि चमकदार त्वचेसाठी धूम्रपान करू नये.

**फॅशन पॅशन**

# नातं कसं टिकवू?



मी २८ वर्षांचा तरुण असून याआधीच्या तीन नातेसंबंधांमध्ये मला अपयश आलं आहे. यामागची कारणं वेगवेगळी असली तरी भविष्यातलं कोणतंच नातं टिकाणार नाही, अशी भीती माझ्या मनात निर्माण झाली आहे. मध्यंतरी आमच्या शाळेचं रियुनियन होतं. त्यावेळी भेटलेल्या एका मैत्रिणीसोबत मी आता रिलेशनशीपमध्ये आहे. हे नातं तिने गांभीर्याने घेतलं आहे. तिला माझ्याशी लग्नही करायचं आहे. मला ती आवडत असली तरी तिच्याबद्दलची माझ्या मनातली नेमकी भावना मला कळत नाही. ती मला सोडून जाणार नसल्याने या नात्यात रहावं असं वाटून जातं. पण फक्त यामुळे मी तिच्याशी लग्न करावं का?


उत्तर : मित्रा, स्वत:ला थोडा वेळ देऊन मागे वळून बघ. आधीच्या नात्यांमधल्या अपयशांच्या कारणांचा आढावा घे. कुठे काय चुकलं हे समजून घे. नवं नातं निर्माण करताना काय टाळायला हवं हे ठरव. आपल्याला भूतकाळ बदलता येणार नाही. पण चुका सुधारून नक्कीच पुढे जाता येईल. अर्थात हे सोपं नाही. आधीच्या नात्यांमध्ये तू बरेच चढउतार अनुभवले. पण भविष्यात तुझं नातं चांगलं फुलू शकतं. स्वत:ला थोडा वेळ दे. तुझे विचार, वागणूक,भावभावना यांकडे डोळपणे बघ. गरज पडली तर समुपदेशकांनी मदत घे.

**मॅच मेकिंग**

# का दुखते पाठ?

चालणं हा सर्वोत्तम व्यायाम असल्याचं म्हटलं जातं. अगदी साधा, सरळ आणि सोपा असा हा व्यायाम कोणीही, कधीही करू शकतं. चालल्यामुळे बरेच लाभ होतात. अर्थात प्रत्येकाला चालण्याचा व्यायाम जमतोच असं नाही. चालल्यानंतर काहींना पाठीच्या दुखण्याचा त्रास जाणवू शकतो. त्यातच पाठीचं दुखणं असणाऱ्यांच्या समस्येत अधिकच भर पडू शकते. कोणत्या चुकांमुळे चालल्यानंतर पाठीचं दुखणं मागे लागू शकतं? जाणून घेऊ.

✻ चालल्यानंतर पाठीच्या खालच्या भागात दुखू शकतं. स्थूल तसंच वजन कमी असणाऱ्या लोकांना हा त्रास होऊ शकतो. अशा लोकांच्या शरीराच्या मधल्या आणि खालच्या भागात जास्त वजन असतं. यामुळे चालताना पाठीच्या खालच्या भागाला अधिक भार सहन करावा लागतो. या अतिरिक्त भारामुळे पाठीच्या स्नायूंवर ताण येऊन वेदना जाणवतात.



✻ स्नायूंवर अतिरिक्त ताण आल्यानेही तुम्हाला त्रास होऊ शकतो. यासोबतच लिगामेंट फाटल्यामुळेही पाठीचं दुखणं मागे लागू शकतं.

✻ मसल स्पॅममुळेही पाठीच्या खालच्या भागाचं दुखणं मागे लागू शकतं. अर्थात हा त्रास फार काळ टिकून राहत नाही. गरम पाण्याचा शेक दिल्यानंतर हा त्रास दूर होतो.

✻ चालणं हा सर्वसामान्य व्यायामप्रकार असला तरी चालताना शरीराची स्थिती योग्य असणं आवश्यक आहे. चुकीच्या पद्धतीने चालल्यामुळेही तुम्हाला त्रास होऊ शकतो.

म्हणूनच पाठीचं दुखणं टाळण्यासाठी योग्य पद्धतीने व्यायाम करायला हवा.

**फिटनेस फंडा**


# निसर्गरम्य कानाताल

दोस्तांनो, पावसाळा सुरू होतोय. लवकरच पर्यटनाला सुरूवात होईल. तुम्हीही या सदाबहार मौसमात भटकंतीला बाहेर पडण्याची संधी शोधत असाल. पण सध्याचे बदलते वातावरण, पावसाळ्यात हमखास दुर्घटना घडणारी ठिकाणे यांची अवश्य माहिती घ्या. पर्यटनाच्या दृष्टीने सुरक्षित ठिकाणांचा शोध घेणं आवश्यक आहे. असंच एक ठिकाण म्हणजे उत्तराखंडमधलं कानाताल नावाचं गाव. कानाताल देहरादूनपासून ८० किलोमीटर अंतरावर असून मसुरीपासून बारा किलोमीटर अंतरावर आहे. हे स्थान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे.

कानातालमध्ये कोदिया जंगल असून इथे ट्रेकिंगचा आनंद घेता येईल. बरेच पर्यटक या जंगलात सहल काढतात. इथल्या निसर्गरम्य वातावरणात मन आनंदित होऊन जातं. इथे सुरकंडा देवीचं मंदिर असून हे स्थान देवीच्या ५१ शक्तीपीठांपैकी एक आहे.

सती देवीचं डोकं याठिकाणी पडल्याचं म्हटलं जातं. हे मंदिर खूप सुंदर असून हिमालयाच्या कुशीत वसलं आहे. या गावात राहण्याची उत्तम व्यवस्था आहे. इथे स्थानिकांसोबत राहता येतं. तसंच स्थानिक भोजनाचा आस्वादही घेता येतो. फारशी वर्दळ नसणारं हे ठिकाण पर्यटकांना नक्कीच आवडेल. एखाद्या शांत आणि सुंदर ठिकाणी भटकंती करायची असेल तर कानातालची निवड करता येईल.

**भटकंती**



## स्मार्ट टीप्स

### इंटरनेट स्लो झालं आहे?

सध्या बरेच जण घरून काम करत असल्यामुळे इंटरनेट मोठ्या प्रमाणावर वापरलं जात आहे. त्यामुळे इंटरनेटचा स्पीड कमी होऊ शकतो. फोनमधील कॅचे काढून टाका. हे कॅचे वेळोवेळी काढून टाकणं आवश्यक आहे. कॅचे क्लिअर केले नाहीत तर फोनमधल्या इंटरनेटचा स्पीड कमी होतो. एपीएन सेटिंग्जकडे लक्ष द्या. एपीएन म्हणजे ॲक्सेस पॉईंट नेटवर्क. एपीएन सेटिंग्ज योग्य नसेल तर इंटरनेटचा स्पीड कमी होतो. फोनच्या बॅकग्राउंडमध्ये एखादं ॲप सुरू असल्यास डाटा खर्च होत राहतो. म्हणूनच असं एखादं ॲप बंद करून टाका. अशा पद्धतीने तुम्ही तुमच्या मोबाईल डाटाचा स्पीड वाढवू शकता.

## व्हॉट्स न्यू?

### व्हॉट्सॲपचे नवीन सुरक्षा फीचर!

व्हॉट्सॲपने आपल्या यूजर्ससाठी स्क्रीनशॉट ब्लॉकिंग फीचर आणले आहे. युजर्सची प्रायव्हसी लक्षात घेऊन हे फिचर सादर करण्यात आले आहे. स्क्रीन ब्लॉकिंग फिचरच्या मदतीने, वापरकर्ते एकदा पहा म्हणून पाठवलेले व्हिडिओ आणि फोटोंचे स्क्रीनशॉट घेऊ शकणार नाहीत. व्हॉट्सप व्ह्यू वन्स फोटो आणि व्हिडिओची नवीन आवृत्ती रिलीज करणार आहे. वापरकर्त्याला स्क्रीनशॉट आणि स्क्रीन रेकॉर्डिंग करण्यापासून प्रतिबंधित करून वापरकर्त्यांची गोपनीयता सुधारणे हा त्याचा उद्देश आहे. सध्या, हे वैशिष्ट्य फक्त काही बीटा वापरकर्त्यांसाठी उपलब्ध आहे. यासाठी यूजर्सला गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सपचे नवीन बीटा व्हर्जन डाउनलोड करावे लागेल.



## ॲप वर्ल्ड

### फोनमधून 'ही' फाईल त्वरित काढा!

कॅशे साफ करण्यासाठी तुमच्या अँड्रॉइड फोनमधल्या सेटिंग्ज मेनूमधल्या 'स्टोरेज' सेक्शनमध्ये जा. ॲपमधला डेटा साफ करायचा आहे त्याची निवड करा. ॲपच्या सेटिंग्जमध्ये तुम्हाला 'क्लिअर कॅशे' आणि 'क्लिअर स्टोरेज' असे पर्याय दिसतील. तात्पुरत्या फाइल्स हटवण्यासाठी 'क्लिअर कॅशे'वर टॅप करा. 'क्लिअर स्टोरेज' हा पर्याय फार सावधगिरीने निवडा. कारण, या ऑप्शनमुळे सर्व डेटा नाहीसा होऊ शकतो. कॅशे क्लिअर न केल्यामुळे फोनचा परफॉर्मन्स बिघडू शकतो. कॅशे फाइल्स साठवल्या जातात आणि कालांतराने तुमच्या फोनची स्टोरेज स्पेस आणि सिस्टीम भरते. फोनचं स्टोरेज फुल असल्यामुळे अनेक समस्या उद्भवतात. उदाहरणार्थ, ॲप लोड होण्यासाठी जास्त वेळ लागतो. दोन ॲप्समध्ये स्विच करण्यास वेळ लागतो आणि फोन हळूहळू काम करण्यास सुरवात करतो.

## स्मार्ट ट्रिक्स

### असं शोधा अधिक रॅम वापरणारं ॲप

मल्टीटास्किंगसाठी अधिक रॅम असणारा मोबाईल खरेदी केला जातो. मात्र सततच्या वापरामुळे मोबाईलचा वेग मंदावतो. आपली कामं झटपट होत नाहीत. एखाद्या ॲपमुळे असं होऊ शकतं. सोशल मीडिया ॲप्स तसंच ग्राफिक गेम्स फोनमधल्या रॅमचा अधिक वापर करतात. याच कारणामुळे फोन मंद गतीने काम करू लागतो. आता फोनची गती मंद करणारी ॲप्स कशी शोधून काढायची तर त्यासाठी तुम्हाला युक्ती करावी लागेल. तुम्हाला सर्वात आधी सेटिंग्जमध्ये जावं लागेल. इथे स्टोरेज किंवा मेमरी पर्यायावर क्लिक करा. मग तुम्हाला मोबाईलची किमी मेमरी वापरली आहे हे कळेल. कोणत्या ॲपने किती जागा व्यापली आहे हे बघा. यासाठी मेमरी युज्ड बाय ॲप्सवर क्लिक करा. इथे तुम्हाला कोणतं ॲप किती रॅम वापरतं हे कळेल. अधिक रॅम व वापरणारं ॲप तुम्ही डिलिटही करू शकता.



# चटपटीत चिप्स भेळ

दोस्तांनो, संध्याकाळच्या वेळी काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. अशावेळी पटकन भेळेचा पर्याय निवडला जातो. भेळ म्हटली की चुरमुरे हवेत. पण तुमच्याकडे बटाटा वेफर्सचं एखादं पाकिट असलं तरी भेळ बनवता येईल. चला तर मग, पटकन होणारी ही रेसिपी ट्राय करू या.

**सामग्री:** बटाटा वेफर्स, चिरलेला कांदा, टॉमेटो, हिरव्या मिरच्या, फरसाण, शेव, लिंबाचा रस

**कृती:** बटाटा वेफर्सचे छोटे तुकडे करा. त्यात कांदा, टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. नीट मिसळून घ्या. मग फरसाण आणि शेव घालून थोडा लिंबाचा रसही घाला. सर्व घटक नीट मिक्स करा. वेफर्स, फरसाणात मीठ असतंच. तुमच्या चवीनुसार मीठ घाला. वरून कोथिंबिरही घालता येईल. संध्याकाळच्या चहासोबत ही चिप्स भेळ मस्त लागेल. इतकंच नाही तर मित्रमंडळींकडून तुमच्या कल्पकतेचं कौतुकही होईल.

**झटपट रेसिपी**

# नोकरीच्या मुलाखतीला जाताय?

आयुष्यात पहिल्यांदाच मुलाखत देणार असाल तर काही बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे. ज्याचे पालन करून मुलाखतीला धीराने सामोरे जाऊ शकाल. आत्मविश्वास बाळगा: कोणतीही नोकरी मिळविण्यासाठी केवळ शैक्षणिक पात्रता आणि कौशल्य आवश्यक नाही, तर तुम्ही तुमचा मुद्दा पूर्ण आत्मविश्वासाने मांडणेही खूप महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुलाखत देताना १०० टक्के आत्मविश्वास बाळगा.

✻ देहबोलीचीही काळजी घ्या:
मुलाखतीदरम्यान देहबोलीचीही काळजी घ्यावी लागते. मुलाखतीसाठी जाताना चालण्याच्या, बसण्याच्या पद्धती योग्य असाव्यात.

✻ आयकॉन्टॅक्ट टाळू नका :
मुलाखत देताना आयकॉन्टॅक्ट टाळू नये. अस्वस्थ झाल्यामुळे इकडे तिकडे बघत उत्तरे देणे टाळा. त्यामुळे चुकीचा अर्थ जाण्याची शक्यता असते.

✻ कंपनीची माहिती ठेवा: इंटरव्हू देत असलेल्या कंपनीची माहिती मिळवा. यासाठी संबंधित कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवर जाऊन तपशील मिळवू शकता. यामुळे चांगली छाप पडते. यासोबतच तुम्ही या नोकरीबाबत खरोखरच गंभीर आहात, असेही मुलाखतकाराला वाटते.

**वेगळ्या वाटा**






# पुणे वॉरियर्स संघाला पहिलेवहिले विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महिला महाराष्ट्र प्रीमियर लीग(डब्लूएमपीएल) 2025 स्पर्धेत थरारक अंतिम लढतीत कर्णधार अनुजा पाटील नाबाद ३०धावा व २-३०) हिने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पुणे वॉरियर्स संघाने सोलापूर स्मॅशर्स संघावर १ धावेने थरारक विजय मिळवत पहिलेवहिले विजेतेपद संपादन केले. याआधीच्या साखळी फेरीत पुणे वॉरियर्स संघाविरुद्ध दोन्ही लढतीत सोलापूर स्मॅशर्स संघावर विजय मिळवला होता. या विजयाबरोबरच पुणे वॉरियर्स संघाने आपली अपराजित राहण्याची मालिका कायम ठेवत विजेतेपदावर आपले नाव कोरले.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत सुरुवातीला पावसाच्या व्यत्ययामुळे सामना प्रत्येकी १८ षटकांचा खेळविण्यात आला. सोलापूर स्मॅशर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. सलामीवीर ख़ुशी मुल्ला १७ धावा काढून तंबूत परतली. त्यात तिने ३चौकार मारले. सोलापूरच्या शरयू कुलकर्णीने खुशीला झेल बाद केले व संघाला पहिला धक्का दिला. सुहानी कहांडळने २० धावा काढून बाद झाली. त्यानंतर अक्षया जाधवने २३चेंडूत १चौकार व २षटकारासह २९धावा काढून संघाची धावगती वाढवली. कर्णधार अनुजा पाटीलने २१चेंडूत नाबाद ३० धावांची संयमी खेळी केली. तिने २चौकार व १षटकार खेचले. अनुजाने श्वेता मानेच्या समवेत चौथ्या विकेटसाठी ३८चेंडूत ५३ धावांची भागीदारी करून संघाला १८षटकात ६ बाद १२९ अशी समाधानकारक धावसंख्या उभारून दिली. सोलापूर स्मॅशर्सकडून स्वांजली मुळे(२-६), आचल अगरवाल(२-२६) यांनी सुरेख गोलंदाजी केली.

१२९धावांचे आव्हान सोलापूर स्मॅशर्स संघाला १८ षटकात ६बाद १२८धावाच करता आल्या. सोलापूरची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. ईश्वरी अवसरे(८) धावांवर तंबूत परतली. तिला पुणे वॉरियर्सच्या अनुजा पाटीलने झेल बाद केले. त्यानंतर स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या कर्णधार तेजल हसबनीसने आक्रमक सुरुवात केली. तिने २चौकार व १षटकार ठोकले. पण पुणे वॉरियर्सच्या इशिता खळेने तिला पायचीत केले व सोलापूर स्मॅशर्सला मोठा धक्का दिला. ईश्वरी सावकारने २०चेंडूत १चौकारासह २२धावांची खेळी करून धावफलक हलता ठेवला. ईश्वरी सावकारला चोरटी धाव घेत असताना धावबाद झाली. मुक्ता मगरेने एकाबाजूने संघाची धुरा सांभाळताना चेंडूत चौकारासह ४० धावांची खेळी केली. मुक्ता मगरेला इशिता खळेने झेल बाद करून सामन्यातील रोमांच वाढवला. शाल्मली क्षत्रियने धावांची खेळी करून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

सोलापूर स्मॅशर्स संघाला विजयासाठी ६ चेंडूत ९ धावांची आवश्यकता होती. हे षटक कर्णधार अनुजा पाटीलने घेतले. पहिल्या चेंडूवर दामिनी बनकरने एक धाव घेतली. त्यानंतर शाल्मलीने चौकार मारत विजयाचे लक्ष्य आणखी कमी केली. पण चौथ्या चेंडूवर शाल्मलीला तिने अनुजाने स्वतःच्याच गोलंदाजीवर झेल घेतला व सामन्यात रंगत आणली.

## लिंबच्या सुपुत्राचा पराक्रम!



**लिंब :** येथील माजी सैनिक आणि सध्या पोलिस दलात कार्यरत असणाऱ्या कृष्णा ज्ञानदेव सोनमळे यांनी दक्षिण आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये यश मिळवले. ९० किलोमीटर लांबीच्या अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धेत भारतीय खेळाडूंमध्ये १३ वा क्रमांक मिळवला आहे. लिंब (ता. सातारा) येथील कृष्णा सोनमळे यांनी अवघ्या आठ तास ४५ मिनिटांत ९० किलोमीटर अंतर पार करून साताऱ्यासाठी पहिले बिल रोवण मेडल मिळवले. महाराष्ट्र पोलिस दलामध्ये सर्वात कमी वेळेत स्पर्धा पूर्ण करण्याचा बहुमान त्यांनी मिळवला. मागील सहा महिन्यांपासून त्यांनी डॉ. संदीप काटे आणि पंकज रावळू, कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव केला आहे. कॉम्रेड मॅरेथॉन ही जगातील एक सुप्रसिद्ध अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा आहे. दक्षिण आफ्रिकेतील पीटर मॅरिझबर्ग ते डर्बन या शहरादरम्यान ही स्पर्धा आयोजित केली गेली. स्पर्धेचा संपूर्ण मार्ग हा चढ- उतारांनीयुक्त असल्यामुळे ही एक खडतर स्पर्धा समजली जाते. चालू वर्षी या स्पर्धेचे ९८ वे वर्ष होते. जगभरातील ८० देशांमधून एकूण २३ हजारांपेक्षा जास्त स्पर्धकांनी स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. भारतातल्या ४०० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदविला. १२ तासांच्या आत स्पर्धा पूर्ण करणाऱ्या धावपटूंनाच पदक देऊन गौरवण्यात येते.कृष्णा सोनमळे यांनी आठ जून २०२५ ला झालेल्या या कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये दक्षिण आफ्रिकेचे नागरिक मोठ्या संख्येने रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून चिअरअप करत होते. विशेषतः भारतीय स्पर्धकांना इंडिया इंडिया, नमस्ते, जय हिंद अशा घोषणांनी प्रोत्साहन देत होते. स्पर्धेच्या सुरुवातीला हाडे गोठवणारी थंडी आणि त्यानंतर भर दुपारी कडाक्याचे ऊन याचा सामना करत त्यांनी ९० किलोमीटरचे अंतर पार केले, तसेच त्यांना वेळोवेळी डॉ. सुधीर पवार, सागर निंबाळकर, संतोष शेडगे, संदीप सोनमळे, निरंजन पिसे यांचे सहकार्य लाभले.

## शार्दूलच्या १२२ धावा, संघात नसलेल्या सर्फराजचेही शतक

**नवी दिल्ली :** भारतीय संघ शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली नवी सुरुवात करण्यासाठी सज्ज झाला आहे. रोहित शर्मा व विराट कोहली या दोन सीनियर्सच्या निवृत्तीनंतर कसोटी संघाची जबाबदारी शुभमनसह अनेक युवा खेळाडूंच्या खांद्यावर आहे. त्यांच्या मदतीला लोकेश राहुल, करुण नायर, जसप्रीत बुमराह, रवींद्र जडेजा हे सीनियर खेळाडू आहेतच. या संघाला चांगला सराव मिळावा यासाठी भारत अ संघाविरुद्ध अडीच दिवसांचा सराव सामना खेळवण्यात आला आणि आता २० जूनपासून सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया सज्ज झाली आहे. पण, भारत आणि भारत अ यांच्यातल्या सराव सामन्यात कोण चमकले, कोण अपयशी ठरले, यावर लक्ष टाकायला हवं. भारत अ आणि इंग्लंड लायन्स यांच्यात दोन सराव सामने झाले आणि त्यात भारतीय संघाचे सदस्य असलेले काही खेळाडू खेळले. त्यात शार्दूल ठाकूर, करुण नायर, ध्रुव जुरेल, लोकेश राहुल यांचा समावेश होता. यांनी हे सराव सामन्यात चांगली कामगिरी केली आणि त्यानंतर भारत अ विरुद्धच्या सामन्यातही छाप पाडली. इंग्लंड यान्सविरुद्ध दमदार खेळ करणाऱ्या सर्फराज खानने भारताविरुद्धच्या सराव सामन्यात शतक झळकावले. पण, तो मुख्य संघाचा सदस्य नाही. त्याने इंग्लंड लायन्सविरुद्धही ९४ धावांची खेळी केली होती. काल शार्दूल ठाकूरने १२२ धावांची खेळी करून मुख्य संघातील प्लेइंग इलेव्हनसाठी आपला दावा ठोकला आहे. २० जूनपासून इंग्लंड-भारत यांच्यातली पहिली कसोटी सुरू होत आहे आणि शार्दूलच्या अष्टपैलू कामगिरीने निवड समितीला त्याचा विचार करण्यास भाग पाडले आहे. शार्दूल २०२३ मध्ये बॉक्सिंग डे कसोटीत भारताकडून शेवटचा कसोटी सामना खेळला होता आणि तो आात इंग्लंड-भारत कसोटी मालिकेतून पुनरागमनासाठी सज्ज आहे.

## सहाव्या फेरीअखेर खुल्या गटात विहान आघाडीवर



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या वतीने आयोजित व एमसीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या एच2इ पॉवर सिस्टीम महाराष्ट्र राज्य 11 वर्षाखालील खुल्या व मुलींच्या गटात फिडे रेटेड निवड बुद्धीबळ स्पर्धेत खुल्या गटात विहान अग्रवाल 6 गुणांसह आघाडी प्राप्त केली.

कर्वे रोड येथील श्री गणेश सभागृह या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत खुल्या गटात दुसऱ्या पटावर लढतीत मुंबई उपनगराच्या मुंबई शहरच्या रेयांश वेंकटचा पराभव करून 6 गुणांसह आघाडी प्राप्त केली.पहिल्या पटावर लढतीत मुंबई शहराच्या निर्वाण शहाने कोल्हापूरच्या विवान सोनीला बरोबरीत रोखले व 5.5गुण मिळवले. पुण्याच्या केविन माथीयाझगणने आपला शहर सहकारी शौर्य भोंडवेचा, तर पुण्याच्या सालेब जॉनने सक्षम उपाध्यायचा पराभव करून 5.5 गुण मिळवले.

मुलींच्या गटात संभाजीनगरच्या भूमिका वाघेलाने मुंबई शहरच्या त्वेशा जैनचा, तर मुंबई उपनगरच्या गिरीशा पैने रायगडच्या प्रिशा घोलपचा पराभव करून 5.5 गुणांची कमाई केली.

## अदानी महाराष्ट्र प्रीमियर लीग : पुणेरी बाप्पाचा पीबीजी कोल्हापूर टस्कर्सवर रोमहर्षक विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित अदानी महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ स्पर्धेत अद्वैय सिधये याने केलेल्या नाबाद ५८ धावांच्या खेळीसह रामकृष्ण घोष(२-६२ व ५०धावा) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर ४एस पुणेरी बाप्पा संघाने पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघावर ५ गडी राखून रोमहर्षक विजय मिळवला.




गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत ४एस पुणेरी बाप्पा संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघाने आपल्या सलामीच्या जोडीत बदल केला. सचिन धस व अंकित बावणे या जोडीने ६५चेंडूत ९७धावांची सलामी दिली. यात सचिन धसने आक्रमक फलंदाजी करत ३३चेंडूत आपले अर्धशतक साजरे केले. त्याने ५चौकार व ४षटकाराची आतषबाजी करत सुरेख खेळी केली. ३७धावांवर असताना अद्वैय शिधेने त्याला जीवदान दिले. सचिन धस ३६चेंडूत ६० धावांची खेळी करून बाद झाला. पुणेरी बाप्पाच्या सोहन जमालेने त्याला झेल बाद केले. पाठोपाठ १२व्या षटकात सोहनने अंकित बावणेला त्रिफळा बाद करून संघाला दुसरा धक्का दिला. अंकितने ३२चेंडूत ४चौकारासह ३५ धावांची खेळी केली. सिद्धार्थ म्हात्रे २६ धावावर तंबूत परतला. त्याने २षटकार मारले. मधल्या फळीतील फलंदाज धनराज शिंदे(५), श्रीकांत मुंढे(२), आनंद ठेंगे(१) हे झटपट बाद झाले. चौथ्या क्रमांकास आज फलंदाजीस आलेल्या कर्णधार राहुल त्रिपाठीने १७ चेंडूत ४५धावांची आक्रमक खेळी केली. त्यात त्याने १चौकार व ५ उत्तुंग षटकार संघाला निर्धारित षटकात १८६धावाचे आव्हान उभे करून दिले. ४एस पुणेरी बाप्पा संघाकडून सोहन जमाले(२-२४), सचिन भोसले(२-२२), रामकृष्ण घोष(२-६२) यांनी मोठे आव्हान उभारण्यापासून रोखले.

४एस पुणेरी बाप्पा संघाला विजयासाठी १८७धावांचे आव्हान होते. पॉवरप्लेमध्ये यश नाहर(४), मुर्तुझा ट्रंकवाला(९) हे बाद झाल्याने पुणेरी बाप्पा २ बाद ३३धावा अशा स्थितीत होता. ऋषिकेश सोनावणे २३धावा, यश क्षीरसागर २५ धावा काढून बाद झाला. त्यामुळे पुणेरी बाप्पा संघ ४ बाद ८० धावा अशा बिकट स्थितीत होता. विजयासाठी पुणेरी बाप्पा संघाला ५५चेंडूत १०७ धावा असे समीकरण होते. पाचव्या क्रमांकास फलंदाजीस आलेल्या अद्वैय सिधयेने ३६चेंडूत नाबाद ५८ धावांची झंझावती खेळी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. त्यात त्याने ५ षटकार मारले. त्याला रामकृष्ण घोषने २३चेंडूत ५० धावांची तुफानी खेळी करत साथ दिली.

## १२ प्रयत्न १२ वर्ल्ड रेकॉर्ड!




**नवी दिल्ली :** स्वीडनच्या अर्मांड डुप्लांटीसे ६.२८ मीटर उंची गाठून पुन्हा एकदा बांबू उडीचा स्वतःचाच विक्रम मोडला. स्टॉकहोम येथे रविवारी डायमंड लीगमध्ये त्याने १२ व्यांदा स्वतःताच वर्ल्ड रेकॉर्ड मोडून एक नवा विक्रम प्रस्तापित केला. अमेरिकेत जन्मलेल्या अर्मांडने उंच उडीत प्रत्येक वेळी १-१ सेंटीमीटरने आपल्यासमोरील लक्ष्य वाढवून १२ वेळा वर्ल्ड रेकॉर्ड नोंदवला. दोन ऑलिम्पिक सुवर्णपदकं नावावर असलेल्या या खेळाडूने फेब्रुवारीमध्ये नोंदवलेल्या वर्ल्ड रेकॉर्डपेक्षा काल एक सेंटीमीटर जास्त उंची गाठली. घरच्या मैदानावर खेळताना अर्मांडने चाहत्यांना निराश केले नाही. चाहतेही त्याचा उत्साह वाढवण्यासाठी मोठ्या संख्येने स्टेडियममध्ये उपस्थित होते. १९१२ मध्ये स्वीडनच्या राजधातील उभारलेल्या ऑलिम्पिक स्टेडियमवर टाळ्यांचा कडकडाटात अर्मांडचे स्वागत केले. कर्टीस मार्शलने चांगली लढत दिली, परंतु ऑस्ट्रेलियन खेळाडूला ५.९० मीटर अंतर यशस्वीरित्या गाठता आले. सहा मीटर अंतर पार करण्याचे त्याचे तीन प्रयत्न अयशस्वी ठरले. त्यामुळे अर्मांडसोर आव्हानच उरलं नव्हतं. २५ वर्षीय अर्मांडने अगदी सहजतेने ६.२८ मीटर उंच उडी मारली आणि १२ वेळा स्वतःचाच विश्वविक्रम मोडला. वर्ल्ड रेकॉर्ड केल्यानंतर त्याचा जल्लोष पाहण्यासारखा होता.

## मुंबई उपनगर पूर्व यांची मुलींमध्ये, तर सांगली यांची मुलांमध्ये विजयी सलामी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुंबई उपनगर पूर्व, सांगली यांनी ९ल्या "आदित्य चषक" १८वर्षाखालील मुले व मुली राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत अनुक्रमे मुली व मुलांमध्ये विजयी सलामी दिली. स्पर्धेचे उदघाटक आदित्य ठाकरे वेळे अगोदर उपस्थित राहिल्याने सामने वेळे अगोदर सुरू झाले. पुणे येथील छत्रपती शिवाजी महाराज बंदिस्त क्रीडा संकुल येथील मॅट वर झालेल्या मुलींच्या पहिल्या सामन्यात मुंबई उपनगर पूर्वने मुंबई शहर पश्चिमचा ४५-३५ असा पाडाव केला. मध्यांतरा पर्यंत अत्यंत चुरशीने खेळला गेलेल्या या सामन्यात २३-१७ अशी उपनगर कडे आघाडी होती. उत्तरार्धा मात्र उपनगराच्या सेरेना म्हसकर, प्रांजल जाधव, आस्था सिंग यांनी अधिक जोषपूर्ण खेळ करीत सामना आपल्या बाजूने झुकविला. मुंबई शहराच्या ऋतिका शिंदे, झारा शेख यांनी निकराची लढत दिली. पण त्यांना अपयश आले.



मुलांच्या सामन्यात सांगलीने अत्यंत चुरशीच्या सामन्यात पुणे ग्रामीणचा प्रतिकार ३६-२९ असा मोडून काढला. विश्रांतीला १७-१८ अशा पिछाडीवरून सांगलीने ही विजयाची किमया साधली. शेवटची ५ मिनिटे पुकारली तेव्हा २८-२८ अशी बरोबरी होती. पण सांगलीच्या यशराज आडकेने शेवटच्या २मिनिटात शिलकी २ गडी टिपत पुण्यावर लोण देत आपला विजय निश्चित केला. यशला आदित्य जाधवची उत्तम साथ लाभली. सांगलीने ४ अव्वल पकडी देखील केल्या. पुण्याचा सुरज चांदणे एकाकी लढला.

या स्पर्धेचे उदघाटन शिवसेनाचे युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. तद्प्रसंगी स्पर्धा आयोजक आमदार सचिन अहिर, राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबुराव चांदेरे, खजिनदार मंगल पांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## अफवांवर विश्वास ठेवू नका!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत-इंग्लंड कसोटी मालिकेला २० जूनपासून सुरुवात होत आहे. रोहित शर्मा, विराट कोहली व आर अश्विन या तीन सीनियर खेळाडूंच्या अनुपस्थितीत टीम इंडियाचा हा पहिलाच कसोटी दौरा आहे. या तिघांनी निवृत्ती जाहीर केली आहे आणि कसोटी संघाची धुरा शुभमन गिलच्या खांद्यावर सोपवली गेली आहे. त्यामुळे त्याच्या कामगिरीवर सर्वांचे लक्ष आहे. भारत अ विरुद्धच्या सराव सामन्यात गिलने अर्धशतक झळकावून आश्वासक चित्र दाखवले आहे, परंतु इंग्लंडविरुद्ध त्याची खरी कसोटी असणार आहे. अशात भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर कौटुंबिक कारणास्तव मायदेशात परतला आणि तो कधी परतणार हे अद्याप स्पष्ट नाही.


मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या आईला हृदयविकाराचा झटका आला होता आणि त्यांच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. त्यामुळे गंभीर सध्या भारतात आहे. लंडनमध्ये भारतीय संघाने सराव सामना खेळला आहे आणि ते १७ जूनला हेडिंग्लेच्या दिशेने प्रवास करणार आहेत. १८ व १९ जूनला तिथे सराव सत्र आयोजित केले गेले आहे. पण, २० जूनपासून सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटीत टीम इंडियाचा हेड कोच कोण असेल? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

गंभीरच्या अनुपस्थितीत राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख व माजी खेळाडू व्ही व्ही एस लक्ष्मण यांच्याकडे ही जबाबदारी दिली जाईल, अशी चर्चा आहे. ते भारताच्या १९ वर्षांखालील संघासोबत लंडनमध्येच आहेत.

## ईशान रोहिल्ला , भूमेश उत्तरानी, ऋषिकेश होळे, आरव भाटिया, रोहिथ एम यांचे विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा मेट्रोपॉलिटन बॅडमिंटन संघटना(पीडीएमबीए) यांच्या वतीने आयोजित बीएआय आणि एमबीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या व्ही.व्ही.नातु स्मृती करंडक योनेक्स सनराईज अखिल भारतीय वरिष्ठ मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत ईशान रोहिल्ला , भूमेश उत्तरानी, ऋषिकेश होळे, आरव भाटिया, रोहिथ एम यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून पात्रता फेरीच्या तिसऱ्या चरणात प्रवेश केला.



पी.ई.सोसायटीज मॉडर्न पीडीएमबीए स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर व पीवायसी हिंदू जिमखाना येथील बॅडमिंटन हॉलमध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत दुसऱ्या पात्रता फेरीत पुरुष ड गटात ईशान रोहिल्ला याने यशवंत साळोखेचा 15-09, 10-15, 15-05 असा संघर्षपूर्ण पराभव केला. भूमेश उत्तरानीने सात्विक मुर्तीचा 15-06, 14-16, 15-06 असा कडवा प्रतिकार केला.

ऋषिकेश होळेने केविन केवर 15-12, 11-15, 15-09 असा विजय मिळवला. रेहान सिद्दिकीने सौरव ठाकूरला 15-05, 15-05 असे पराभुत केले. आरव भाटियाने मिखाईल वरघसेचा 15-07, 15-13 असा तर, रोहिथ एम याने ध्रुव निकमचा 07-15, 15-08, 15-04 असा पराभव करून तिसऱ्या पात्रता फेरीत प्रवेश केला. महिला गटात श्रेया शेलार, मनस्वी वर्मा, वेदस्वी वासीरेड्डी, आनंदिता तामरा यांनी आगेकूच केली.

## ‘व्हेनकॉब-कॉनर्र पॉकेट करंडक’ खुली स्नुकर अजिंक्यपद स्पर्धा

# अभिषेक, इम्रान, आदित्य, ओस्वाल यांचा मुख्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ब्रिजसँग ट्रेनिंग्ज आणि कॉनर्र पॉकेट्स स्नुकर अॅकॅडमी यांच्या तर्फे आयोजित ‘व्हेनकॉब-कॉनर्र पॉकेट करंडक’ खुली अखिल भारतीय १०-रेड स्नुकर अजिंक्यपद स्पर्धेत पुण्याच्या अभिषेक बोरा, मुंबईच्या इम्रान खान आणि गाझी अन्वर, बंगलोरच्या आदित्य राजावत, गुजरातच्या ओस्वाल मासी आणि हुझेफ खान यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून मुख्य फेरीमध्ये प्रवेश केला.



पुण्यातील कँप भागातील कॉनर्र पॉकेट स्नुकर अॅकॅडमी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत क्यु क्लबच्या अभिषेक बोरा याने क्यु कल्चरच्या खलिल अस्लम याचा ५९-२३, ४६-११, ३९-०३ असा पराभव केला. मुंबईच्या इम्रान खान याने कॉर्नर पॉकेट्सच्या मतीन खान याचा ५४-२१, ४८-३२, २१-५०, २८-४६, ५६-३१ असा पराभव केला. क्यु कल्चरच्या सिद्धांत फाटे याने निखीलेश पिल्ले याचा १४-४९, ६४-१६, ५०-५६, ५६-२८, ३९-१७ असा संघर्षपूर्ण पराभव करून मुख्य फेरी गाठली. बंगलोरच्या आदित्य राजावत याने स्नुकर क्लबच्या अजय कोलपेक याचा ४६-२१, २१-५७, ४८-२५, ५४-२९ असा पराभव करून आगेकूच केली.

गुजरातच्या ओस्वाल मासी याने रॉयल स्नुकर क्लबच्या अमिन उसगांवकर याचा ५७-२४, १२-४६, ५१-२३, ४८-३२ असा पराभव केला. मुंबईच्या गाझी अन्वर याने क्यु क्लबच्या निपुन शर्मा याचा ४७-११, १०-४०, ५०-११, ५१-१८ असा पराभव करून आगेकूच केली. स्नुकर प्लॅनेटच्या हुझेफ खान याने पुना क्लबच्या फारूख मोदी याचा ५९-४४, ६२-३७, ३४-२७ असा सरळ फ्रेममध्ये पराभव करून मुख्य फेरी गाठली.

#रा